एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे

उड्डाणटप्पू

चवथे उड्डाण

श्रीरंग कौलगी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

उड्डाणटप्पू

(एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे)

चवथे उड्डाण

श्रीरंग कौलगी

उड्डाणटप्पू

(एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे)

चवथे उड्डाण

लेखक : श्रीरंग कौलगी

सम्पर्क: व्हाट्सॅप क्र. +९१ ९९२०६ १२९९६
ई मेल shreerangkaulgi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

TThis declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके नियमित मिळवण्यासाठी या क्रमांकावर आपले नाव व गाव Whatsapp करा)

प्रकाशन : २९ फेब्रुवारी २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

माझे नाव श्रीरंग कौलगी, शिक्षणाने आणि पेशाने मेकॅनिकल इंजिनियर.

माझे कार्यक्षेत्र नवीन मशीन डिझाइन्स करणे, ती डिझाइन्स विकसित करणे, त्याचे पहिले उत्पादन, म्हणजे प्रोटोटाईप करतांना बाहेर येणाऱ्या अडचणी सोडविणे आणि मग ती मशीन वापरात आणायला मदत करणे असे होते.

नव्याने आणि मुळापासून विचार करायला लागणे ही आमच्यासाठी पहिली आणि मूलभूत गोष्ट होती.

त्या अनुषंगाने आजूबाजूला चौकस नजरेने पहाणे आणि मिळेल तिथून नव्या कल्पना प्रत्यक्षांत आणणे हे आमच्यासाठी आवश्यकच होते.

जगाकडे चौकस दृष्टीने बघतांना आणि दिसलेल्या गोष्टींची ऍनालिटिकल चिरफाड करताना काही गोष्टी नव्याने सुचल्या त्या इथे मांडल्या आहेत.

एका इंजिनियरच्या दृष्टीतून जग कसे दिसते याची झलक आहे ही.

इथे सगळ्या गोष्टी नव्या नाहीत पण वेगळ्या अंगाने दाखवायचा एक प्रयत्न केला आहे.

प्रयोग कसा झाला आहे ते वाचक ठरवतील.

श्रीरंग कौलगी.

यापूर्वी पहिले, व तिसरे उड्डाण प्रकाशित झाले आहे. त्याचे कव्हर खाली आहे. त्यावर क्लिक केले की तेही उघडेल

अर्पण पत्रिका

काहीतरी लिहावे असे वाटायला लागले. पण आपले वाचणार कोण असेही वाटले. पण तसे झाले नाही. ज्यांच्याकडे हे साहित्य पाठवले त्यांनी ते नुसते वाचले नाही तर त्यावर साधक बाधक प्रतिक्रियाही दिल्या. चांगली टीकाही केली. काही प्रतिक्रिया आणि टीका नवे विषय देऊन गेल्या.

त्या सर्व वाचकांना, त्यांत वर्गमित्र आले, घरचे आले आणि खास जवळचे हक्काचे टीकाकार वाचक आले. त्या सर्वांना साष्टांग दंडवत घालून हे पहिले प्रकरण अर्पण करतो.

ई साहित्य ने हे विस्कळीत लेख एकत्र आणायला मदत केली आणि ते नीट जुळवायचे काम कसे उत्तम केले आहे ते बघाच. त्यांचे मी हार्दिक आभार मानतो.

"मॅन प्रोपोझेस अँड गॉड डिसपोझेस" या उक्ती प्रमाणे आपले प्रयत्न सफल व्हायला ती दैवी शक्ती जी दिसत सुद्धा नाही, तिच्या चरणी हे पुष्प अर्पण.

प्रस्तावना

या संग्रहात जे लेख प्रस्तुत केलेले आहेत ते एका इंजिनियरच्या मनात आलेले विचार आहेत. पण ते सगळ्यांनाच लागू होतात.

आपल्या मनांत अनेक विषय घोळत असतात, त्यांना तात्कालिक कारण असते किंवा पूर्वी काहीतरी पाहिलेले ऐकलेले असते त्याची पार्श्वभूमी असते.

रोज घडणाऱ्या घटना कधी नवीन पैलू घेऊन येतात. त्या दुसऱ्यांना सांगून पहाव्यात हा हेतू इथे आहे.

विषय वेगवेगळे आहेत आणि त्यांची एकमेकांशी रंगसंगती नाही, पण सगळे आपल्याला कधी न कधी स्पर्श करून गेलेले असेल.

हे ललित लेख किंवा मुक्त विचार प्रकटन म्हणूनच पाहावे, उगीच त्यातून खोल अर्थ काढू नये हा हेतू आहे.

बघा तुमचे विचार, अनुभव आमच्याशी जुळतात का.

हा चौथा संग्रह आहे. असे अजून संग्रह तुमच्यापुढे ठेवण्याचा मानस आहे.

"वर्क इन प्रोग्रेस" मानावे याला..

लेख-अनुक्रम

दुर्बीणी

नवीन काहीतरी

राम आणि कृष्ण

पानशेत प्रदक्षिणा

चमचमीत

शांतिदूत

अजून एकदा सीमोल्लंघन

कॉपीमास्टर

सायकल आणि मी

हमारे हसीन सपने

शेंगेतले मटार

गूढ विज्ञान, सत्य की आभास?

श्रद्धा आणि समजुती

अपशब्दांचा उगम

टीकाकाराचे महत्व

लग्न करण्याची कारणे

नवे धातू नवे धोके

कंटाळा आला

तिरकी चाल

पश्चातबुद्धी

कोणती भाषा?

एक छोटी तीर्थयात्रा

एप्रिल फूल

हिंसा आणि अहिंसा

नेट वरचे प्रवचन

सुधारित आवृत्ती

दुर्बीणी

आमच्या कोल्हापूरच्या आजोळच्या भावंडांनी टाकलेले एक कोडे मागेच सांगितले होते, "दोन भाऊ शेजारी भेट नाही संसारी" आणि त्याचे उत्तर ही दिले होते. आठवते का?

बंद घर चांगले नाही. घराला खिडक्या पाहिजेत. बाहेरचा उजेड आला पाहिजे. नाहीतर कसे कुबट वाटेल. जगात राहायचे तर संपर्क पाहिजेच.

देवालाही हे चांगलेच समजते म्हणून बाकीचे घर कितीही बंद असू दे, दोन खिडक्या मात्र ठेवल्या आहेत त्याने. आणि त्या सुद्धा अगदी सर्वांत उंच जागी, धूळ माती पासून दूर.

खिडक्या कसल्या, दुर्बिणी आहेत जश्याकाही. इतक्या शार्प आहेत की आकाशातल्या तारका स्पष्ट दिसतात त्यांना आणि अगदी जवळचेही बरोबर दिसते. अशी दुर्बीण पाहिली आहे का जी केसापासून ते आकाशापर्यंत सगळे क्षणार्धात एकदम स्वच्छ दाखवते, स्वतःही छान दिसते आणि दुसऱ्यालाही मोहिनी घालते.

त्या दुर्बिणीचे किती वर्णन करावे, आँखे, नयन, नेत्र, डोळे, अक्ष आणि कितीतरी गोड नावे माणसाने दिली आहेत.

a

खरे तर डोळे म्हणजे एक कॅमेरा, बाहेरची दृश्ये दाखवणारा, स्वतः काहीही राखून ठेवता सगळे आपल्या मेंदूला सांगणारा एक चमत्कृतीपूर्ण अवयव. स्वतः काहीही विश्लेषण न करता माहिती पुढे पाठवणारा.

माणसाचे डोळे तीन रंगांत पाहतात म्हणतात. त्यांतही इंद्रधनुष्याचे सगळे रंग दिसतात. पक्ष्यांचे चार पाच रंगांत आणि काही प्राण्यांचे तर सहा सहा रंगांत पहातात. काही प्राण्यांना सूक्ष्म दृष्टी असते तर काही फक्त हालचाल झाली तरच बघू शकतात. काही पक्ष्यांची नजर एवढी तीव्र असते की आकाशांतून मैलभर अंतरावरून जमिनीवर उड्या मारत जाणारा उंदीर त्यांना दिसतो. काहींना अंधारातही सगळे स्वच्छ दिसते.

माणसांची तर अजून वेगळी रीत आहे. त्यांच्या डोळ्यांचा रंग किती वेगळा, चार पाच तरी रंग असतात माणसाच्या डोळ्यांचे. काही प्राणी दोन वेगळ्या रंगांच्या डोळ्यांच्या जोड्या घेऊन जन्मतात पण ते खास जेनेटिक डायव्हर्शन म्हणून.

मनुष्य प्राण्यांचे तसे नाही दिसत. काळे, निळे, हिरवे, घारे, आकाशी, चॉकलेटी, पिंगट, अगदी पांढरे वाटावेत असे रंग माणसाच्या डोळ्यांत दिसतात. का झाले असे? हे मात्र आपण सांगू शकत नाही.

काळेभोर डोळे असलेल्या आईला आणि चॉकलेटी डोळे असलेल्या बाबांना हिरव्या किंवा घाऱ्या रंगाचे डोळे असलेले बाळ झाले की कसे नवलाईचे वाटते.

वस्तुतः डोळ्यांच्या रंगाचा आणि दृष्टीचा काहीही संबंध दिसून येत नाही. सगळ्यांना सगळे तसेच दिसते. पण तसे नक्की का? आपण बाळ असल्यापासून पाहायला सुरुवात करतो आणि दुसरे सांगतात म्हणून एखादी गोष्ट तशीच आहे असे समजतो.

लाल रंग म्हणजे नक्की लाल रंगच दिसतो का सगळ्यांना? कोणी सांगावे, वेगळेच दिसतही असेल पण कळणार कसे? ट्रॅफिक मध्ये लाल दिवा सगळ्यांत वर असतो म्हणून तो लागला की थांबायचे किंवा इतर थांबले म्हणून थांबायचे असे असते का?

इतर प्राणी जग कसे पहातात ते आपल्याला कसे कळणार? माणसाला तीन रंगांत जग दिसते असे म्हणतात, मग एक रंग दिसेनासा झाला किंवा जन्मतः तसेच असेल तर तो मनुष्य कसे पहात असेल जग. रंगांधळे आहेत म्हणून जगणे अशक्य झाले आहे असे काही दिसत नाही. ते लोकही आपले जीवन नीटच जगतात.

इतर काही प्राण्यांना चार पाच रंगांत जग दिसते, मग आपल्याला का नाहीत तसे डोळे? आणि चार रंगातले जग तीन रंगातल्या जगापेक्षा वेगळे दिसत असेल का? देवाने अशी दृष्टी काहीच प्राण्यांना का दिली असेल? आणि अशी दृष्टी असलेले प्राणी जिथे आहेत तिथेच राहिले आहेत आणि तीन रंगांत बघणारा माणूस मात्र प्रगत होऊन त्यांचे डोळे आणि दृष्टी तपासतो आहे.

जर असे बऱ्याच रंगांत बघणारे डोळे माणसाच्या अंगांत बसवले तर काय होईल? त्याला दिसेल तरी नीट की नाही? माणसाने न दिसणाऱ्या रंगांत पाहणाऱ्या दुर्बिणी बनवल्या आहेत. डोळेच तसे असते तर?

पृथ्वीवर बहुतेक जीव एकाच मुळा पासून निर्माण झाले असावेत कारण बहुतेक जीव बाहेरून बायसिमेट्रिकल पण आतून एस्सीमेट्रिकल आहेत. बहुतेकांना दोनच डोळे आहेत. एका डोळ्यांचे, तीन चार डोळ्यांचे प्राणी पृथ्वीवर तरी दिसत नाहीत. नाही म्हणायला कोळ्यांना आठ डोळे असतात. असे का? कदाचित प्रत्येक जोडी स्पेशियलिस्ट असेल आणि एक जोडी बघते ते इतर जोड्या बघू शकत नसतील. पण हे एक एक्सेप्शन आहे असेच म्हणायला लागेल.

एकंदरीतच आपले डोळे म्हणजे देवाने दिलेली एक विशेष भेटच आहे सगळ्या प्राण्यांना. जे कधीही प्रकाश पहात नाहीत त्यांनाही डोळे देऊन ठेवलेले आहेत.

डोळ्यांनी भावप्रदर्शन करता येते यांत काहीच संशय नाही. नजरेला नजर भिडवणे म्हणजे, राग, निर्दोषत्व, प्रेम, रग, निर्भीडपणा आणि इतर भाव दाखवणे हे असे आहेच. डोळ्याला डोळा भिडविला तर समोरचा अस्वस्थ होतो किंवा चिडतोही. कुत्रे, मांजरे, बैल याच्या नजरेला नजर भिडवली की ज्यास्त आक्रमक

होतात म्हणे. आय कॉन्टॅक्ट अगदी परदेशांतही निर्मळ मन असण्याची खूण मानली जाते.

दुर्बिणी आपल्याला आकर्षित करत असोत की नसोत. या देवाने दिलेल्या दुर्बिणीमात्र नक्कीच आकर्षक असतात. फक्त डोळे बघून वेडे झालेले लोक दिसतील आणि मग ते कविता, गोष्टी, गाणी लिहीत असतील आणि म्हणत असतील. फक्त डोळ्यांवरच्या कविता आणि गाणी आठवा.

"डोळे हे जुलमी गडे, रोखुनी मज पाहू नका".

नवीन काहीतरी

तसे आम्हाला देवाने गाण्याचे अंग थोडेफार दिले आहे. शाळेत असल्यापासून नाटक सिनेमातली गाणी म्हणायची आवड होतीच. आम्ही नववीला असतांना आमच्या वडिलांनी एक ग्रामोफोन आणला. आणि पंधरा वीस रेकॉर्ड्स. बहुतेक रेकॉर्ड्स नाट्यसंगीताच्या होत्या. सौभद्र, मृच्छकटिक आणि अश्याच नाटकांच्या. गायक म्हणजे अगदी आकाशापर्यंत कीर्ती गेलेले.

शाळा दुपारची असायची. मग शाळेची वेळ होईपर्यंत रेकॉर्ड्स लावून ऐकत बसणे हा उद्योग होताच. परीक्षा काही दररोज नव्हत्या आजच्या सारख्या, त्यामुळे वेळ तर मिळायचाच. हळू हळू त्या रेकॉर्ड्स बरोबर गायची आवड लागली.

आवाज ही तर देवाची देणगी आहे. जसा आहे तसा आहे, त्याला काही करता येत नाही. पण हुबेहूब तस्सेच गायचे हे तर आमच्या हातात होतेच. त्यामुळे बरोब्बर कॉपी करायची आणि रेकॉर्ड वाजत असतांना आपला आवाज गायकाच्या आवाजात बरोबर मिसळून टाकायचा याची आवड लागली. अगदी गायकाच्या ताला सुरांत.

थोड्या दिवसांनी लक्षांत आले की आपल्याला सुरांत आणि तालात गाता येते म्हणून. असलेल्या सगळ्या रेकॉर्ड्स वरची गाणी पाठ झाली अगदी मधल्या संगीता सकट. आमची शाळा भलतीच कल्चरल होती. आमचे शिक्षक नाट्यसंगीत आणि शास्त्रीय संगीताचे चाहते होते.

a

एकदा आमच्या सरांनी विचारले वर्गांत की कोणी गाणे म्हणू शकेल का म्हणून. लगेच हात वर केला. आणि "रजनीनाथ हा नभी उगवला" हे मृच्छकटिक नाटकातले छोटा गंधर्व यांचे गाणे अगदी दणदणीत आवाजात म्हणून टाकले, अगदी तालात आणि तानांसकट. वर्ग अगदी शांत झाला होता. दुसऱ्या बाजूच्या वर्गांतही ऐकू गेले. सर अगदी खूष झाले. जवळ बोलावून पाठ थोपटली.

का कुणाला माहिती, पण कोणी आमचे कौतुक केले आणि पाठ थोपटली की आमच्या डोळ्यांत पाणीच येते. कौतुक नाही सहन होत आम्हाला. त्यापेक्षा टीका लौकर स्वीकारतो आम्ही.

पण या गाण्यामुळे शाळेत थोडी प्रसिद्धी मिळाली. दुसऱ्या वर्गाच्या बाई आणि सरही कधीकधी त्यांच्या वर्गांत गाणे म्हणायला बोलवू लागले. काही टवाळ मुले टिंगल करायची पहिल्यांदा पण कौतुक होते आहे ते बघितल्यावर तीही गप्प झाली.

शाळेत एसीसी जॉईन केली होती. एसीसीच्या कॅम्प मध्ये कल्चरल कार्यक्रम असायचा, मग तिथेही गाणे म्हणायला मला सांगायचे. एक दोन वेळा बक्षिसेही मिळाली शाळेला.

रेडियो तर सतत कानावर यायचाच, त्यामुळे त्यावेळची सुरेल गाणी आपोआप मनांत बसायला लागली. आमच्या वडिलांना सिनेमातली गाणी आवडायची नाहीत.

पण आई म्हणू द्यायची. तेंव्हा ऐकलेली मधुमती, नवरंग, सीमा, जगाच्या पाठीवर वगैरे सिनेमातली गाणी पक्की मनांत घुसून बसली.

शाळेनंतर कॉलेजांत गाणी थोडी मागे पडली. "करियर"ची काळजी होती ना. वालचंद कॉलेजच्या हॉस्टेल मध्ये कधीकधी आपल्यासारख्या अजून गायक मित्रांची संगत मिळाली पण या छंद फारसा काही पुढे गेला नाही. नाही म्हणायला साठी सत्तरी च्या वर्षांतली काही गाणी मनांत पक्के घर करून राहिली.

नंतरचे वर्किंग लाईफ सगळे झापड बांधलेल्या घाण्याच्या बैलासारखे गेले. कधी बाही गुणगुणणे असेल पण ते तेव्हढेच.

आता त्राहत्तर वर्षे वय झाल्यावर पुन्हा एकदा ती जुनी उर्मी उफाळून आली आहे. फक्त आपल्याच आवाजांत गाणी म्हणून कसे वाटते ते बघितले. वाटले चांगले, आहे बऱ्यापैकी सुरांत आणि तालात पण काहीतरी कमीच आहे असे मलाच काय पण इतरांनीही वाटले.

आता हजारो गाण्यांचे संगीतही मिळते हे बघितल्यावर आपणही ओरिजिनल गाण्यासारखे म्हणू शकू का ही उत्सुकता अगदी ताणली गेल्यावर एखादे ऐप मिळते का याचा शोध घेतला आणि खरेच अशी अनेक ऐप मिळाली.

सोलो गाणे वेगळे आणि संगीताबरोबर आणि ताला बरोबर गाणे वेगळे. पण अगोदर असलेली आवड हे जमवते असे दिसते आहे.

a

आता साग्रसंगीत गाण्याची प्रॅक्टिस करतो आहोत सध्या. दोन चार गाणी म्हणून झाली, जमतंय की, अशी आशा निर्माण झाली आहे.

असे म्हणतात की हौस आणि आवड यांना मोल नसते आणि उशीर कधीच होत नाही. त्यांतही आपल्यासारखे अजून दोनचार जण असतील तर मग काय? काहीवेळा अडचणी येतात पण आपल्याला गाईड करायला आपल्यासारखे लोकही मिळतात. आमचा सुहास कामत आहे ना तसा. मग आपल्याला जे समजले ते दुसऱ्यांना सांगायचे. ज्योत से ज्योत जगाते चलो.

आता हा नाद करायचाच आणि परफेक्शन किती आणता येते त्याचा पाठलाग करायचा. म्हटलेली गाणी अगदी बोअर होईपर्यंत लोकांना आणि बायकोला ऐकवायची.

वेळेचा काही प्रॉब्लेमच नाही. साधने हाताशी आहेत. मग हेही करून पहायचे. जमले तर एखादा सेमीपब्लिक कार्यक्रम करून पहायचा असेच ठीक वाटते आहे.

काहीतरी वेगळे करून बघितल्या खेरीज कसे कळणार की ते चांगले असते की नाही ते? कोण जाणे आपल्यातही कोणीतरी महान कलाकार लपलेला असेल, त्याला चान्स तरी दिला पाहिजे की नाही?

तुम्हीच सांगा.

राम आणि कृष्ण

विष्णूचे दहा अवतार आहेत असे वाचले आहे.

परशुराम, राम आणि कृष्ण हे तीन मनुष्य सदृश आहेत. कल्की, दहावा अवतार कसा असणार आहे ते काही वाचण्यांत किंवा सांगण्यांत आलेले नाही कुठे. पण कल्की राजा किंवा राजासारखा असणार असे त्याच्या छत्र असलेल्या घोड्याच्या चिन्हा वरून वाटते.

सगळे अवतार मनुष्याची उत्क्रांती कशी झाली त्याचेच द्योतक आहेत असे म्हटले पाहिजे.

परशुराम अवतारात मनुष्याचा स्वभाव कसा होता त्याचेच प्रतिबिंब आहे. विद्वान, आज्ञाधारक, कोपिष्ट, शूरवीर, दया न दाखवणारा, पित्याची आज्ञा जशीच्या तशी पालन करून नंतर मात्र आपली माता पुन्हा होती तशी होवो म्हणून वर मागणारा. भूमी नाही तर नवीन भूमी निर्माण करून तिथे आपले स्थान स्थापन करणारा, रागाने एकवीस वेळा पृथ्वी निक्षत्रिय करणारा. अश्या कितीतरी परस्पर विरोधी आणि तीव्र स्वभावधारा असलेली व्यक्ती. कुणी परशुरामाला प्रेमळ किंवा भक्तवत्सल म्हणणार नाही. तरीही अलौकिक कार्य केलेला अवतार.

राम आणि कृष्ण दोघेही आजच्या माणसांना जवळचे वाटावेत असे. त्यांचे स्वभाव मृदू झालेले पण भावना मात्र तश्याच तीव्र.

a

राम ज्येष्ठ राजपुत्र, मोठ्या प्रसिद्ध घराण्यांतला, त्याचे राजा होणे जवळ जवळ निश्चित होते. तेंव्हाच्या पद्धतीप्रमाणे त्याचे आयुष्य निरंकुश, आरामाचे होणे सहज शक्य होते. त्याला विश्वामित्रा सारखा गुरू मिळालेला होता. त्यावेळच्या पद्धती प्रमाणे शिक्षण उत्तम दर्जाचे मिळालेले होते. समाजातले नियम काय आणि कसे पाळायचे याचेही शिक्षण घरी आणि नंतर गुरूकडून मिळाले होते. अगदी तेंव्हा पाप म्हणून रूढ असलेल्या स्त्रीवध आणि ब्रह्महत्या अश्यासारख्या गोष्टीही का आवश्यक असतील याचेही ज्ञान गुरूकडून मिळालेले होते. उत्तम शिक्षण मिळाल्यानंतर त्याचा आपल्या गुरूला उपयोग करून देण्याची संधीही मिळालेली होती आणि तिचा पुरेपूर वापरही स्वतःला डाग लावून न घेता करता आला होता. एकंदरीत रामाचे आयुष्य सुखी होणार यांत काहीच शंका नव्हती. पित्याच्या अप्रत्यक्ष आज्ञेचे आदराने पालन केले आणि रामायण घडले.

कृष्ण तसा नव्हता. त्याचा जन्म गोपाल म्हणूनच झाला होता. त्याचे घराणे फारसे प्रसिद्ध नव्हते आणि जरी त्याचे वडील त्यांच्या समाजाचे पुढारी होते तरी ते काही राजा म्हणून प्रसिद्ध नव्हते. त्याला गुरू म्हणून सांदीपनी ऋषीच गुरू म्हणून मिळाले होते. त्याचे शिक्षण युद्धकर्मांत असल्याचे कुठेच वाचायला मिळत नाही. त्याच्या काळांत धर्म, समाज, लोकरीती अगदी वेगळ्या होत्या. कृष्ण स्वतः बलवान राजा म्हणून कधीच प्रसिद्ध झाला नव्हता, उलट इतर बलवान राजांपासून त्याला आपले संरक्षण करण्याची पाळी त्याच्यावर आली होती त्याच्यावर. पण कृष्ण रामापेक्षा अधिक धोरणी, चतुर आणि संधी निर्माण करून त्यांचा उपयोग करण्यांत

यशस्वी झाला. पाहिजे तिथे मित्रत्व करून आणि पाहिजे तिथे शत्रुत्व करून त्याने आपला कार्यभाग साधला.

रामाच्या काळांत विंध्य पर्वताच्या दक्षिणेला अजून आर्यांचा प्रवेश फारसा झालेला नव्हता पण प्रयत्न सुरू होते. कृष्णाच्या काळांत मात्र जवळ जवळ सगळे भारतवर्ष आर्यांनी आणि त्यांच्या वंशजांनी व्यापले होते. रामाचा काळ चार पाच हजार वर्षांपूर्वी आणि कृष्णाचा काळ साडेतीन ते चार हजार वर्षांपूवी होता असे एक वेळ मानले तर त्याच्या मधल्या दोनेक हजार वर्षांत बरीच उत्क्रांती समाजांत झालेली होती.

साधे उदाहरण म्हणजे रामाच्या काळांत घोडा ही एक नवलाईची गोष्ट होती पण कृष्णाच्या काळांत घोड्यांचा उपयोग चांगला होत होता. पशुधन हे राजांचे मोठे धन कृष्णाच्या काळांत झाले होते. रामायणात पशुधन राजांचे मोठे धन असल्याचे लिहिलेले दिसत नाही.

रामाच्या काळांत समाज नियम बरेच कडक होते. कृष्णाच्या काळांत ते बरेच शिथिल आणि तरीही क्लिष्ट झाले होते. खरे काय आणि खोटे काय, पाप आणि पुण्य यांचे निकष, समाजातील सरळपणा, इतर समाजातील विचारांची आणि पद्धतींची देवघेव यांचे निकष राम आणि कृष्ण यांच्या काळांत वेगवेगळे होते हे रामायण आणि महाभारताचे निरपेक्ष आणि निष्पक्ष वाचन केले तर दिसून येते.

a

समाजातील राजकारण, धर्मकारण आणि कर्तव्याकर्तव्यकारण हे राम आणि कृष्ण यांच्या काळांत अगदी वेगळे झाले होते.

रामाने सीता लंकेतून रावणाचा वध करून सोडवून आणली हे खरे पण त्याने संपूर्ण विश्वास सीतेवर टाकला असे कुठेच दिसत नाही. उलट एका साध्या नागरिकाच्या बोलण्याला प्रमाण मानून आपल्या पत्नीचा त्याग केला.

कृष्णाने मात्र अनेक स्त्रियांचा त्यांच्याशी विवाह करून उद्धार केला आणि त्यांना समाजांत मानाचे स्थान मिळवून दिले. त्या दृष्टीने कृष्ण मोठाच समाजधुरीण झाला.

राम स्वतः वीर योद्धा होता आणि त्याने स्वबळाची परीक्षा अनेक वेळा दिली. सगळी युद्धे स्वतःच्या बाहुबळावर जिंकली.

कृष्णाने स्वतःच्या युद्ध कौशल्याची परीक्षा तशी कमी वेळाच दिली पण आपल्या शत्रूंना इतर लोकांच्या शक्तीने जिंकल्याचे मात्र खूप वेळा दाखवून दिले.

अर्थात राम हा आदर्श वीर आणि आदर्श राजा होता. कृष्ण हा आदर्श संघटक आणि कुशल राजकारणी होता.

a

तसे असूनही राम आणि कृष्ण दोघेही लोकोत्तर पुरुष झाले आणि त्यांनी त्यावेळच्या समाजात मोठीच क्रांती घडवून आणली. परशुरामाने मोठे कार्य करूनही त्याला असा मान कधीच मिळाला नाही. परशुरामाचे नाव देव किंवा लोकोत्तर पुरुष म्हणून कधीच घेतले जात नाही.

जर राम आणि कृष्ण दोघेही आपापल्या कार्यात यशस्वी झाले तर कोण ज्यास्त प्रभावी होता हे मात्र ठरविता येणे कठीण आहे, आजही.

ज्यास्त लोकप्रिय कोण, राम की कृष्ण हेही ठरवता येणे कठीण आहे.

आजच्या काळांत जर पुन्हा परशुराम, राम, कृष्ण आणि कल्की यांनी जन्म घेतले तर काय होईल याचा विचार करून बघणे मनोरंजक होईल. आजच्या काळांत आपल्याला कुणाची ज्यास्त गरज आहे याचाही विचार करून बघावे.

काळ बदलतो, मनुष्य स्वभाव बदलत नाही हे रामायण आणि महाभारत दोन्ही सांगतात. पण त्यांतल्या त्यांत महाभारतच आजच्या परिस्थितीला ज्यास्त जवळचे वाटते.

तुम्ही सांगा, तुम्हाला काय वाटते ते.

पानशेत प्रदक्षिणा

पुण्यापासून जवळच अगदी निसर्गसौन्दर्याने नटलेली एक सहल करण्या सारखी जागा आहे.

पानशेत धरणाच्या अगोदर, म्हणजे वरसगाव धरण दिसायला लागले की एक रस्ता जातो डावीकडे, वेल्ह्याच्या दिशेने, कुरण नावाच्या गावाजवळून.

तिथे डावीकडे वळले की एक फाटा वेल्ह्याकडे म्हणजे तोरणा किल्ल्याकडे जातो तिथे उजवी न सोडता वळत राहिले की पानशेत धरणाच्या पाणीसाठ्याला वळसा घालून एक रस्ता जातो.

तो त्या कुरण गावाच्या फाट्याला सुरू होतो आणि शेवटी पानशेत एमटीडीसी जवळून पुन्हा पानशेत लवासा रस्त्याला येऊन मिळतो.

ही पानशेत प्रदक्षिणा आहे.

काही सायकल पटू या रस्त्याने जाऊन उलटी आणि सुलटी दोन्ही प्रदक्षिणा करतात. एका प्रदक्षिणेचे अंतर *६८ किलोमीटर* आहे. पाण्याच्या कडेकडेने कधी पाण्याजवळून तर कधी उंच डोंगरावर चढून हा रस्ता जातो.

मध्येमध्ये गावेही आहेत आणि बऱ्याच लोकांनी तिथे मोठे लहान प्लॉट घेतले आहेत. काही रिसॉर्टस आहेत तिथे. शनिवार रविवारी खूप गर्दी होते म्हणे तिथे.

रस्ता कधी खडबडीत तर कधी एकदम गुळगुळीत आहे. सगळा रस्ता वळणावळणाचाच आहे आणि चढ उतार तर सारखेच येतात.

अतिशय उत्तम निसर्ग सौन्दर्य बघायला मिळते. ज्यांच्यात धमक आहे असे सायकल पटू तिथे नेहमी जातात. रस्ता साध्या मोटारी जाण्यासारखा आहे पण गाडी मात्र चांगल्या तब्येतीची पाहिजे. आणि ड्रायव्हरला गाडी चालवण्याची अगदी उत्कट इच्छा असली तर अगदी एक्सायटिंग ड्राइव्ह होतो.

a

काही वरच्या जागांवरून पानशेत च्या धरणाचा साठा आणि आजूबाजूचे डोंगर आपले डोळे अगदी निववतात.

पुण्यापासून एवढी जवळ एका दिवसांत करता येण्यासारखी निसर्ग सहल होऊ शकते.

आम्ही अर्थात मोटारीतून ही प्रदक्षिणा केली, पण मोटारसायकलवरूनही करण्यासारखी आहे. पुन्हा एकदा, वाहन अगदी निर्दोष आणि तब्येतीचे असले पाहिजे.

अगदी छान पाच सहा तासांची सफर आहे.

एकट्या पुणे जिल्ह्यांतच अश्या एक दिवसाच्या ट्रिप्स कितीतरी होऊ शकतात. जवळच्या सातारा जिल्ह्यातही अशी ठिकाणे बरीच आहेत.

आमचा मुंबई जिल्हा त्यामानाने अगदीच दरिद्री आहे!

चमचमीत

आपल्याला बघा काहीतरी सतत चघळायला लागते. बैलासारखे किंवा बोकडासारखे तोंडांत काहीतरी असले की रवंथ करायला कशी मजा येते.

आमची मानसिक भूकही भलतीच तीव्र आहे. एखादा विषय एक दोन दिवसच पुरतो. म्हणजे तसे आम्ही टिव्ही चॅनेल सारखे आहोत. सारखे काहीतरी खायला चघळायला लागत असते आम्हाला.

त्यांतही आमची भूक म्हणजे भारीच कडक. मीठ मसाला नसलेले आम्हाला अजिबात चालत नाही. चांगले चमचमीत पाहिजे आम्हाला.

मग शोधत हिंडतो कुठे काय मिळते ते. पण या व्हॉट्सएप ग्रुपच्या नियमांनी अगदीच गोची करून ठेवलेली आहे बघा. हे करू नका ते करू नका, ते घाणेरडे राजकारण नको, धर्मकारण तर "शिव शिव शिव", फॅमिली मॅटर्स फारच प्रायव्हेट, सायन्स आणि टेक्नॉलॉजीच्या बातम्या तर "हेच केले की जन्मभर, आता पुन्हा कशाला ते" म्हणून रिजेक्ट, कविता सुनावाव्या तर आमचे टेक्निकल मन आडवे येते, प्रवास वर्णने लिहावीत तर "इथे कोण जाणार, आणि यू ट्यूबवर आहेतच की", खेळांच्या बातम्या तर लिहायच्या अगोदरच शिळ्या होतात.

मग आता करावे काय? कुठे असा चमचमीत माल नेहमी मिळेल?

सगळ्यांना आवडेल असा विषय कोणता? हां, हिंदी सिनेमे आणि त्यातली गाणी आवडतात सगळ्यांना. पण अडचण अशी की ती खूपच मोठ्या प्रमाणांत इंटरनेटवर अगदी व्हिडिओमध्ये आहेत, मग आमचे कोण ऐकणार?

तसे आम्ही शेयर करतो, गाणी नव्हेत, त्यांच्या साईट्स आणि लिंक्स. त्या नक्कीच चमचमीत असतात. अगदी ओरिजिनल, लिंक्स हो.

स्वतः म्हणून दाखवावीत तर "काय बोकडासारखा आवाज आहे आणि रेड्यासारखा ताना घेतो आहे" म्हणून समरी ट्रायल होऊन शिक्षा व्हायची. तरी बरे, आता अगदी जवळ जवळ ओरिजिनल जाण्यासारखे म्युझिक मिळते आहे, आपला आवाज आणि "गायनकला" छपवायला.

गाणी म्हणण्यात अजून एक अडचण आहे. गाणे म्हणून पोस्ट तर करता येईल. करून बघा. नासाचे शास्त्रज्ञ कसे परग्रहावर सिग्नल पाठवून उत्तराची वाट बघत बसतात तसे होते. अँटेना कायम चालू पाहिजे पण उत्तर काही येत नाही. वाट बघत बसा.

आणि गाण्याला गाता गळा असला पाहिजे आणि तालासुराचे ज्ञान असले पाहिजे अशी एक कविकल्पना पक्की रुजली आहे आमच्या मनांत. ते काही आपले

a
काम नाही. भले अंघोळ करताना चुकून एखादी ओळ येत असेल आमच्या तोंडातून म्हणजे गळ्यातूनही पण ते बुवा आमचे प्रायव्हेट आहे.

जसे आम्ही आमचे उघडे अंग सगळ्यांना दाखवत नाही तसे आमच्या कलाही उघड्या करून दाखवत नाही. लोक हसले आम्हाला तर काय? आणि आमची सोशल पोझिशन डॅम होणार नाही का? एवढा मोठा म्हातारा गाणे कसले गातोय आणि तेही पब्लिकमध्ये? येडा आहे की काय?

लिखाण करणे तसे चांगले आहे. शाळेपासून आता पर्यंत लिखाणामुळेच तर पास होत गेलो आहे आम्ही. चांगले तीन तीन तास लिहायची संवय लावली होती आम्हाला, अगदी बोटात क्रँप येईस्तोवर. पण गेले ते दिवस आणि जाऊ देत त्या आठवणी.

समजा अगदी छाती करून लिहून बघावेच असे वाटले तर आता ते कशावर हा यक्षप्रश्न आलाच.

लिहायला विषय कोणता निवडावा? व्यक्तिपूजक तर आम्ही नाही, धर्माभिमानी नक्की आहोत, देशाभिमानाचा तर सवालच येत नाही, ते आम्ही अति उत्कट आहोतच.

a

काल्पनिक गोष्टी आणि प्रेमकथा लिहिणे हा आमचा पिंड नाही, मेष रास आहे ना आमची. कविता लिहून पाठवावी तर एक तर तिचे छंद, प्रास, यमकाचे नियम असंख्य आणि आम्ही पडलो इंजिनीयर. आमची मने अशी हळुवार फुलांसारखी कशी असणार आणि समजा असली तरी ते लोकांना पटेल का?

कसे लिहायचे ही अडचण नाही आता. साध्या मोबाईलवर लिहिता येते आता. अगदी भारतीय भाषांतही, ते सुद्धा ऱ्हस्वदीर्घाचे नियम पाळून. पण विषय कोणता निवडावा हा वेताळप्रश्न आहेच.

लोकांना, सगळ्या लोकांना, ती विषय आवडला पाहिजे, त्यांत कोणाचाही इगो दुखावता कामा नये, कोणाच्याही भावना दुखावता नयेत, सगळ्यांना रस वाटला पाहिजे, फार क्लिष्ट नको, अति सोपाही नको, साधारण दहा मिनिटांत वाचता आला पाहिजे, शक्यतो त्यांत प्रश्न असूच नयेत, कॉमेंट करायला सोपा असावा.

थोडक्यांत काय तर आमची ही कामधेनू ठेंगणी, खूप दूध देणारी तेसुद्धा दूध काढायचे कष्ट न देता आपोआप बरणीत भरणारी, शिंगे अजिबात नसणारी किंवा शिंगे असलीच तरी ती न मारणारी, अतिशय प्रेमळ अशी असली पाहिजे.

बघूया, शोधले तर अशी कामधेनूही आणि असे विषयही मिळतील. पण लोक वाचतील ना ते आमचे लेख?

a

आपण सोडून इतरांनी गाणी, कविता, लेख, जोक, गोष्टी, प्रवासवर्णने, फोटो वगैरे, सध्याच्या परिस्थितीवर टिप्पणी, धार्मिक प्रवचने, राजकारण वगैरे वर पोस्ट करावे, आपला रोल कॉमेंट करायचा. आपला आवाज गाण्याला चांगला नाही. कविता वगैरे आपल्याला करता येतच नाही. लेख फक्त लेखकांनीच लिहावेत आपला तो प्रांत नाही. प्रवास वर्णनात काय एवढे असते? राजकारणावर चर्चा म्हणजे आगीशी खेळ, तो आम्ही कसा करणार? धर्म आणि जातीवरची चर्चा किंवा विचारमंथन म्हणजे जसे काही न्यूक्लियर बॉम्बशी खेळणे. असले काही केले की चाबकाचे फटके बसणार आपल्याला.

मग आता मनाला चमचमीत काहीतरी मिळावे ते कसे? आता इंटरनेटवर काय मिळत नाही? आणि मिळते ते किती सोप्पे आहे. फक्त बोटे चालवणे, अलेक्सा आहेच उत्तर द्यायला.

तर बंधूंनो, आमचे आता असे मत होतं चालले आहे की व्हॉट्सएप ग्रुप वर पोस्ट करणे बंदच करून टाकावे. फक्त क्विक कॉन्टॅक्ट म्हणूनच तो वापरावा.

तुम्ही काय म्हणता? काय आवडते तुम्हाला? चमचमीत की प्रकृतीला सांभाळून घेणारे मीठ मसाला नसलेले?

शांतिदूत

आमच्या मुंबईमध्ये समुद्रसपाटीच्या वर राहणाऱ्या प्राण्यांत माणसे आणि कावळे सोडून फक्त पारवेच असंख्य असावेत. माणसांच्या जवळपास राहून आपली ओळख पक्की ठेवणारे पारवे मुंबईभर अगदी मजेत रहातात.

मुंबईत पारव्यांच्या साठी वेगळी व्यवस्था इतिहास काळापासून आहे असे वाटते. पारवे "पारव्या" रंगांचे असले तरी कधीतरी त्यांच्यांत जेनेटिक म्युटेशन होऊन ते पांढरेही होतात. आता "पांढरा पारवा" कधी कोणी म्हणते का? म्हणून त्यांना उत्तर भारतीय प्रथे प्रमाणे कबुतर म्हणावे अशी पद्धत पडली आहे. त्यामुळे त्यांच्या साठी स्पेशल बनवलेल्या जागांना कबुतरखाने असे म्हटले आहे. मुंबईत दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत पाच सहा तरी कबुतरखाने आहेत.

फोर्ट मध्ये, गिरगावांत, काळबादेवीला, भायखळ्याला, दादरला, घाटकोपरला अश्या जागा कबुतरखाना म्हणून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

आमच्या लहानपणी बिल्डिंगमध्ये पांढरी कबुतरे पाळायची खोकी असायची. त्यांत शुद्ध पांढरी जातिवंत कबुतरे निपजायची पद्धत होती. सकाळ संध्याकाळ त्यांना बाहेर सोडून उडविली की खूप छान दिसायची निळ्या आकाशांत. मग "औं औं औं" करून बोलवायचे पुन्हा खाली. तासाभराच्या खेळा नंतर. आकाशात जे ससाणा दिसला तर मात्र घबराट पसरायची, एखाद दुसरे कबुतर परत नाही यायचे.

a

वस्तुतः पारवे तसे मूक वाटतात. आपण बरे आणि आपली प्रजा बरी असे वागतात. खाणे, रहाणे आणि मुले निर्माण करणे यावाचून त्यांना काही उद्योग नसावा असेच वाटते.

बाबा आदमच्या काळांत एकदा कधीतरी मोठ्ठा पूर आला होता आणि त्यावेळी मनू म्हणा किंवा नोह म्हणा अश्या कोण्या एका सदगृहस्थाने एक मोठीशी नाव करून पृथ्वीवरचे जीव एक नवरा आणि एक बायको अश्या जोड्या असे वाचवले होते म्हणतात. पूर ओसरायला लागल्यावर त्याने एक पारवा बाहेर सोडला आणि त्याने एका झाडाची डहाळी परत आणली आणि त्यामुळे त्याला शांतीचा दूत म्हणून लोकांनी मान दिला.

आता त्या पूरग्रस्त पृथ्वीवर या पारव्याला ती डहाळी कशी मिळाली ते काही विचारू नका. पण त्याला शांतिदूत नाव कायमचे मिळाले. माणसांनी पारव्यांना एकदा असे सिम्बॉलीक रूप दिल्यानंतर त्यांची देवासारखी व्यवस्था केली त्यांत काही आश्चर्य नाही.

पारवे म्हणा किंवा कबुतर म्हणा, आवाज फारसा करत नाहीत. सारखे प्रेमात गुंगून गेलेले वाटतात. कधी लढाया मारामारी करतांना दिसत नाहीत.

पण एक मिनिटं थांबा. चार पारवे एका ठिकाणी आले की बघा. दोनजण स्वतः भोवती फिरून ही माझी जागा ती माझी जागा असे एकमेकांना दमदाटी करतात. एका वायर वर किंवा दांडीवर बसलेले दोन पारवे एकमेकांना चोचीने आणि पंखाने हाणायचा प्रयत्न करतात.

a

जो दांडगेश्वर असतो तो दुसऱ्याला हुसकावून लावतो, तो दुसरा किंवा दुसरी वेगळ्या ठिकाणी जाऊन तोच खेळ खेळतात. म्हणजे पारव्यांच्यात जे फायटिंग स्पिरिट असते ते दुसऱ्या प्राण्यांच्यात कमीच असेल.

एकदा हुसकावून लावले की मात्र लगेच ते लढाई विसरून पुन्हा लाडीगोडी करायला रिकामे. पारवे मूक असतात असे मुळीच नाही. जवळून ऐका. त्यांच्या घुमण्याचा आवाज किती मोठा असतो ते. कबूतरखान्याजवळ उभे राहून बघा एकदा. त्यांच्या गुटरगुमने डोके उठायला लागते.

पारव्यासारखा सारखी पिसे उचकणारा पक्षी दुसरा नसेल. त्यांच्या त्या सतत पिसे उचकण्याने आजूबाजूची हवा पिसांनी भरून जाते. तुम्हाला अस्थमा किंवा श्वासाचा त्रास असेल तर तुम्ही दहा मिनिटे सुद्धा पारव्यांच्या जवळ उभे राहू शकत नाही, नुसते घुसमटायला होईल.

माणसे भलतीच दयाळू. इतर प्राण्यांना खायला किती घालतात ते रिसर्च करून सांगू, पण पारव्यांना मात्र भरपूर खाऊ घालतात. कबुतरखाना आला की जवळ पारव्यांच्या खाण्याची दुकाने आलीच. जुनी ज्वारी, मक्याचे दाणे, सडलेले गहू, खास पारव्यांच्यासाठी असलेले वाटाणे याचे ढीगच्या ढीग किंवा पोती भरलेली दुकाने जवळ दिसतील.

a

एवढी पोती भरलेली असतात की सगळे हे खाणे पारवे कधी खातात याचा प्रश्न पडेल. पण एक पूर्ण दिवस ऑब्झरव्हेशन करा. दिवसातून तीन चार वेळा कबुतरखाने झाडले जातात. गोळा केलेले धान्य आणि खाणे चाळले जाते आणि पुन्हा रिसायकल होऊन विकले जाऊन पुन्हा कबुतरखान्यांत टाकायला तयार. तेच तेच खाणे पुन्हा पुन्हा पैसे मिळवून देत असावे.

मुंबईतं कबुतरखाने असावेत की नसावेत यावरचा वाद किंवा "चर्चा" रामायण किंवा महाभारताच्या काळापासून चालू असाव्यात. जेवढे दुष्ट लोक पारवे नकोत असे म्हणतात आणि विरोध करतात त्यापेक्षा ज्यास्त दयाळू लोक पारवे कसे चांगले आणि त्यांना दया कशी दाखवली पाहिजे हे ठासून सांगतात. कबुतरखाने जिथेच्या तिथेच रहातात.

मुंबईकरच नव्हेत तर भारतात आणि जगांत शांतिदूतप्रेमी असंख्य असावेत. पॅरिस, रोम, लंडन, न्यूयॉर्क मध्येसुद्धा पारव्यांच्या खास जागा आहेत. खूप म्हणजे अगदी लाखांनी पारवे तिथेही असावेत.

मला कधीतरी प्रश्न येतो डोक्यांत, आपले पारवे नेऊन तिथे सोडले तर तिथले पारवे त्यांना कशी ट्रीटमेंट देतील? भांडतील का की त्यांच्याशी जुळवून घेतील? पारवे युद्धखोर नक्की असतात हे आम्ही जवळून पाहिले आहे, त्यांत युरोप आणि अमेरिकेतले पारवे कसे असतील? मग त्या पारव्यांच्यांत वर्ल्ड वॉर होईल का की आपले पारवे त्यांच्यात मिळून मिसळून जातील?

a

पारव्यांच्या भांडभांडीत काचा फुटल्या आहेत, वस्तू पडल्या आहेत आणि तारा तुटल्या आहेत. पारव्याच्या पंखांत खूपच शक्ती असते. त्यांचे पंख त्याला साठ सत्तर किलोमीटर स्पीडने तासनतास उडवू शकतात. त्यांच्या चोची तर एकदम टोकदार. नजर तीक्ष्ण. मेंदू छोटा. विसराळूपणा अतीव, पारवा समोर न दिसणारी गोष्ट लगेच विसरून जातो कारण त्यांच्या मेंदूमध्ये एवढी मेमरीच नसते. म्हणजे लढाया करणाऱ्या सैनिकाच्या सगळ्या प्रॉपर्टीज व्यवस्थित असतात, तरीसुद्धा त्याला शांतिदूत म्हणावे हे मनुष्य स्वभावाच्या डबल स्टॅण्डर्ड्सना अनुसरूनच आहे.

पारवे म्हणे कुठेही नेऊन सोडले तरी पुन्हा आपल्या मूळ जागी परत येऊ शकतात. मग इथले पारवे अमेरिकेत किंवा युरोपमध्ये किंवा दक्षिण आफ्रिकेत नेऊन सोडले तर ते परत येऊ शकतील का? आले तर किती दिवसांनी येऊ शकतील? पारव्यांच्या या होमिंग स्वभावामुळे त्यांना पोस्टमनची कामे दिली आहेत, ज्यास्तकरून युद्धाच्या वेळी. पत्र नेणाऱ्या पारव्याला कोणी गोळी घालून मारत नाही.

तसे का असेना, पारवा त्यांच्या त्या शांत दिसणाऱ्या रूपाने, त्याच्या मूकपणामुळे, त्याच्या अश्या वरकरणी प्रेमळ दिसणाऱ्या स्वभावामुळे, त्याच्या समाजप्रेमामुळे शांतीदूत म्हटला गेला आहे यांत काही वादच नाही.

पुढच्या वेळी सरकारी समारंभाच्या शेवटी पारवे सोडले आकाशांत तर टाळ्या वाजवा जोरांत. उडणारे पारवे शांतीचा संदेश देताहेत तुम्हाला.

अजून एकदा सीमोल्लंघन

नवरात्र संपले, दसरा उजाडला, मोरूचा बाप मोरूला म्हणाला, "मोरू ऊठ, रात्रभर जागून आता हे लोळणे पुरे. हे पहा मी तुझ्यासाठी नवे पुस्तक आणले आहे. त्याचा अभ्यास कर."

मोरू डोळे चोळत उठला. कसेतरी दोन तासांत आन्हिके केली आणि बापासमोर उभा राहिला. "म्हणाला हा बघा उठलो, आता सांगा कसले पुस्तक आणले आहे माझ्याकरता तुम्ही ते".

मोरूचा बाप 1948 बॉर्न होता. त्याने आणलेले "लोकांशी मैत्री कशी करावी आणि सांभाळावी" हे पुस्तक मोरुसमोर धरले. मोरूने एक नजर टाकली फक्त त्या पुस्तकाच्या टायटलवर.

"बाबा, तुम्हाला काही समजत नाही. मित्र काय पुस्तक वाचून करायचे असतात का? मी दाखवतो मित्र कसे होतात ते". मोरू त्याच्या बापाला घेऊन त्याच्या कॉम्प्युटर टेबलापाशी गेला. कॉम्प्युटर चालूच होता, स्लीप मोड मध्ये. बापाने माउस हलवल्याबरोबर स्क्रीन ऑन झाला. "माझे किती मित्र आहेत ते दाखवतो".

a

फेसबुक अकाउंट उघडले, पन्नास साठ मेसेजेस येऊन पडले होते. मोरू म्हणाला, "बघा किती मित्र आहेत माझे. मी काही पुस्तक वाचून नाही मिळवले हे. आणि मला लाइक्स किती आल्या आहेत ते तरी बघा".

मोरूचा बाप बघत होता, त्याने काहीही रिऍक्शन दाखवली नाही. ते बघून मोरू म्हणाला, "तुमचे किती मित्र आहेत ते सांगा, दोनचार असतील असले तर".

बाप खदखदून हसला, मोरूला म्हणाला, "अरे बाळा, फेसबुक वरचे मित्र खरे असतात का? ते कुठे रहातात कसे दिसतात हे तरी तुला सांगता येईल का? इंटरनेट वरचे सगळे खरे मित्र आहेत असे धरून चालतोस का तू? एकदा भेटून दाखव तुझ्या या सर्व मित्रांना आणि मग पुन्हा ये माझ्याकडे".

मोरू तसा शहाणा होता, थोडासा तरी बापाच्या वळणावर गेला होता. त्याच्या लक्षांत आले बाप काय सांगतो आहे ते.

त्याने हळूहळू एक एक मित्र निवडला त्याच्या फेसबुक, ट्विटर आणि व्हॉट्सॲप अकाउंट वरून आणि त्याला कॉंटॅक्ट करायचा प्रयत्न केला. त्याने पाहिले की त्यांचे काहीही कॉन्टॅक्टस मॅच होत नाहीत की फोन नंबर लागत नाहीत. चार पाच फेसबुक मित्रांशी बोलायला मिळाले. तेही "तुम कौन हो, मैं नहीं पहचानता" असे म्हणाल्यावर मोरू अगदी दचकून गेला, त्याच्या फोनला कुणीही सरळ उत्तरही देईना, संभाषण करणे दूरच राहिले.

मोरूचे डोळे खाडकन उघडले. बाप सांगतो ते खरे आहे की काय? खरे मित्र कोण मग? आणि कसे ओळखायचे ते? मोरू चक्रावून गेला. पुन्हा एकदा बापाकडे गेला आणि सरळ खाली मान घालून सांगितले, "बाबा, मला कळले की इंटरनेटचे मित्र खरे नव्हेत ते. मला ते पुस्तक द्या, मी वाचेन आणि खरे मित्र मिळवीन."

मोरुचे बोलणे ऐकून बाप मऊ पडला. त्याने मोरूच्या डोक्यावरून हात फिरवून सांगितले, "मी हीच चूक केली होती. दिसेल त्या प्लॅटफॉर्म वर जाऊन फ्रेंड रिक्वेस्ट भराभर पास करत गेलो. अकाउंट मोठे झाले, माझी छाती गर्वाने भरून गेली, किती माझे फ्रेंड आणि फॉलोवर आहेत ते बघून. मग माझा पाय लचकला त्या स्कूटर ॲक्सिडेंटमध्ये तर पोस्ट करून नुसत्या ईमोजी दाखवल्या या माझ्या फेसबुक मित्रांनी. एकानेही साधी फोनवरून चौकशीही केली नाही काय झाले त्याची. मग मला कळले की खरे मित्र कोण आणि दिखाऊ कोण ते".

मोरू धडा शिकला, त्याने सगळी इंटरनेट अकाउंट बंद करून टाकली. बापाने दिलेले पुस्तक उघडले. पहिलेच वाक्य होते, "राजद्वारे स्मशानेच य:तिष्ठते स बांधव:". मोरुने आपले शाळेतले, कॉलेज मधले, ऑफिस मध्ये जवळचे साथी शोधले. दोन चार फोन झाल्यावर मोरुला कळले की हे लोक त्याला ज्यास्त ओळखतात. त्यांच्याकडेच शेयर करण्यासारखे ज्यास्त आहे आणि तेच येतील आपल्याबरोबर वेळी अवेळी.

a

मोरूने या दसऱ्याला एक नवीन सीमा ओलांडली. भासमान जगावर विश्वास न ठेवता खऱ्या जगातील लोक तो मित्र म्हणून शोधायला लागला आणि ते मिळालेही.

मोरूचा स्वभाव त्याच्या बापासारखाच मनमिळाऊ आणि मित्रत्वाचा होता. त्याला वर्षभरात पाच सहा मित्र मिळाले की जे त्याचे कौतुक नाही करायचे, पण त्याला उत्तेजन द्यायचे, गाईड करायचे आणि त्याच्या चुका किंवा दोष पोटांत घालायचे.

मोरू जसा इतरांकडून शिकला तसे आपणही शिकूया.

इति **पाचा** उत्तराची कहाणी **साठा** उत्तरी सुफळ संपूर्ण.

a

कॉपीमास्टर

सगळ्यांना सगळ्या गोष्टी येतात का? बहुधा नाही. मग आपल्याला त्या दुसऱ्याच्या कला का असू नयेत असे वाटते साहजिक आहे.

दुसरे म्हणजे आपण देवाकडून सगळ्या गोष्टी प्रीलोड करून आणल्या नाहीत. त्या इथेच शिकलो आणि इथेच वापरणार. मग त्या आपल्याला याव्यात कश्या?

अर्थात कॉपी करूनच.

अगदी बालपणीचे आठवून बघा, आठवत असेल तर आणि जेव्हापासून आठवते तिथून. आई बाबांची कॉपी करायची आणि मग कौतुक करून घ्यायचे. कौतुकाने अजून कुणाकुणाची कॉपी करायची ऊर्जा मिळायची. मग दादा, ताई आणि इतर आपले कॉपीचे आदर्श व्हायचे.

आता हा अंगांत भिनलेला गुण जाणार कसा? लेखक लिहितात, गायक गातात, वादक वाजवतात, शिक्षक शिकवतात मग आपल्यालाही हे का जमू नये ही ईर्षा असली नाही तर तुम्ही कसे असाल? मनुष्य ईर्ष्यावान आणि जिगरबाज आहे म्हणूनच तो इतरांवर दादागिरी करतो ना?

a

कॉपी करणे मुळीच वाईट नाही. देवाने आपल्याला बुद्धी, आवाज, कला, शक्ती जी काही द्यायची ती दिली आहे. तसेच आपल्याला आदर्श दिले आहेत. ते आदर्श फॉलो करणे हे आपले काम आहे.

आता आम्हाला लोक विचारतात, तुम्ही लेख का लिहिता, गाणी का गाता, कविता का करता असे. आता आमच्यापुढे मोठे लेखक, महान गायक आणि प्रतिभावान कवी आले म्हणून, सरळ आहे.

फक्त गाण्याचेच घेऊ. आमच्या आयुष्यांत मोहमद रफी, लता मंगेशकर, आशा भोसले, मन्ना डे, हेमंत कुमार सारखे गायक आले. कानांवर मोहिनी घालणारे संगीतकार आले. अर्थपूर्ण गीते लिहून आम्हाला भुलविणारे गीतकार आले. त्यांना साथ देणारे चित्रपट आणि नाटके आली. सुंदर सुंदर चित्रपट, नाटक, शास्त्रीय संगीतातली गाणी आली. मन प्रसन्न झाले.

ऐकून झाल्यावर आपल्याला अशीच म्हणता येतील का अशी उर्मीही आली. आवाज आणि सूर तालाचे ज्ञान आणि समज देवाने दिली आहे. कानसेन तर आहोतच, तानसेन होऊन बघू असे वाटले आहे.

तसे कानसेन सगळेच असतात. तानसेन व्हायला थोडेफार प्रयत्न करावे लागतील. करू की. गाईड कोण? हेच आपले आदर्श, अर्थातच. कसे करायचे? कॉपी करून.

एकदा गाऊन बघायला सुरुवात केल्यानंतर जाणवले की भैय्या, इतके सोपे नाही ते. कॉपी करणे फार लांबची गोष्ट आहे, नुसते तसे म्हणून तर बघा. पण प्रयत्न करणे आपल्या हातात आहे. जेंव्हा अगदी सोपे, कुणीही गाऊ शकेल असे वाटणारे, गाणे पहिल्यांदा म्हणून पाहिले तेंव्हा कळले कसे अवघड आहे ते. महान गायक अजून महान झाले.

पण जमते हळूहळू. देवाने आवाज दिला नाही आम्हाला पण त्याच देवाने प्रयत्न करायचा चिवटपणा आणि चिकटपणा थोडासा दिला आहे.

कॉपी जशीच्या तशी करणे हिमालय चढण्यापेक्षा अवघड आहे पण स्टाईल थोडीफार जमते प्रयत्न करून. पण आता हे केलेले ऐकणार कोण? घरचे बांधीव लोक कधीच कंटाळून गेले. मग आता बाहेरचे शोधूया की.

नुसते गाणे भसाडे वाटते म्हणतात, म्हणून सुसंगत आणि सुसंगीत गायचा शोध लावला. संगीत ओरिजिनल सारखे मिळते आहे. फक्त आपला आवाज, सूर ताल सांभाळणे.

हे कोणत्याही गाण्याला लागू होते. प्रयत्न करून गाणी म्हणता येतात. आणि ऐकणारे आपल्यासारखेच हौशी असले तर ते चिवटपणे ऐकतातही आणि कधीतरी दाद ही देतात.

बास, अजून काय पाहिजे आपल्याला. बडे गायक कॉपी करत नाहीत असे कोण म्हणते? बघा, सगळ्या बड्या गायकांनी कधी न कधी कुणाचीतरी कॉपी केली आहे. आपण कॉपीमास्टर का नाही होऊ मग?

इन फॅक्ट, चांगले कॉपीमास्टर होणे ज्याची कॉपी करतो त्यांना नमन करण्यासारखेच आहे. कॉपी करतांना लाज, लज्जा, शरम सोडून द्यायची असते, नाहीतर तुम्ही कॉपी कशी करणार? उत्तम कॉपीमास्टर उत्तम शिक्षकही होतात. इतिहास साक्ष आहे. शोधून बघा.

तर भाऊ, आपल्याला अगदी आवडेल कॉपीमास्टर म्हणून घ्यायला.

ज्यांना नाही आवडत ते कधीच कुणाची कॉपी करत नाहीत का? तुम्हीच रिसर्च करून सांगा.

सायकल आणि मी

फ्री लान्स सर्फिंग आणि वाचन करतांना कोणता विषय समोर येईल याची काही सांगता येत नाही. आता बघा ना, वाचत होतो बोटींचे वर्णन आणि लिंक मिळाली "व्हेईकल्स" अशी. जरा चाळली ती लिंक तर त्यांत बायसिकल ची लिंक मिळाली. गाडी तिकडे वळली आणि आमचा सायकलिंग चा इतिहास आठवला.

कळायला, म्हणजे दिसले ते लक्षांत रहायला, लागल्यापासून सायकली आठवतात. अहमदाबाद चा दूधवाला भय्या सायकलीवरून दुधाची बरणी आणायचा ते मात्र आठवते.

मुंबईला आल्यावर एकंदरीतच रस्त्यावरची गजबज, ट्रॅफिक बघितली तर ट्राम बस सोडून कुणी सायकल वापरत असेल असे काही दिसत नव्हते. मुळांत मुंबईसारख्या शहरात लहान मुलांना सायकल कोण चालवू देणार? मग सायकल शिकणे अजिबात जमले नाही. अगदी १९६८ पर्यंत.

पण संधी आली नंतर. १९६८ मध्ये गणोबांनी गाडी सायडिंगला लावल्यावर परीक्षेअगोदरचा "अभ्यास" करायला मिरजेला मुक्काम केला होता, तेंव्हा मावशी म्हणाली सायकल शिकून घे. मिरजेचा दिलीप जोशी लांबचा नातेवाईक पण अगदी जवळचा साथीदार. तो म्हणाला "मी शिकवतो, त्यांत काय आहे. दररोज अर्धा तास चालवायची, दोन दिवसांत येईल".

a

असा काहीतरी पुश लागतो बघा. जी गावातली मुले आठ नऊ वर्षांची असतांना सहज शिकतात ते आम्ही चांगले वीस वर्षाचे घोडे झाल्यावर का कू करत शिकलो. सायकल शिकतांना पहिली राऊंड खास असते यांत काही शंका नाही. ते सायकलचे लटपटणे, एक दोनदा सायकलने लोळण घेणे, आपले गुडघे कोपरे खरचटणे, पॅन्ट सायकलच्या चेन मध्ये अडकून पडणे, साईडच्या कुंपणात किंवा गटारांत किंवा रस्त्या शेजारच्या खांबावर सायकल आपोआप जाणे वगैरे एकदा तरी अनुभवले पाहिजे.

पण आमची उंची आणि जिद्द भारी होती. गुडघे टेकत होते जमिनीला जवळ जवळ. पहिल्या दोन चार लटपटण्यांतच जमले बॅलन्स करायला. दिलीप जोशीची सायकल एकदोन वेळा पाडल्यानंतर त्याला एवढे टेन्शन देणे बरोबर नाही असे जाणून सायकलच्या दुकानातून भाड्याने दहा पैसे तास अशी सायकल मिळवली. दोन दिवसांत मिरजेच्या मळेकर रस्त्यावर वर खाली चालवायला जमू लागले.

मग एक ट्रिप सांगलीला केली. जमले. उतरतांना जरा सांभाळणे की जमते हे समजले. सायकल आपली साथीदारीण झाली.

पुन्हा कॉलेज जॉईन केल्यावर सायकलची खरी उपयुक्तता दिसली. दहा पैसे तासाला देऊन बस ट्रेन पासून मुक्ती मिळाली आणि वेळेचे स्वातंत्र्य. कधीही यावे जावे, ट्रिप कराव्यात, नुसते "पंछी बनू दौड़ता फिरूं मस्त राहों पर". स्वतःची सायकल असणे अजूनही परवडत नव्हते. पण असली तर कोणती असावी?

a

१९६०-७० च्या सुमाराला सायकली कोणत्या मिळत होत्या आणि त्यांच्या किमती कश्या होत्या? रज, रॅले, रॉबिनहूड, ऐटलास, हिरो अश्या सायकली होत्या किमती आता आठवत नाहीत नक्की पण चार पाचशे रुपये नक्की होती किंमत. रेसर सायकली तश्या विरळाच. एटलास सायकल म्हणजे गरिबांचा अमिताभ बच्चन. पण अजून अमिताभ बच्चन दिसायला लागला नव्हता मग गरिबांचा धर्मेंद्र! एटलास सायकल चालवायला भारी जड. खरे दर्दी रॉबिनहूड सायकलचे भक्त.

गावातल्या मित्रांच्या स्वतःच्या सायकली होत्या. त्यांना लहानपणापासून सायकलीची संवय होती. बहुधा नेहमी सायकल त्यांच्या "अंगाला" चिकटलेली असायची.

सायकली भाड्याने मिळायची दुकाने होती खूप. त्या सायकलींचा मेक काय होता ते कोण पहातो? चांगल्या रगडून वापरलेल्या असायच्या त्या. घंटा, चेनगार्ड, दिवा फार लांबची गोष्ट होती. ब्रेक लागले तरी खूप झाले. पण भाडे मात्र सहज परवडण्यासारखे होते. फक्त सायकल भाड्याने घेतांना ब्रेक "अर्जंट" करून घ्यायचे. हां, सायकलचा दिवा मात्र आमचा स्वतःचा, तो आमची टॉर्च बनला.

मग सांगलीच्या बँकेतून आपला अलाऊन्स आणायला जायचे तर लंचला दांडी मारायची आणि एक दीड तासात जाऊन यायचे सांगलीला. तेवढाच व्यायाम आणि वेळेची आणि पैश्यांची बचत.

a

एक दोन वेळा कोल्हापूरला सायकल ट्रिप केली. पहिल्या ट्रीपला जातांना काहीही भयंकर वाटले नाही. दिलीप जोशी होताच बरोबर. तो तर कसलेला सायकल पटू. पक्का मुरलेला. चांगला गोव्याच्या ट्रीपा करून आलेला. त्याच्या बरोबर जातांना काय चिंता.

हॉस्टेल पासून जयसिंगपूर आरामांत गाठले. तो निमशिरगावचा घाटही आरामांत पार केला. कोल्हापूरला "द फॅनटास्टिक व्हॉयेज" पिक्चर पाहून परत निघालो. हातकणंगले पार होईपर्यंत काहीही अडचण आली नाही. मग चढ सुरू झाल्यावर मात्र पाय अगदी मंदावले. दिलीप टोकत होता सायकल ओढत होताच, पण पायातली ताकदच संपली होती. मग तिथेच त्याने सांगलीला नेण्यासाठी आणलेली सगळी भेळ संपवली. जरा जीवांत जीव आला. मग पोचली आमची वरात हॉस्टेल पर्यंत. संध्याकाळी हॉस्टेलवरून निघालेले आम्ही पहाटे चार पाच ला परत आलो हॉस्टेल वर.

पण दुसऱ्या तिसऱ्या ट्रिप ला अशी अडचण नाही आली. आरामांत झाल्या त्या.

मुंबईला परतल्यावर पुन्हा सायकल दुरावली. पुन्हा एकदा ट्रेन आणि बस मागे लागल्या.

टाटा कन्सल्टींग इंजिनियर्स मध्ये जॉईन होऊन दोन तीन वर्षे झाल्यावर पोट सुटायला लागले आणि बैठ्या कामामुळे तब्येत ही थोडी लूज व्हायला लागली. हे काही चालणार नाही असे वाटल्याबरोबर सायकलीची आठवण झाली.

a

साडूची सायकल ट्रायल म्हणून आणली पुण्याहून मोटारीच्या कॅरियरवर टाकून. मुंबईत शनिवारी रविवारी चकरा मारायचा कार्यक्रम सुरू झाला. ट्रॅफिक मध्ये ही सायकल चालवणे जमायला लागले. मग शिवाजी पार्क पर्यंतची रेंज वाढत वाढत कुलाबा, अंधेरी, घाटकोपर पर्यंत वाढली. शनिवारच्या सायकल ट्रिप बोरिवली, पनवेल, ठाण्या पर्यंत जमायला लागल्या. एकदा तर दादर, दहिसर, ठाणे, चेंबूर आणि दादर अशी ट्रिप केली.

मग सरळ ऑफिसला सायकलने का जाऊ नये असा विचार आला मनांत. एका शनिवारी ट्रायल केली. आरामांत जमली.

१९९०च्या पावसाळ्यांत साडूची सायकल गंजायला लागली, अगदी वापरांत असूनही. मग त्याची त्याला पुन्हा पुण्याला पोचवली आणि नवीन बीएसए एसएलआर सायकल घेऊन टाकली. ऑफिसला सायकलनी जाणे अजिबात अडचणीचे नव्हते. परत संध्याकाळी येताना मात्र रस्त्यावरची ट्रॅफिक थोडी अडथळ्यांची शर्यत असल्यासारखी व्हायची.

पण दक्षिण मुंबईचे रस्ते सगळे वापरून झाले सायकलने. आमचे ऑफिस कर्नाक बंदरला, घर दादरला, मध्ये कुठे कुठे वन वे रस्ते. ट्रॅफिकचे नियम तर सगळे पाळायचे. मग ऑफिसला जाताना आठ ते पंधरा किलोमीटर आणि परत येताना दहा ते बारा किलोमीटर, अशी दिवसांत वीसेक किलोमीटरची फेरी व्हायची.

a

एकदा सायन ते कांदिवली सायकल रेस मध्ये भाग घेतला. सायनला असलेला फुल कॉन्फिडन्स बांद्रा येईपर्यंत डळमळायला लागला कारण रेसमधले निष्णात सायकलपटू जागाच देत नाहीत ते दिसले. वांन्द्र्यापासून खरी रेस सुरू झाली. खार येई पर्यंत सगळे रेसवाले पुढे निघून गेले. पण चिकाटी सोडायची नाही असा पण करून कांदिवली पर्यंत जाऊन परत वांद्र्याला येईपर्यंत रेस संपली होती. आणि ते विजेते आपले बक्षीस घेऊन गेल्याला तास दीड तास झाला होता. बटाटे वडे आणि चहा कधीच संपून गेला होता. मुलगे, आई आणि बायको वाट पहात उभे होते. त्यांना कोणी कोणी सांगत होते की दोन तीन लोक अजून आहेत मागे आणि येताहेत म्हणून. वाट पाहात होते आमची.

पण रेस सायकलीवरूनच पूर्ण केली. हेही काही कमी नव्हते. सत्तर किलोमीटर झाली फेरी.

ज्या कारणासाठी सायकल आणली आणि वापरली ती हेतू मात्र पक्का साध्य झाला. ट्रेन पासून सुटका झाली. तब्येत बरीच सुधारली. पण ती सायकल? तीन एक वर्षांत पार म्हातारी झाली. सहा सात टायर बदलून झाले, मडगार्ड गंजून त्यांची चाळणी झाली, ते टाकून दिल्यावर रस्त्यावरची चिखल माती कपड्यावर उडून बायकोची "सोशल पोझिशन डॅम" व्हायला लागली. कधी कधी तर अवतार असा व्हायचा घरी आल्यावर की खालीच शर्ट बदलायला लागायचा.

मुंबईतले सायकल चालवणे आपल्या सारख्या व्हाइट कॉलर मध्यम वर्गीयाला असे अडचणीचे होते बघा. मुलांना सायकली घेऊन दिल्या पण त्या बिल्डिंगच्या आवारांत फिरवायचा. एक खेळणे म्हणून.

सायकल ही मोठी सोय नक्कीच आहे. आता अप्पर मिडल क्लास आणि लोवर रिच क्लास दोघांना पुन्हा सायकल आवडायला लागली आहे. कोणी कोणी डॉक्टर्स, इंजिनियर्स आणि वकील मंडळीसुद्धा सायकल ग्रुप करून शनिवार रविवार सायकल पिकनिक करायला लागली आहेत.

मुंबईतल्या सायकली मोजल्या तर पुण्यातल्या सायकलीं पेक्षा ज्यास्त असतीलही कदाचित पण मुंबई मोठी आहे म्हणून सायकली कमी आहेत असे वाटत असेल. एकदा मोजून पाहिले पाहिजे. कुणाकडे आहे का अशी आकडेवारी?

पुणे एकेकाळी सायकलींचे शहर होते. माणसांपेक्षा सायकली ज्यास्त आहेत की काय असे वाटण्यासारखे. तर तिथे असे सायकल क्लब होतील यांत काय नवल. पुण्यातले हे सायकल क्लब आता चांगल्या इव्हेंट्स करतात. रेसेस, रॅलीज करतात. डोंगर दऱ्या मधून ट्रिप्स काढतात. घाट चढण्या उतरण्याच्या शर्यती लावतात.

चांगले उच्चविद्याविभूषित, वेल टू डू लोकही भाग घेतात त्यांत. त्यांच्या सायकली ही शो पीसेस असतात. एक चार लाख रुपयांची सायकल पाहिली आहे मी. वायरलेस गियर्स आहेत तिला आणि कार्बन फिलामेंटची फ्रेम आहे. आता आपल्या मोटारींपेक्षा सायकली अभिमानाच्या गोष्टी झाल्या आहेत.

a

मुंबईत हे थोडे कमीच आहे. मुंबईतली अंतरे खरीच ज्यास्त आहेत. बघा दादर ते ठाणे चांगले तीस किलोमीटर आहे. इकडे बोरिवली दहिसर असेच तीसेक किलोमीटर आहे. अगदी नवी मुंबई सुद्धा वीस पंचवीस किलोमीटर लांब आहे. जरा पुण्याशी किंवा कोल्हापूरशी ताडून बघा. दुसऱ्या गावाला गेल्यासारखे आहे.

पण आता जाणीव येते आहे. फिटनेस कडे थोडे लक्ष गेले आहे. पुन्हा एकदा सायकल चालवायला सुरुवात केली आहे. अगदी आमच्या घरी सुद्धा गियर वाली सायकल आणली आहे आता. गियरची संवय करायला जरा वेळ लागतो. पण सोय चांगली आहे. आतापर्यंत एका गियरची सायकल चालवली आता गियर बदलणारी चालवून बघू. पण आता थोडी जपून. पडणे, हाडे मोडणे आता परवडायचे नाही. पण फिटनेस ठेवायला बरी आहे ही युक्ती.

सायकल गंजते मुंबईत त्याला काय करावे. इथे लाकूड सुद्धा गंजते. पण ही आहे तो पर्यंत तिची मजा घेत राहू.

सायकल चालवणे, फिट रहाणे आणि सायकल ट्रिपांच्या बढाया मारणे यातही चांगले सुख आहे.

करून बघा, आवडेल.

हमारे हसीन सपने

हमने एक सीरियल देखी थी, "मुंगेरीलाल के हसीन सपने"।

हमारी नजरमें मुंगेरीलाल एक सीधा साधा इंसान था। या होगा। न ज्यादा सीखा, लिखा पढ़ा। ना बड़ा कलाकार, ना कोई असामान्य व्यक्ति। ना कोई लीडर, ना कोई ऐसा इंसान जिसे लोग सर कंधोपर लिये फिरें। हमारी नजरमें एक आम जनता का प्रतिनिधि।

फिरभी सपने तो सब देख सकते हैं। हम भी क्यों न देखे?

अब हमारे सपने हसीन हो या ना हो, ये तो हमपर पर है ना?

हम भी देखते हैं सपने। हसीन हो या ना हों। ये तो हमपर ही छोड़ दीजिये ना।

हमारा पहला हसीन सपना

वे दुष्ट पश्चिमी लोग पूरे नेस्तनाबूद हो गये हैं। हमारा भारत अब दुनियाका लीडर बन चुका है। जिन दुष्ट लोगोंने हमारे देश के टुकड़े टुकड़े कर दिये उन पर हम मात कर चुके हैं।

a

हमारे पड़ोसी देश जो कभी हमारे देशके ही भाग थे, उनको अब उनकी गलतियाँ समझ आयी हैं और हमारा देश फिरसे एक हो गया है, जैसे उन्नीसवीं शतकमें था। हम फिरसे अखंड भारतवर्ष हो गये गये हैं।

अब हमें इतिहास से सीखना हैं और अपनी ग़लतियाँ फिरसे नही करनी हैं। अब हमारे देश में केवल एक धर्म और जनजाति है, भारतीयता।

हम युद्धके परिणाम अवश्य जान गये हैं और उनसे हम दूर रहना चाहते हैं। लेकिन दुर्बल रहके हम फिरसे उन गलतियोंकी शिकार नही बनना चाहते। इसलिये हमारा सैन्यदल अब जमीन, आसमान, सागर और स्पेस इन सबमें श्रेष्ठ हुवा है।

अब हमारी नज़र दूसरे ग्रहोंपर है जहाँ हम अपनी क्षमाशील, उदार, निर्लोभी और भगवानको सर्वश्रेष्ठ माननेवाली संस्कृति फैलायेंगे।

और दिखा देंगे हमारे उच्च विचार, अचार और सभ्यता पूरे विश्व को।

हमारा दूसरा हसीन सपना

हमने पूरी पृथ्वी को एक जैसा समाज बनाया है। अब यहां कोई धर्म नही, कोई जाति नही, कोई सामाजिक भेदभाव नही। सब इंसान बनके रहते हैं।

a

हम अन्य जीवोंको अपना ही रूप मानते हैं अब। उनकी प्रगति हमारी प्रगति है।

अब हमारे नेता, अगर वे अपने को नेता कहते हैं तो, हमपर राज नही चलाते। वे हमारे विश्वबंधुत्व का प्रसार करते हैं। सबको एक जैसा मानते हैं और वैसाही व्यवहार करते हैं। वे अब वोट नही मांगते, केवल आशीर्वाद मांगते हैं।

अब हम अपना कार्य लिखके नही रखते क्योंकि सब हम जान गये हैं कि लिखकर कोई परिणाम नही होता। कोई नही पड़ता लिखा हुआ और सीखता भी नही कोई इतिहास से। तो क्यों लिखे? हमारा वर्तन ही हमारी शक्ति है, हमारा परिचय है।

अब हम संपत्ति, पैसा, भौतिक साधनोंको इकट्ठा नही करते। इनको हम केवल एक अनावश्यक वस्तु मानते हैं।

हमारा तीसरा हसीन सपना

हम जान गये हैं कि हमारा सूरज हमारी सेवा बहुत ज्यादा काल नही करेगा। इसलिए हम अब दूसरी जगाहें ढूंढने लगे हैं। मंगल और गुरु के चंद्र अबसेही हमने काबिज़ कर लिए हैं।

वहाँ की जगह पृथ्वी के जीवोंको सुखद बनायी हैं, और वहाँ नया जीवन शुरू भी किया है।

a

अब हमको अपनी प्रजाति बढ़ाने के लिए स्त्री पुरुष लिंगोंकी जरूरत नही पड़ती। एक एकेले ही हम दूसरे मनुष्य निर्माण कर सकते हैं।

अब हम घर, गाँव, देश नही बनाते। अब हम गुफ़ाओंमें रहते हैं। जो मिला खा लेते हैं और जो मिला पी लेते हैं। शरीर भी ढंकते नही अब। क्या छुपाना हैं हमें?

कोई कहेगा कि ये ही तो हम कर रहे थे उस पृथ्वीपर लाखों साल पहले। सही है। वही ठीक था और वही करना चाहिए था।

हमारी जो प्रगति हुई थी उसके परिणाम हम पूरी तरह जान गये हैं। भगवान ने जैसा रखा वही ठीक था।

"टन टन टन टन"
अरे, ये आवाज़ कैसी?
कोई घंटी बज रही है क्या?

अरे हाँ, सुबह हो गयी। अब काम पर जाना है। ऑफिस साफ करना है। वोट डालना है और शामको पार्टी की मीटिंग में जाना है, नया नेता चुननेके लिये। जिसको चुनेंगे वो हमें भी देगा कुछ न कुछ उसका और उसके परिवार का समाधान होने पर।

चलो फिर, और हसीन सपने फिर कभी देखेंगे।

a

शेंगेतले मटार

समजा, आपण सगळे अगदी एकसारखे असतो तर काय झाले असते? तसे आपल्याला पक्षी, किडे, मासे आणि काही दुसरे प्राणी वाटतातच. आपली नजर काही त्यांच्यातले फरक ओळखू शकत नाही. व्यंकटेश माडगूळकरांच्या बनगरवाडी मध्ये एका ठिकाणी म्हटले आहे, सगळी मेंढरे सारखीच कशी असतील, त्यांच्या बापाचे, आज्याचे काहीतरी उतरले असेलच ना त्यांच्यांत?

सरळ आहे, आपण आपल्यासारखे नसतोच. मी कोण आणि असा कसा झालो असा प्रश्न माणसाला कधीचा पडला आहेच. क्रोमोसोमच्या तेवीस जोड्या आई बाबांकडून मिळवूनच आपण तयार झालो आहोत.

आता मला सांगा, आंबे भारतात झाडावर आले काय किंवा ब्राझील मध्ये झाडावर आले काय, जवळ जवळ तसेच दिसतात आणि चव ही तशीच लागते. कावळे चिमण्या जगभर सारख्याच दिसतात आणि वागतात. मासे तर इतके सारखे दिसतात की जश्या झेरॉक्स कॉपीज असाव्यात. दक्षिण ध्रुवाजवळ आणि उत्तर ध्रुवाजवळ रहाणारे काही पक्षी इतके एकसारखे दिसतात ती स्त्री आहे का पुरुष हेही ओळखता येत नाही. नाही म्हणायला काही कावळे पांढरे, पारवे काळे करडे किंवा हिरवे असतात, आणि हो, काही वाघ पांढरे असतात. पण ते कधीच आपसात भेदभाव करतांना दिसत नाहीत.

a

मग माणसेच अशी वेगवेगळ्या रंगांची, आकाराची आणि रूपांची का झाली आहेत. मटाराच्या शेंगेतले मटार अगदी एकसारखे दिसतात तशी का नाही झाली?

तुम्हीच बघा. काही बर्फासारखी पांढरी, काही डांबरासारखी काळी, कोणी उंच तर कोणी अगदी बुटके, डोळ्यांचे रंग तर विचारूच नका, निळे, काळे, हिरवे, पिवळे, राखी आणि करडे, आणि त्यांचे मिश्रण असलेलेही. लांब नाके आणि चपटी नाके. केसांचे एवढे प्रकार. असे का झाले? सगळी माणसे जर होमो सॅपीयन्स प्रजातीची आहेत तर एवढे फरक का झाले?

कातडीच्या आत सगळी माणसे अगदी एकसारखी असतात हे वैद्यकीय शास्त्र सुद्धा सांगते. कदाचित असे असेल की इंद्रधनुष्य माणसांना खूप आवडते. त्याचे रंग कसे एकमेकांत मिसळत स्वतःचे अस्तित्व दाखवतात, तसे माणसांनी दाखवावे अशी विश्वनियंत्याची इच्छा असावी. म्हणून त्याने माणसांची रूपे अशी बहुविध केलेली असतील.

आपल्याकडचा कावळा किंवा गरुड दुसरीकडे नेऊन सोडला तर तो तिथे मिसळून जाईल का बदलून जाईल? मग ध्रुवा कडला एस्किमो आफ्रिकेतल्या जंगलांत नेऊन सोडला आणि आफ्रिकेतला पिग्मी सायबेरियांत नेऊन सोडला किंवा वाळवंटातले अरब दक्षिण अमेरिकेतल्या रेन फॉरेस्ट मध्ये नेऊन सोडले तर ते तसेच राहातील की बदलून जातील?

बहुविधते मध्ये एकात्मता असे देवाचे प्लॅन्स असावेत.

समजा माणसे पापलेट माश्यासारखी अगदी एकसारखी असती तर काय झाले असते? एक तर एकमेकांत काही फरक सांगताच आला नसता? सगळेजण शेंगेतल्या मटारासारखे आवळे जावळे झाले असते. स्वभाव, बोलणे चालणे एक सारखे असते का? मग माणसांनीं अशी युद्धे केली असती का?

तसे इतर प्राणीही युद्धे करतात पण बहुधा एकमेकांना एवढ्या प्रमाणांत मारत नाहीत, थोडी दमदाटी करतात आणि सोडून देतात. अगदीच विरोध केला तर थोडासा प्रसाद देतात. तसे झाले असते का? माणसेच एवढी ज्यास्त माणसे मारतात.

समजा माणसे अगदी एकसारखी असती दिसायला आणि वागायला तर हे धर्म, त्या जाती पाती, हे दिसण्यावरून होणारे फरक निर्माण होण्यापासून आपली सुटका झाली असती का?

माणसाची जात फारशी मिक्स नाही झाली एकमेकांत. वेगवेगळे लोक वेगवेगळ्या ठिकाणीच राहिले म्हणून त्यांच्यातले फरक अजून गडद होत गेले. जर कोणी महान विश्वात्मा झाला आणि त्याने मानवजात अगदी पूर्ण मिक्स होईल अशी व्यवस्था केली तर माणसांच्यांत एकी निर्माण होईल का?

a

आणि समजा तसे झाले तर आपल्याला आवडेल का तसे? चॉईसचा काही संबंधच रहाणार नाही. कोणीही कोणाबरोबरही राहावे. पुढची प्रजाती त्या शेंगेतल्या मटारांसारखी झालेली आवडेल का आपल्याला?

की बुवा आहे तेच ठीक आहे, काहीतरी सिलेक्शन करता येते आहे. इंद्रधनुष्याची मजा त्यांतल्या रंगांमुळेच येते. सगळे रंग मिसळले तर पांढरा रंगच तयार होतो, त्याला नाही काही वैशिष्ट्य की विविधता.

प्राण्यांना वेगळ्या रंगांची पिल्ले झाली तरी त्यांची आई त्यांच्यांत काहीही फरक करत नाही. तिला आपली सगळी पिल्ले सारखीच.

देवाचेही तसेच असेल. कोणत्याही रंगांची, आकाराची आणि स्वभावाची माणसे त्याने तयार केली तरी त्याला सगळी आपलीच वाटत असणार.

बरं झालं, सगळे मटार, सगळे गहू, सगळे मासे, सगळे पक्षी, सगळे प्राणी एकसारखेच दिसतात त्यांच्या प्रजाती प्रमाणे. नाहीतर त्यांच्यामधून सिलेक्ट करतांना माणसांना वांधे यायचे.

गूढ विज्ञान, सत्य की आभास?

आपण बऱ्याचदा वाचले ऐकले आहे की अमुक अमुक व्यक्तीकडे काहीतरी विशेष आहे आणि तिच्याकडे काहीतरी विशेष शक्ती आहे जी संकटांवर आणि आजारांवर मात करू शकते आपल्या आणि इतरांच्याही.

कधीतरी नाके मुरडून सोडून देतो. कधीतरी त्या व्यक्तीची परीक्षा घ्यायला बघतो, कधीतरी त्या शक्तीचा अनुभव घ्यायला जातो आणि कधीतरी अगदी लोटांगण घालत त्या व्यक्तीचे अगदी भक्त होतो.

अशी शक्ती किंवा असे ज्ञान त्या व्यक्तीला तरी माहीत असते की नाही हेही आपल्याला कधी कधी कळत नाही.

वरून अगदी सामान्य दिसणाऱ्या व्यक्ती काही वेळा अश्या बदलून जातात की विश्वास बसणार नाही अश्या गोष्टी बोलून जातात आणि करून जातात.

भौतिक शास्त्रे मूळ कल्पना, कार्यक्रम, टेस्टिंग, रिझल्ट्स आणि मग डेटाबेस अश्या मार्गाने जातात. त्यांना एक दिशा असते, मग ती बरोबर असो की चूक. पहिली पहिली शास्त्रे जे दिसते त्यावर बेतलेली झाली. खगोलशास्त्र, बायोलोजी, आल्केमी, अशी. त्यांना दिसणाऱ्या गोष्टींचा बेस होता, कुणीही तपासून बघू शकत होते. सर्वमान्य झाली.

काही गोष्टी सांगताच येत नाहीत. समजणे आणि उमजणे तर दूरच. मन म्हणजे काय, प्राण्यांना चालना कशी मिळते, झोप का येते, स्वप्ने का पडतात, मुळांत स्वप्ने म्हणजे काय, मग जाग का येते, कोमा म्हणजे काय, मृत्यू म्हणजे काय, मुळांत जीवसृष्टी झालीच कशी, मग इतर ठिकाणी तशी असेल का, भूत असते का, ते का निर्माण होते, काही भुते प्रेमळ आणि काही क्रूर का असतात, देव असतो का, तो नक्की काय करतो, अतींद्रिय ज्ञान म्हणजे काय, आणि ते कोणा कोणालाच असते की सगळ्यांना. असल्या गोष्टी.

या गोष्टींना प्रूफ दाखविणे कठीण, जवळ जवळ अशक्य आहे. मानवी मन फार गहिरे आहे यांत काही शंका नाही. कधी कधी ते दिसणाऱ्या गोष्टींना भीत नाही पण न दिसणाऱ्या गोष्टींना भिते.

तुम्हाला भानामती, भूतप्रेत, जारण मारण, करणी, नारायण नागबळी, अंगात येणे, बिब्याच्या फुल्या उमटणे, वेड लागलेल्या व्यक्तीच्या अंगातून धूर येणे, त्या गुरवाने किंवा बंगाली बाबाने धुनी पेटवून चाबकाचे फटकारे मारत भुताशी संवाद करणे, मग भूत गेले आता सर्व छान होईल असे डिक्लेयर करणे, आणि खरेच कधीकधी तसे होणे अश्या गोष्टी माहीत असतीलही आणि तुम्ही त्या नाकारल्या असतीलही.

आणि ते संख्याशास्त्र? अजूनही लोक आपले नाव, गाडीचा फोनचा नंबर खास संख्याशास्त्रात बसेल असा करून घेतात. लकी नंबर, लकी चार्म, लकी ज्योतिषी, लकी दिवस याची काही वानवा नाही. सिनेमांची, नट नट्यांची नावे बदलून टाकली आहेत.

अजूनही बरेच लोक विश्वास ठेवणारे आहेत असेच दिसते. गूढ अनुभव कसा असतो ते अनुभवल्या नंतर सांगता तरी आला पाहिजे ना? आपल्याला आपली स्वप्ने सुद्धा सांगता येत नाहीत बहुतेक वेळा. काहीवेळा जागे झाल्यावर स्वप्ने आठवून फ्रेश कसे वाटते आणि काहीवेळा निराश का वाटते ते सांगता येते का?

कार्य करतांना मुहूर्त पाहणे, लग्नाच्या वेळी पत्रिका उघड किंवा गुपचूप पहाणे, बाळाची नाळ पुरणे, देवपूजा करणे, देवांना कोंबडी, बकरा किंवा रेड्याचा नैवेद्य दाखवणे, काकबली ठेवणे, क्रूर वाटणाऱ्या प्राण्यांची पूजा करणे अश्या गोष्टी नक्की पाहिल्या असतील.

शेवटी सगळे मनाचे खेळ आहेत आणि असे होत असेलही पण मी मानत नाही, असे म्हणणे अगदी सोपे आहे. अतींद्रिय ज्ञान किंवा शक्ती असलेले लोक खूप कमी असतात. ते काहीही सिद्ध करू शकत नाहीत. त्यांच्या कडे कोणताही डेटाबेस नसतो, कोणतीही प्रोसिजर नसते, असे बहुतेक लोक खूप शिकलेले नसतात, मग त्यांच्यावर अंधश्रद्धा म्हणून आळ घेऊन त्यांना बाजूला टाकता येते.

स्वप्न म्हणजे नक्की काय आणि ते का पडते एवढेही कोणी सांगू शकलेला नाही. आज झोपल्यावर कोणते स्वप्न पडणार आहे ते सांगू शकता का? हे तर नेहमीच्या झोपेच्या स्वप्नांचे झाले. दिर्घनिद्रा किंवा कोमा मध्येही स्वप्ने पडतात का, आणि ती कशी असतात? कोण सांगू शकणार?

a

जर नेहमीच्या झोपेत स्वप्न पडते तर ते दिर्घनिद्रा किंवा कोमामध्ये पडतच असेल.

फ्रॉइड आणि इतर मानस शास्त्रज्ञांनी थोडेतरी संशोधन केले आहे. त्यांना तरी आपण सिरीयसली घेतो का. ते ही स्वप्ने का पडतात आणि त्यांना काही अर्थ असतो का आणि तो अर्थ काय हे सांगू शकतील का? असे असूनही मानस शास्त्रज्ञांचे उद्योग चालतात नीट. ज्योतिषी बरा धंदा करतात. ब्रम्हवृंद सतत बिझी असतो.

पूर्वी हिमालयांत ऋषी मुनी जायचे, विचार मंथन, संशोधन, म्हणजेच तपाचरण करायचे. त्यांची दिनचर्या अगदी साधी, जवळ जवळ वन्य प्राण्यासारखीच ठेवायचे. अगदी वस्त्रे धरून. कशाचा अभ्यास करत असतील ते तेंव्हा? आणि त्यांचे अनुभव काय असतील? निसर्गाला तोंड द्यायचे आणि आपले "तप" म्हणजे संशोधन सुरू ठेवायचे. त्याचा उद्देश काय, शेवटी काय मिळवायचे होते त्यांना?

एक धुनी पेटवली आणि गांज्याची चिलीम पेटवली की आजूबाजूचे काही जाणवत नाही. ट्रान्समध्ये जात असतील. मग जे काही अनुभव त्यांना येत असतील त्यांना गूढ ज्ञान नाही का म्हणता येणार? सर्व शक्तिमान देव, स्वर्ग, नरक, त्या चित्रविचित्र देवता, अफाट विश्व, गूढ प्रकाश, दिव्य संगीत, असेच अनुभव येत असतील. ट्रान्स मध्ये काहीही होऊ शकत असेल.

मुळांत माणूस ट्रान्स मध्ये का जातो, त्याला त्यावेळी अर्धनिद्रा का येते आणि तो जे सांगतो ते कसे माहीत असते त्याला हे कोणी सांगू शकेल का.

आत्मा म्हणजे काय, तो अमर कसा असतो? प्राण जातो म्हणजे नक्की काय आणि कसे होते? अगोदर हृदय किंवा मेंदू बंद पडतो का अगोदर आत्मा निघून जातो? मग त्या लाईफ सपोर्ट वर ठेवलेल्या व्यक्ती जीवन असतात का अगोदरच गेलेल्या असतात? मोक्ष म्हणजे काय आणि त्याने काय होते? मोक्ष पाहिजेच कशाला? जन्म मृत्यूचे सायकल कधी बंद होते? मुळांत ते कधी बंद होते का? देव अमर कसा असतो? मग आत्मा आणि देव एकच का? कोणीतरी समजावून सांगेल का?

नियर डेथ एक्सपिरियन्स असेच असू शकणार नाही का? मग ते गूढ ज्ञान किंवा गूढ विज्ञान म्हणू नये का? प्रत्येक गोष्टीला आपण प्रूफ मागतो का? हा अनुभव घेणाऱ्यांनी शरीराबाहेर येऊन आपलेच शरीर पाहणे, दिव्या गूढ प्रकाश पाहणे, अवकाशात फिरणे, सुरेल शांत संगीताचा अनुभव घेणे असे सांगितले आहे.

हॉस्पिटलमध्ये ग्लानीत पडलेल्या लोकांनी सुरेल संगीत ऐकलेल्याचे, आणि आता नाहीत त्या गेलेल्या लोकांबरोबर संवाद केल्याचे एवढेच नव्हे तर अगदी लाईव्ह डायलॉग केल्याचे मी स्वतः पाहिले आहे.

आपल्या एका मित्राने मला एडगर केसी नावाच्या एका व्यक्तीवर लिहिलेले पुस्तक वाचायला दिले होते. ती व्यक्ती लोकार्थी अशिक्षित किंवा अर्धशिक्षित, सहावी शिकलेली पण अतींद्रिय ज्ञान असलेली. ट्रान्स मध्ये जाऊन अनोळखी

a
लोकांचे प्रॉब्लेम्स आणि त्यावरचे उपाय सुचविणारी, मेडिकल, अध्यात्मिक आणि अगदी जिओलॉजी वरची भाकिते करणारी अशी होती. पुस्तक तर सगळे वाचले पण नेहमीच्या स्वभावाला धरून आणि आमच्या शिक्षणाचा लॉजिकचा उपयोग करून. त्या भाकितांचा उगम कसा होत असेल असा विचार मनात ठेवूनच. पण असे झाले आहे आणि असे झाल्याचे रेकॉर्ड आणि डेटाबेस आहे. मग मान्य करायला लागेलच.

असे असेल, फक्त ते कसे होते ते सांगता येणार नाही. एके काळी पृथ्वीभोवतो सगळे फिरते असेच समजले जात होते, आता तसे समजले जात नाही पण फ्लॅट अर्थ सोसायटी अजूनही आहे. धूमकेतू दिसला तर राजा मरणार, कावळा पिंडाला शिवला तर गेलेला आत्मा संतुष्ट आहे आणि नाही शिवला तर तो रुष्ट आहे, मांजर आडवे गेले तर काम होणार नाही, तीन जणांनी कुठेही एकत्र जाऊ नये, कमीतकमी एक दगड घेऊन जावा म्हणजे पनोती लागत नाही, बिब्ब्याच्या फुल्या दारावर उमटल्या तर प्रॉब्लेम आहे. साडेसाती येणार तर नुसत्या त्या विचारानेच हात पाय गाळणे. माना किंवा न माना, सर्वसाधारण लोक हे मानतात.

शेवटी श्रद्धा किंवा अंधश्रद्धा यातील फरक अतिसूक्ष्म आहे. खरे खोटे कुणीही सांगावे ऐकूया आपण.

श्रद्धा आणि समजुती

या पृथ्वीवरची प्रत्येक पेशी ही एक बुद्धिमान जीव आहे. बुद्धिमान जिवासारखे ती अन्न शोधते, नको ते पदार्थ बाहेर टाकून देते, वातावरणाचे सेन्सिंग करते आणि त्याप्रमाणे पाहिजे त्या रिऍक्शन दाखवते. काही प्रमाणात चलनवलन करते, आपले रक्षण करते आणि आपली प्रजा वाढविते. या सर्व जीव असल्याच्या खुणा आहेत.

कार्बन, हैड्रोजन, ऑक्सिजन आणि इतर मूलतत्त्वे अंतराळांत आहेत. कार्बन, हायड्रोजन आणि ऑक्सिजन याची संयुगे खूप प्रकाराने होतात. संयुगांच्या साखळ्यासुद्धा होतात. संयुगांच्या निरनिराळ्या सांखळ्या एकत्र आल्या की त्यांची एक सिस्टिम बनते. ती सिस्टीम हुबेहूब आपल्यासारख्या अजून सांखळ्या बनवते. कसे हे मात्र पुरेसे कळलेले नाही.

पेशी निर्माण होण्यासाठी या सांखळ्या एकत्र येतात. एक घटक बनतो तो एक एकक ही बनतो. जीव निर्माण होतो. त्याच्यात अवयव तयार होतात, पेशी स्पेशालिस्ट होतात.

प्रत्येक पेशीमध्ये आवरण, गाभा आणि न्यूक्लियस तयार होतो. आवरण संरक्षक, गाभा पोषक आणि न्यूक्लियस त्याचा कंट्रोल. पेशींचे आवरण बाहेरच्या वातावरणाशी संपर्क राखून असते. प्रोटीन च्या सांखळ्या सेन्सर आणि रिऍक्शन देणारे अवयव होतात. सेन्सरने दिलेली माहिती पेशीला हानिकारक की सुखकारक

a
हे पेशी अनुभवाने ठरवते आणि त्याप्रमाणे काय रिऍक्शन द्यायची ते ठरवते. हानिकारक असेल तर तिथून दूर जाणे आणि सुखकारक असेल तर जवळ जाणे हे पेशीमध्ये संवयीचे होते. पुन्हा पुन्हा तसेच व्हायला लागले तर त्याच ऍक्शन घ्यायची पेशींची वृत्ती होते. त्याकरता एक फिक्सड संयुग साखळी तयार होते. पुन्हा पुन्हा ही तयार झालेली साखळी तश्याच सेन्सिंग आणि रिऍक्शन घ्यायला तयार होते. जीन्स तयार व्हायला लागतात.

पेशींचे आवरण सतत आतल्या आणि बाहेरच्या वातावरणाशी निगडित असल्याने सतत ऍक्टिव्ह रहाते. जेवढे अनुभव आले त्यांना तोंड देण्यासाठी वेगवेगळे जीन्स तयार होतात. पेशीला पुन्हा पुन्हा "विचार" करायला लागत नाही. संवय तयार होते. पुन्हा पुन्हा अशी संवय यशस्वी झाली की खात्री, बिलिफ, होते, पुन्हा पुन्हा खात्री झाली की स्वभाव तयार होतो. स्वभाव तयार झाला की पेशी स्वत्व असलेली होते. प्रत्येक जीवाच्या प्रत्येक शरीरातली प्रत्येक पेशी अशी स्वत्व असलेली बनते.

जीन्स हार्डवेयर होतात आणि पेशींचे आवरण सेन्सर, ऍक्टिव्हेटर असणारे प्रोग्रॅम होते. काळा प्रमाणे आणि वापरून जुन्या झालेल्या पेशी नव्याने निर्माण करण्यांत जीन्सचा उपयोग होतो.

a

कारण आणि उपाय हे नेहमी वापरायच्या गोष्टी असल्याने त्या फिक्स होतात. अश्या अनेक स्वभावांचे मुद्रण संयुगांच्या साखळ्यात होते. जीन्स एकत्र येऊन गुणसूत्र तयार होते आणि ते न्यूक्लियस मध्ये साठवले जाते.

एका पेशीपासून दुसऱ्या दोन होताना गुणसूत्रांची कॉपी त्यांत तयार होते. एके काळी असे समजले जायचे की जीन्स आणि गुणसूत्रे पेशीला कंट्रोल करतात म्हणून. चार्ल्स डार्विनने केलेल्या अभ्यासांत आणि उदाहरणात हे ठासून मांडले गेले. जीवशास्त्रज्ञ या समजुतीला पूर्णपणे सत्य मानून पुढे काम करत राहिले. न्यूक्लियस काढून टाकलेल्या पेशीसुद्धा काही काळ जगतात पण नवीकरण करण्याची त्यांची क्षमता नष्ट होते आणि त्या पुरुज्जीवन करू शकत नाहीत. मग त्या नष्ट होतात. इथं पर्यंत रिसर्च झाला.

पण वातावरणाचे महत्व फारसे कोणी लक्षांत घेतले नाही. दोन एकसारख्या पेशी वेगवेगळ्या वातावरणांत ठेवल्या गेल्या तर त्या एकाच पद्धतीने रिऍक्शन देतात की बदलतात या कडे दुर्लक्ष झाले.

आता जीव शास्त्रज्ञ पुन्हा एकदा नव्याने याच्याकडे लक्ष देताहेत. जीन्सवर भर देण्यापेक्षा वातावरणावर भर अधिक दिला पाहिजे याची जाणीव व्हायला लागली आहे.

a

प्राण्यांचा स्वभाव समजुती आणि गैरसमजुती दोन्हीनी बनतो. मग त्या सर्व बाबतीत खऱ्या असोत की नसोत. शारीरिक संस्था चालण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या पक्क्या बसतात, त्यांना कोणी गैर मानत नाही. शरीर व्यवहार स्वयंचलित होतात.

पण पेशींचे समूह एकत्र येऊन बहुपेशीय जीव तयार झाले आहेत. नेहमीच्या ऑटोमॅटिक गोष्टी सोडून इतर "विचार" करण्यासारख्या गोष्टींसाठी त्यांना मेंदू मिळालेला आहे. तो मात्र ऑटोमॅटिक नसतो. तो मिळालेले सिग्नल आणि करायच्या गोष्टी यांचा विचार करतो आणि त्याप्रमाणे इतर पेशीसमूहाना आज्ञा देतो.

भूतकाळात झालेल्या गोष्टीवरून भविष्यकाळात काय होऊ शकेल याचे विश्लेषण करतो. इथेच समजुती आणि गैरसमजुती यांचा उगम होतो. वरच्या स्तरातले जीव अंड्यांत किंवा गर्भांत डेव्हलप होताना बरेचदा आपोआप हा मेंदू घडतो आणि त्यातले विचार फिक्स व्हायला लागतात. इन्स्टिक्ट्स, प्रतिक्षिप्त क्रिया तयार होतात.

जीव जन्माला येतो तेंव्हा तो फक्त आपले वातावरण बदलतो, त्याच्या शरीरक्रिया आणि मानसिक क्रिया अगोदरच सुरू झालेल्या असतात.

नवजात बाळाच्या गालाला बोट लावून पहा, लगेच त्याबाजूला ते डोके वळवते. अन्न भक्षणाची इन्स्टिक्ट.

नंतर त्या बाळाचे किंवा पिल्लाचे पालक जे करतात तेच बरोबर हे ते बाळ किंवा पिल्लू धरून चालते आणि तसेच वागायचा प्रयत्न करते. त्याची खात्री होते की हेच बरोबर आहे. त्याची बिलिफ पक्की होते. अगदी जन्मभर.

बिलिफ किंवा खात्री किंवा धारणा नेहमीच बरोबर असते का?

पण पहिल्यांदा स्वसंरक्षण आणि मग विकास असा जीवनाचा प्लॅन असल्यामुळे या नंतर खोडून काढणे जमत नाही. एकदा एक धारणा मनांत बसली की बसली. वाघ आपल्याला खातो, गाय मारत नाही, गवत माणसाने खाऊ नये, सापाच्या बिळांत हात घालू नये, आपली जीवन पद्धतीच बरोबर आहे इतर सर्व चूक आहेत, शाळेंत जाऊनच शिकता येते, अश्या अनेक धारणा.

परिस्थिती बदलली की कारण मीमांसा बदलू शकते. काल जे बरोबर होते ते आज असेलच असे नाही, उद्या तर कसे असेल हेच सांगता येत नाही असा विचार करायची शक्ती धारणांच्या मुळे अशक्त होते. आपण संवयीचे गुलाम बनतो.

याला उपाय काय? पूर्वीच्या लोकांनी दाखवलेले धोपट मार्ग तसेच पाळायचे की बंडखोरी करायची? सुरक्षा आणि बक्षिसे एकमेकांच्या विरुद्ध. जो धोपट मार्ग सोडील त्याला एकतर मोठे त्रास सहन करायला लागतील किंवा मोठे फळ मिळेल.

a

प्राण्यांचे माहीत नाही, किंवा खात्रीने माहीत नाही असे म्हणूया, माणूस मात्र मोठी मेमरी घेऊन जगतो. तिच्यांत हव्या नको त्या सगळ्या अनुभवांचे कोठार भरलेले असते. कोठारांत जुन्या, कालबाह्य झालेल्या न चालणाऱ्या गोष्टीही असतात, ते माणसाच्या मेंदूतही होते.

किडे मुंग्या यांना नेहमीचे जीवन जगायला मेंदू लागत नाही. चित्ते, माकडे यांना मेमरी साठवून ठेवता येत नाही. कितीतरी प्राणी एखादी गोष्ट, मग ती कितीही चांगली वाईट असो, दृष्टीआड झाली की विसरून जातात.

माणसे, हत्ती, डॉल्फिन, देवमासे यांना मोठी स्मरणशक्ती दिली आहे देवाने असे मानतात. त्या स्मरणशक्तीतला किती भाग वापरायचा आणि किती नाही याचीही काहीतरी समज दिलीच असेल देवाने. पण हत्ती, डॉल्फिन, देवमासे याना देवाने दिलेले शरीर त्यांना भौतिक प्रगती करू देत नव्हते, पण माणसाने ती केली. त्याचे हात आणि मेंदू इतर गोष्टी करायला फ्री झाला मग त्याला असल्या धारणा, धर्म वगैरे गोष्टी सुचायला लागल्या.

समजुती आणि गैरसमजुती मनाचे साखळदंड होतात आणि मनाच्या स्वैरपणाला आवर घालतात हे खरे आहे. पण कल्पनाशक्ती, स्वतंत्र विचार आणि बंडखोरी त्यांना कधीतरी वेगळी वाट शोधायला लावतात. काही प्राण्यांमध्ये अशी बंडखोरी त्यांच्या जीवावर बेततते.

a

मग यापासून मुक्तता कशी मिळवायची? आपल्याला आपले मन आणि स्मरणशक्ती खोडरबर घेऊन पुसून टाकता येत नाही की कॉम्प्युटर सारखी इरेझ करता येत नाही.. ज्यांना जमते त्यांना परामानंदाची अनुभूती मिळते. त्यातून संत महात्मे होतात.

ज्याला आपल्या धारणांना कंट्रोल करता येईल त्यांना मोक्षप्राप्ती मिळेल का? शेवटी मोक्ष म्हणजे तरी काय?

असे म्हणतात की प्रत्येक जीवाच्या प्रत्येक शरीरातली पेशी ही विशेष असते. एकाच प्रजातीच्या जीवांच्या पेशी अगदी एकसारख्या नसतात. पृथ्वीवरच्या सहा बिलियन लोकांच्या पेशी एकसारख्या नाहीत काहीतरी फरक आहे त्यांच्यांत. अगदी जुळी भावंडेही अगदी एकसारखी असत नाहीत.

निसर्गाची ही क्रिएटिव्हिटी बघून आपण स्तब्ध होतो. एकच आहे आपल्या हातात. जमेल तसे आपल्या बिलिफ आताच्या काळाप्रमाणे जुळवून घ्यायच्या.

होईल का तसे?

अपशब्दांचा उगम

भाषा म्हणजे संवादाचे साधन.

कोणताही भाव व्यक्त करता आला पाहिजे.
मग तो तिरस्कार किंवा राग किंवा घृणा का असेना.

दोन शब्दांत आपल्या भावना व्यक्त करता आल्या की मनाला कसे शांत वाटते.

तिरस्कार, घृणा किंवा राग दोन शब्दांत किंवा एकाच शब्दांत व्यक्त करायला शिवी सारखी गोष्ट नाही.

आपले मन सुप्त असले तरी भावना जागृत असतात. मनाला लगाम घालणाऱ्या कितीतरी गोष्टी असल्या तरी ते लगाम कधीतरी तोडून टाकावेसे वाटतात.

मनाला न भावणाऱ्या आणि समाजाला अस्वीकार्य गोष्टी म्हणजे टॅबू. आपल्या शरीरातल्या काही अवयवांचा उल्लेख, काही शरीरक्रियांचा उल्लेख, काही कृत्यांचा उल्लेख करू नये. ती जरी नैसर्गिक असली तरी उघडपणे करायच्या

गोष्टी त्या नव्हेत. हे सर्वांनी मान्य केले आहे. या गोष्टी उघड बोलून दाखवणारा रानटी किंवा गांवढळ, बूर, समजला जातो.

शरीर संबंध जवळच्या नातेवाईकांच्या बरोबर करणे बायोलॉजीला ही अमान्य आहे. सख्खे आणि एक लेव्हल सोडून नातेवाईक यांनी शरीरसंबंध करू नयेत असे बायोलॉजी आणि समाज मानतो. पण याला काही अपवाद सोडले आहेत.

माता, भगिनी यांच्याबरोबर शारीरिक संबंध करणे बायोलॉजी आणि समाजाला अगदी अमान्य आहे.

जे असे करतात त्यांना पापी समजतात. शरीराच्या काही अवयवांचा उल्लेख करणारे सामाजिकरित्या असेच हीन मानले गेले आहेत. ते तिरस्कृत, घृणास्पद मानले गेले आहेत. लिंगांचा उल्लेख घृणास्पद मानला गेला आहे.

म्हणून आपल्या तिरस्कार, घृणा आणि राग अश्या भावना ठासून व्यक्त करण्यासाठी शिव्यांचा उगम झाला असणार.

एखादी गोष्ट होते. तिरस्कार, घृणा आणि राग येतो. तो व्यक्त केल्याखेरीज रहावत नाही. मग त्या गोष्टीला किंवा क्रियेला किंवा करणाऱ्याला दोन शिव्या घातल्या की मनाला रिलीफ मिळतो.

म्हणून शिव्या सगळ्या जगांत, सगळ्या भाषांत आल्या असाव्यात.

तरीसुद्धा बघा. माता किंवा भगिनी यांच्याबरोबर शरीर संबंध केलेल्याला शिव्या आहेत. खालच्या अवयवांचा उल्लेख आणि त्याची उपमा देणाऱ्या शिव्या आहेत.

पण वडील आणि मुलगी यांच्या शरीर संबंधांच्या बद्दल शिव्या असलेल्या वाचले ऐकले नाही.

लिंगांचा उल्लेख घृणास्पद मानलेला असला तरी शिवलिंग पूजा आणि देवियोनी पूजा मात्र मान्य केलेल्या आहेत. याचे कारण कुठेही स्पष्ट केलेले नाही.

सगळ्या संस्कृतींमध्ये माता, भगिनी, बंधू, वडील यांच्यातल्या शरीर संबंधांचे उल्लेख आणि कथा वाचता येतात. या सगळ्या कथा प्राचीन आणि मिथ या स्वरूपांत आहेत.

अगदी महाभारतामध्येही अश्या कथा आहेत.

मग त्यावेळी या शिव्या नव्हत्या का आणि मग कधी त्या प्रचलित झाल्या हा रिसर्च अजून कोणी केलेला दिसत नाही.

a

बायबल, पुराणे यांत मानवजात एक पुरुष आणि एक स्त्री, जे भाऊ बहीण होते त्यांच्यापासून झाली अश्या कथा आहेत.

भविष्यांत काय होईल ते सांगता येत नाही. मानवजात नष्टप्राय व्हायला लागली तर असे आपद्धर्म करायला लागतील का असा कोणी विचार केलाही असेल.

आज तरी त्या शिव्याच आहेत.

टीकाकाराचे महत्व

तुकाराम महाराजांनी सांगून ठेवले आहे की "निंदकाचे घर असावे शेजारी", ते काही उगीच नाही. आपण जे काही करतो ते दुसऱ्यासाठीच असते बहुतेक वेळा. फार कमी वेळा आपण काहीतरी फक्त आपल्या स्वतःसाठी करतो.

मग आपण जे केले ते कसे आहे ते आपल्याला समजणे आवश्यक वाटतेच. कोणत्याही कृतीला फीडबॅक पाहिजे. इथे टीकाकाराची आवश्यकता भासते.

टीकाकाराची व्याख्या काय?

तो परीक्षक असतो. तो संवादक असतो. तो आपण केलेले कार्य पाहून समजून त्याचे विश्लेषण करतो. तो केलेले कार्य त्याच्या कारणासाठी योग्य आहे का आणि त्याचा विधायक उपयोग होईल का याचाही अभ्यास करतो. काही गैरसमजुती, वाईट उलटे परिणाम होतील का हे बघतो. केलेले कार्य अजून वेगळे कसे करता आले असते याचा विचार करतो. अजून चांगल्या पद्धतीने करता आले असते का आणि कसे हेही तो दाखवून देऊ शकतो. तो व्हॅल्यू ऍडिशन करतो. पाठीवर थाप मारणे आणि कान पिळणे हे दोन्ही अधिकार असतात त्याला.

टीकाकार स्वतः विद्वान, आपला विषय जाणणारा आणि त्यांत योग्यायोग्य विचार करणारा असावा अशी आपली अपेक्षा असते. त्याने टीकेचा विषय जाणून

घेऊन मग टीका करावी अशी आपण अपेक्षा करतो. एकदा तरी केलेले संपूर्ण काम डोळ्याखालून त्याने घालावे अशी अपेक्षा असते.

कोणतीही कलाकृती, लेख, संगीत याचे ज्ञान आणि आत्ताच्या परिस्थितीत त्याची विधायकता कशी असावी यावर आपले मत मांडणे त्याच्याकडून अपेक्षित असते.

असे होते का नेहमी?

टीका याला दुसरा शब्द कॉमेंटरी असा आहे. कॉमेंटरी मूळ कार्याला अजून पुढे घेऊन जाते. विद्वान टिकाकाराने केलेली कॉमेंटरीही मूळ करण्याइतकी प्रभावी होते.

सिनेमाचे उदाहरण घेऊ. सिनेमा करतांना कथा, आशय, अभिनय, संगीत, डायरेक्शन, फोटोग्राफी, एडिटिंग, सादरीकरण सगळे खूप विचार करून केलेले असते. खूप पैसे खर्च केलेले असतात, खूप जमवाजमव आणि मॅनेजमेंट केलेली असते. हजारो लोकांचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष काम त्यांत ओतलेले असते. पण लोकांनी तो सिनेमा बघायच्या आधी त्याची प्रसिद्धी करावी लागते. तिला रिव्ह्यू करणाऱ्या लोकांचे पाठबळ लागते. मग कुठे तो सिनेमा प्रेक्षकांना बघायला तयार होतो. आता इथे टीकाकाराचे महत्व बघा.

a

एक वाईट रिपोर्ट सगळ्या मेहनतीवर पाणी फिरवू शकतो. इथे कौतुकापेक्षा निष्पक्ष परीक्षणाची गरज भासते. टीकाकार एक मोठा फॅक्टर बनतो. महत्वाचा दुवा बनतो. कधी करप्शनचे मूळ होऊ शकतो.

कितीतरी सिनेमे परीक्षण बघून मग बघितले जातात. मग तो सिनेमा आपटणार की चालणार ते ठरते. पण एकदा सिनेमा थोडा चालला की मग त्याच्या मेरिटवर हिट होतो किंवा फ्लॉप होतो. पहिल्यांदा फ्लॉप ठरवलेला सिनेमा कालांतराने सुपर हिट किंवा क्लासिक झाल्याची उदाहरणे आहेत.

इतर कलाकृती, साहित्य, संगीत काही वेगळ्या नाहीत. असेच होते त्यांचे. म्हणजे टीकाकाराची जबाबदारी किती असते ते बघा.

टीकाकार निरनिराळ्या रंगांत आणि रूपांत दिसतात. काही जण अगदी निष्पक्ष असतात. काही इनडिफरंट असतात, काही पूर्ण झोकून देणारे असतात, काहींना फक्त चुकाच दिसतात आणि काहींना चुका दिसतच नाहीत. काही निंदक असतात काही पूजक असतात.

अभ्यासक टिकाकाराचे काम मूळ कामापेक्षाही ज्यास्त प्रभावी असल्याची उदाहरणे आहेत. क्लिष्ट विषय टीकाकार सोपा करून सांगू शकतो. आम जनतेला समजेल अश्या भाषेत विशद करून सांगू शकतो. आपली उदाहरणे देऊन मूळ विषय अजून खुलवू शकतो. अशी मंडळी विधायक ठरतात. टीका म्हणजे फक्त चुका

काढणे नव्हे. टीका म्हणजे फक्त उणिवा काढणे नव्हे. टीका म्हणजे कौतुक करणेही नव्हे. टीका करणे म्हणजे निंदा करणे नव्हे. टीका करणे म्हणजे नापसंती दाखविणे नव्हे. टीका म्हणजे "मागितले म्हणून हे घे माझे मत" म्हणून कॅज्युअल पणे मत मांडणे नव्हे.

टीकाकाराला आपले विचार आणि मते असतात. तो एखाद्या विषयाशी सहमत असेल किंवा नसेल, पण त्याच्या टीकेमध्ये बॅलन्स असला पाहिजे. आपले विचार टीकेमार्फत दुसऱ्याच्या कामात घुसवून त्याच्या कामाचे रंगरूप बदलवून टाकणे अपेक्षित नसते.

सटीक कार्ये अजून चांगली खुलतात.

तपासणी न झालेले काम कोणत्याही किंमतीचे नसते. स्वतः करून स्वतःला ते तपासता येत नाही आणि असे सेल्फ चेक फक्त ढोबळ चुका काढण्यासाठीच उपयोगाचे असतात. बहुतेक ठिकाणी तर असा नियमच असतो की एकाने केलेले काम दुसऱ्या तुल्यबळ व्यक्तीनेच तपासून पाहिले पाहिजे. आणि तू माझी पाठ खाजव मी तुझी पाठ खाजवतो असे करणे चुकीचे मानतात.

आपण स्वतःला आपल्या कामाबद्दल टीकाकाराच्या भूमिकेत कधी नेऊन पाहिले आहे का? आपलेच काम निष्पक्ष दृष्टीने कधी तपासून पाहिले आहे का? करून बघितले पाहिजे तसे.

a

वाचक, प्रेक्षक, श्रोते स्वतः टीकाकार होतातच. पण ते इतरांसाठी.

गीतेवर टीका कधी वाचून पाहिली आहे का? एकच गीता, पण किती लोकांनी किती प्रकारचे अर्थ काढले आहेत तिच्यातून ते पहा. प्रत्येक टीकाकाराने आपल्या काळ, दृष्टी आणि उद्देशासाठी वेगळा अर्थ काढलेला आहे असे दिसेल. ज्ञानेश्वरी, गीतारहस्य, प्रवचने, संत महात्म्याने केलेले विश्लेषण, सत्संग, अगदी परदेशी लोकांनी केलेले गीतेचे निरूपण वाचले ऐकले असेल तुम्ही. एकच मूळ, पण त्याचे काळानुसार आणि परिस्थितीनुसार वेगवेगळे अर्थ. इथे टिकाकाराची विद्वत्ता आणि कसब दिसून येते.

जीवनांत चांगले वाईट, बरोबर चूक, खरे खोटे, विधायक विध्वंसक सगळे असणारच. मग जेवढे कर्ते आहेत तेवढे टीकाकार असलेच पाहिजेत.

टीका आणि टीकाकार दोन्ही आवश्यक आहेत.

चांगली टीका किंवा कॉमेंटरी करणे ही एक कला आहे, एक अभ्यास आहे, कोणीही उठला आणि टीका करतो म्हटला तर नाही जमणार त्याला.

तेथे पाहिजे जातीचे.

a

लग्न करण्याची कारणे

कधी माणसे लग्न का करतात किंवा लग्न का करत नाहीत याची काय कारणे असतील असा विचार मनात आला आहे का?

तुम्ही लग्न का केलंत ते खरे खरे सांगा बरं -

१ लग्नाचे वय झाले म्हणून
२ जग रहाटी तशी होती म्हणून
३ कोणीतरी आवडले म्हणून
४ आई बाबा म्हणाले म्हणून
५ बरोबरीच्या दोस्तांची, मैत्रिणींची लग्ने झाली म्हणून
६ आता मुले बाळे व्हावीत म्हणून
७ एकटेपणाचा कंटाळा आला म्हणून
८ शारीरिक आकर्षण खूप वाटले म्हणून
९ वेळच्या वेळी गोष्टी झालेल्या बऱ्या म्हणून
१० तुमचे आयुष्य व्यवस्थित प्लॅन केलेले होते म्हणून
११ नंतर वय वाढल्यावर कंपनी पाहिजे म्हणून
१२ नाही केले तर लोक काय म्हणतील असे वाटले म्हणून

वरचा प्रश्न आणि उत्तरे विचित्र वाटतील.

a

पण लोक कधी, केंव्हा आणि कसे लग्न करतात ते खूप कारणांवर अवलंबून असते. आणि बरीचशी कारणे विशेष असू शकतात.

कोणी लग्नच करत नाहीत. ते कां? काही प्रजातीत एकटा जीव प्रजनन करू शकतो. त्याला दुसऱ्या लिंगाच्या जीवाची गरजच भासत नाही. तीन बिलियन वर्षेपर्यंत पृथ्वीवरचे जीव असेच होते. मग "प्रगत" जीव निर्माण झाले. स्पेशलायझेशन झाले. लग्नाचा जन्म झाला.

प्रत्येक पुरुषाला पत्नी मिळू शकते आणि प्रत्येक स्त्रीला पती. त्याची किंमत द्यायला तयार असले पाहिजे फक्त. ती किंमत देत येण्यासारखी नसेल तर जबरदस्तीने ब्रम्हचारी किंवा कुमारी रहाणे आले.

कोणत्याही शारीरिक अडचणी, व्याधी, त्रुटी नसतांनाही काही लोकांनी लग्न केलेली नाहीत. लग्न झालेले असावे असे वाटणाऱ्यांच्या आणि नको बाबा ती बला असे वाटणाऱ्यांच्या मनांत काय विचार येत असतील ते समजणे थोडे कठीणच आहे.

जगांत सगळीकडे अविवाहित लोक दिसतात. चांगले आनंदी असलेलेही दिसतात. काही कुटुंबांमध्ये अनेक भावंडे अविवाहित असलेली दिसतात.

शारीरिक त्रुटीमुळे काही वेळा लग्नापासून दूर राहण्याची जबरदस्ती करावी लागते. या विरुद्ध काहीवेळा शारीरिक त्रुटी असूनही आणि त्या नक्की माहीत

असूनही लग्ने केली जातात आणि लौकरच ती मोडतातही. म्हणून हा इश्यू आपण दूर ठेवू या.

ख्रिश्चन लोकांच्यात एक दंत कथा आहे. आदम बाबा देवाने निर्माण केला आणि पाठवून दिला पृथ्वीवर. चांगले खायला प्यायला होते. राहिला काही दिवस. मग त्याला यायला लागला कंटाळा. देवाकडे गेला आणि देवाला सांगितले की मला कंटाळा येतोय पृथ्वीवर, कोणीतरी कंपनी पाहिजे. देवाने त्याची बरगडी काढली आणि एक स्त्री केली आणि दिली आदम बाबाकडे. आनंदाने घेऊन आला आणि रहायला लागला पृथ्वीवरच्या स्वर्गात. नव्याची नवलाई उतरल्यावर आदम बाबाच्या लक्षांत यायला लागले की आपले काही सगळे जुळत नाहीये. सारखे सारखे तात्विक मतभेद व्हायला लागले आहेत. मग पुन्हा गेला देवाकडे आणि म्हणाला, ही सारखी भांडते माझ्या बरोबर, पहिल्यासारखी नीट रहात नाही, परत घे तिला. देव म्हणाला तथास्तु आणि परत घेतली स्त्री. आता आदम बाबा पुन्हा उनाडायला लागला बायको माहेरी गेलेल्या नवऱ्यासारखा. आणि थोड्या दिवसांत पुन्हा बोअर झाला बायको माहेरी गेलेल्या नवऱ्या सारखा. पुन्हा एकदा गेला देवाकडे आणि म्हणाला दे मला परत ती स्त्री, कशीही असली तरी. देव आता रागावला आणि म्हणाला घे ही परत आणि पुन्हा माझ्याकडे रडत येऊ नको.

असेल की नाहीं असे? "तुझेनी माझे जमेना, परी तुझ्यावाचून करमे ना!"

या उलट पाच दहा लग्ने केलेल्या व्यक्ती तेवढ्याच दिसतात. आता त्यांचे एकमेकांशी जुळत नाही की सतत वैविध्याची आवड असते की फक्त फॅशन? असे लोक प्रत्येक वेळी निराळ्या जोडीदाराबरोबर कसे काय जुळवून घेत असतील? की सरळ सांगून टाकले असेल की आपापल्या खाजगी आयुष्यांत जे करतो ते विचारायचे नाही म्हणून? "आपापल्या खाजगी आयुष्यांत" बरं का! म्हणजे ते लग्न काय पब्लिक आयुष्य असते का?

एकपत्नीव्रत आणि एकपतिव्रत कशी फक्त माणसांची खासियत नाही. खूपसे प्राणी असे व्रत पाळतात. का बरे असे? मुलांना स्थिर आयुष्य आणि बालपण मिळावे म्हणून, त्यांची सेफ्टी, स्थिर वैवाहिक आयुष्य आणि नवरा बायकोचे वाद आणि भांडणे कमी व्हावीत आणि त्यांना शांतपणे बालसंगोपन करता यावे म्हणून की काय? त्याचे फायदेही आहेत आणि तोटेही. एकसारखी पिल्ले होणार, त्यांच्यात चांगले वाईट गुणधर्म प्रकर्षाने होणार.

या विरुद्ध प्रत्येक संततीचे बाबा वेगळे असेही प्राणी असतात. नवरा आणि बायको यांच्यांत प्रेम वगैरे असण्याची शक्यताच नाहीशी होते. पण पिल्ले व्हरायटी असलेली होतात. आईच बहुधा संगोपन करते. सी हॉर्स सारखे काही प्राणी विरळा.

आनंदी आयुष्य जगायला लग्न करणे आवश्यक असते का? अविवाहित लोकही खूप आनंदी दिसतात. ते समाजांत तेवढेच मानाने आणि समाधानाने जगतात. सगळी भौतिक सुखे मिळवतात पण एकटेच रहाणे पसंत करतात. लग्न

केल्यामुळे प्राणी सुसंस्कृत होतात का? माणसाचा समाज लग्न करायच्या पद्धतीमुळे सुसंस्कृत झाला आहे का?

माणसे प्राणी सोडा. आपले आदर्श असलेले देव देव्या ही असाच विचार करत असतील का? "म्हसोबाला नाही बायको आणि सटवाईला नाही नवरा" अशी म्हणच आहे.

लग्न करण्याच्या अगदी विरुद्ध कोणी जीव असेलही पण जवळ जवळ नाहीच. पण ती देवाने दिलेली ओढ, संतती निर्माण करण्याची, ती मात्र सजग असते. असे प्राणिमात्र एकदाच एकत्र येतात आणि मिलन झाले की पुन्हा वेगळे होतात, ते इतके की पुन्हा एकमेकांना सहनही करत नाहीत. पुन्हा एकदा तशी वेळ येई पर्यंत. प्रेम ओढ वगैरे भावना त्यांना दूरच्याच.

वाघीण माजावर आली की रागीट होते, सारखे वाघाला आवाहन देते.एकदा ते जोडपे एकत्र आले की दोन चार दिवस आजूबाजूच्या जंगलाला नको जीव करते. मग ती वाघीण त्या वाघाला चक्क हाकलून देते. पिल्लांचा जन्म, त्यांचे शैशव, त्यांचे शिक्षण सगळे एकटी करते. वाघ कधीही तिला मदत करत नाही आणि ती ही मदत घेत नाही. एखाद्यावेळीच वाघ आपल्या पिल्लांना बघायला येतो, पण फार क्वचित. उलट पिल्ले बघायला आलेला वाघ त्यांचा बाप नसेल तर काळ होतो त्यांचा.

a

सिंहिणी आणि हत्तींणींचे तसे नाही. सिंह आणि हत्ती तर पाहिजेत त्यांना. पण कायमचे जवळ नकोत. आपले लग्न झाले की एकट्या रहातात. पण इतर सिंहिणी आणि हत्तीणींचा कळप करून. त्यांचे बालसंगोपन एकत्र स्त्रीवर्ग करून. त्यांचे मुलगे वयांत आले की त्यांना हाकलून देतात पण आपल्या मुली मात्र आपल्याबरोबर ठेवतात.

एकलकोंडेपणा आणि प्रजननाची आस अश्या दोन्ही गोष्टी देव कश्या मॅनेज करतो ते बघा त्यांच्या मध्ये. माणूसही एक प्राणीच आहे, आणि त्यांच्यातही असे गुण आहेतच काही प्रमाणांत.

तर जरा नजर वर करून बघा, लग्न काही आयुष्याला अत्यावश्यक असलेली गोष्ट दिसत नाही. एक सोय आहे ती.

तरी सुद्धा जग काय म्हणेल याची चिंता असतेच. म्हणून लग्ने होत असतील का?

कसे का असेना, आनंदी असणे सगळ्यांत बेस्ट. मग तो आनंद एकट्याने घ्यायचा असो की जोडीदाराबरोबर शेयर करायचा असो.

नवे धातू नवे धोके

खरे म्हणजे सोने फार पूर्वीपासून माणसाला भुरळ घालत आले आहे. लौकर न सापडणारे, न गंजणारे, सदा चमकदार, पिवळा धमक रंग. त्याचे साठे करून न ठेवावेत तर काय? पुन्हा ते मूल्यवान, म्हणजे त्याचे रक्षण करणे आलेच. एक तर भक्कम बंद कोठी मध्ये ठेवून कड्याकुलुपांत पहारे देऊन राखायचे. सोन्याला किंमत खूप. काहीही विकत आणण्यासाठी उपयोगी. मग त्याच्या रक्षणावर भर देण्यासाठी शस्त्रे आणि अस्त्रे पाहिजेत. पण ती मात्र तांब्याची. तलवारी, भाले, बाण सगळे तांब्याचे. लोक शेकड्याने मरायला लागले.

तांब्याचे उत्पादन करणे बरेच लौकर झाले. एक युग तांब्याचे नाव घेऊन अजरामर झाले. तांब्यांत झिंक म्हणजे जस्त किंवा टिन मिसळून ते ओतीव कामाकरता छान कामाला येते हाही शोध बराच अगोदर लागला.

चांदी, तांबे त्यामानाने कमी मूल्याच्या. मग त्या सर्वसाधारण लोकांच्या ताब्यांत येऊ लागल्या दागिने वगैरे करणे यासाठी, पण त्याही तश्याच किमती. पण चांदी तांब्यासाठी युद्धे झाली नाहीत.

मग काळ्या मातीत लोखंड असते त्याचा शोध लागला आणि शस्त्रे अजून ताकदवान झाली. पण लोखंड आपोआप गंजते, नष्ट होते त्यावर उपाय काही लौकर सापडत नव्हता. पण अजून एक युग लोखंडाच्या नावाने उदयास आले.

मग जग पुढारले. औद्योगिक क्रांती झाली. स्टील मोठेच मानाचे स्थान मिळवून बसले. त्यांच्याकरता लोखंड पाहिजे. हलक्या वजनाचे म्हणून ऍल्युमिनियम पाहिजे, लोखंडाला शक्ती येण्यासाठी मँगॅनीज पाहिजे. विजेचे वहन करण्यासाठी तांबे पाहिजे. पितळ, ब्रॉंझ बेअरिंग बनवायला पाहिजेत. मग झिंक आणि टिन पाहिजे. सोन्याची जागा हे धातू घेऊ लागले.

आता आपला धातूंचा आणि अधातूंचा साठा राखायला बॉम्ब आणि तोफांसारखी शस्त्रे वापरणे आले. दुसरे प्रदेश काबीज करणे आले.युद्धे अजून भीषण झाली. लोक हजाराने मरायला लागले.

शास्त्रज्ञ सतत चौकस काम करायचे. ते नवेनवे धातू शोधायला लागले. पण त्यांचा उपयोग काय करायचा हे मात्र अजून उघड झाले नव्हते. शास्त्रज्ञांनी धातू आणि मूलद्रव्ये तर खूप शोधली नव्वद ब्यांणव पण ती कागदावरच राहिली. युरेनियम सारखा धातू चिनीमातीची भांडी रंगवायला वापरला. प्लॅटिनम आणि पालाडियम सारखे धातू सोन्याची जागा घेतात का ते बघायला सुरुवात झाली. दुसरे विशिष्ट धातू मिळायला अवघड म्हणून मूल्यवान झाले. पण सोने ते सोनेच राहिले.

विसावे शतक आले आणि परमाणू ऊर्जेचा शोध लागला. आज पर्यंत निरुपयोगी असलेले युरेनियम एकदम राजेशाही महत्वाचे झाले. परमाणू ऊर्जा निर्माण करतांना इतर धातू आणि अधातु निर्माण होतात आणि ते बरेच अडचणीचे आणि

धोक्याचे होतात ते समजले. रेडिओऍक्टिव्ह धातू आणि अधातू हाताळायचे कसे ही एक मोठी समस्या झाली. पण बॉम्ब म्हणून युरेनियम आणि प्लुटोनियम यांचा वापर केवढा प्रभावी ठरतो ते दिसले. युद्धे अजून प्रगत झाली. आता लोक लाखाने मरायला लागले.

पेट्रोलियम तेलाचा शोध लागल्यापासून त्याने सोन्याची जागा घ्यायला सुरुवात केली. पेट्रोलीयमला काळे सोनेच म्हणायला लागले. आता गरीब , दुबळे देश पेट्रोलियम मिळाल्यापासून चांगले श्रीमंत झाले आणि त्यांच्यांत युद्धे पेटवून द्यायला इतर देशांनी सुरुवात केली. पेट्रोडॉलर आणि पेट्रोवॉर या शब्दांचा उगम झाला. पेट्रोलियम धातू नाही पण धातूपेक्षा त्याला महत्व आले. पण पेट्रोलियम वापरले की पृथ्वीची तब्येत पार बिघडून जाते याचाही शोध लागला. खाऊन खाऊन भागले आणि देवपूजेला लागले असे माणसाचे वर्तन आहे.

आता एकविसावे शतक लागले आणि आपण ही पृथ्वी किती घाण करतो आहे याचा शोध लागला. उत्तरेकडील वातावरण बिघडले की सगळे नुकसान आपलेच होणार हे समजल्यावर आता जागे होऊन पेट्रोलियमचा वापर सगळ्यांनी बंद करायला पाहिजे असे विचार इतर देशांवर लादायला आता प्रगत देश सरसावले. कसे करायचे आता? आपण तर नष्ट होणार ही भीती आता वाटायला लागल्यावर आणि आपलेच कारखाने आणि मोटारी वातावरण बिघडवत चालले आहेत ते दिसल्यावर आता पेट्रोलियम बास, आता नवीकरण होणारी ऊर्जा वापरायला पाहिजे पण ती इतरांनी असा प्रभाव पाडायला सुरुवात झाली आहे.

मोटारी विजेवर चालल्या पाहिजेत, त्याने आपले बिघडवलेले वातावरण अजून बिघडणार नाही, आता आयसी इंजिने बास. पण ती इलेक्ट्रिक कार चालणार कशी? बॅटरी पाहिजे. जुन्या टेक्नॉलॉजीच्या बॅटरी काही कामाच्या नाहीत. लिथियम आयन बॅटरी पाहिजे. आता लिथियम कुठे मिळणार? शोध चालू झाला.

नशिबाने अजून या पृथ्वीवर गरीब, अशक्त आणि मूर्ख लोकांनी भरलेले देश आहेत खूप. चला, या मूर्ख लोकांकडून लिथियम मिळवूया. आफ्रिका, आशिया आणि दक्षिण अमेरिका आहेत पडलेल्या, त्यांना या लिथियमचा काय उपयोग? त्यांना साधे गहू तांदूळ मिळाले की बस.

आणि स्वच्छ ऊर्जा निर्माण करायची ती कशी? अणुऊर्जेला पर्याय नाही. युरेनियम सारखेच थोरियम चांगले चालते त्याला. फ्युजन अणूउर्जेला लिथियम पाहिजे. थोरियम असलेले देश खूप पुढे येतील त्यांना आवर कसा घालायचा?

थोरियम भारतात खूप आहे. पण ते वापरायची टेक्नॉलॉजी पूर्ण विकसित झाली नाही अजून. प्रयत्न चालू आहेत. थोरियम भारताला स्वतंत्र करू शकते. पायाखाली अपार दौलत आहे. वापरायची की माती म्हणून फेकून द्यायची ते आपल्यावर आहे.

a

इलेक्ट्रिक गाड्या तर तयार करू आपण. सुरुवात झालेली आहे पण त्यांच्या बॅटरी करता लिथियम पाहिजे. मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक साधने यांच्या बॅटरींसाठी लिथियम पाहिजे. उद्या नव्या बॅटरी विकसित होतीलही पण आज लिथियम आयन बॅटरीच चालताहेत.

आता या लिथियमच्या खाणी दक्षिण अमेरिकेत, आशियात आणि आफ्रिकेत सापडल्या आहेत. तिथले लोक मूर्ख, अज्ञानी, आपसांत सतत भांडणारे. पायाखालची दौलत त्यांना दिसत नाही. चला करा त्यांना काबीज. नवीन युद्धभूमी आता निर्माण व्हायला लागल्या आहेत. नवी युद्धे कशी असतील यांची कल्पनाही करता येणार नाही. साम्राज्यवाद आता पुन्हा उफाळेल. नवे धातू नवी युद्धे घेऊन येतात हा इतिहास आहे. पण इतिहासातून कोण शिकतो?

आपल्या लडाख मध्ये लिथियमचे साठे आहेत हे माहीत होऊन सुद्धा दोन दशके झाली. आजपर्यंत त्याचा उपयोग कसा करायचा याची दिशा स्पष्ट नव्हती. ती आता होते आहे.

उद्या उत्तरेकडच्या देशातली जनता दक्षिणेकडे मायग्रेशन करील तर त्यांत आश्चर्य नाही. बोट बुडायला लागली की उंदीर पहिल्यांदा बोट सोडून जायचा प्रयत्न करतात. आता या आक्रमणापासून वाचवायला हवे स्वतःला. अठराव्या, एकोणिसाव्या शतकातल्या चुका आता करायच्या नाहीत.

a

आज लिथियमची चलती आहे. कार बॅटरी, फ्युजन ऊर्जेसाठी उपयोग दिसतो आहे. पण त्यासाठी शस्त्राने युद्ध करायचे नाही. पैसे आणि राजकारण पुरे आहेत त्यासाठी. आता आपल्या खाणी सांभाळणे आवश्यक आहे. माती, खनिज विकून पैसे मिळवायचे दिवस गेले आता. आपल्या खाणी आपली खनिजे आपल्यासाठीच वापरली पाहिजेत. त्यांचे रक्षण करायला, बाहेरच्या आणि आपल्याच घरभेद्या शत्रूंपासून सावध राहण्याची आता गरज आहे या खनिजसंपन्न आणि शांतिप्रिय देशांना.

उद्या अजून नवे शोध लागतील, नवी युद्धे उभी राहतील नव्या युद्धभूमी तयार होतील. आपला देश कणखरपणे उभा राहिला पाहिजे. आपली संरक्षणाची गरज आपणच भागवली पाहिजे. घरच्या शत्रूंना आवर घातला पाहिजे ही आजची आणि उद्याची गरज आहे.

आपण शक्तीवान, समृद्ध, स्वतंत्र भारताची स्वप्ने तर बघू शकतोच. आता ते प्रत्यक्षांत आणायची वेळ आली आहे.

कंटाळा आला

छान मोठा तल्लख मेंदू असण्याचे फायदे अनेक आहेत. तो नेहमीची कामे "संवय" नावाखाली टाकून देतो. अगदी बालपणा पासून सगळ्या क्रिया आपोआप होतील याची व्यवस्था करून देतो. कोळी, मुंग्या, किडे याना तर मेंदूची फारशी गरजच भासत नाही. सगळे व्यवहार हार्ड वायर्ड असतात त्यांचे.

पण या तल्लख मेंदूला एक प्रॉब्लेम आहे. नेहमीच्या गोष्टी सारख्या सारख्या करून तो कंटाळतो, बोअर होतो. मग काहीतरी दुसरे केले पाहिजे अशी टोचणी तो लावतो.

मांजर बघा. त्याचा मेंदू नक्की तल्लख आहे. खाणे पिणे झाले पोटभर आणि काही करायला नसले की सरळ झोपी जाते, अगदी तास न तास. पोटाने हाका मारल्या की उठते आणि आपल्या तल्लख मेंदूचा वापर करून पटकन काहीतरी मिळवते. मांजर कंटाळलेले दिसत नाही म्हणून काहीतरी वेगळे करतानाही दिसत नाही.

तेच कुत्रा बघा. खाणे पिणे व्यवस्थित झाले की इकडे तिकडे फिरतो. हा वास घे, तो वास घे करून आसमंत धुंडाळतो. कधी एक ठिकाणी बसलेला दिसत नाही. पुन्हा भूक लागली की हिंडत शोधतो. सरळ भीक मागतो. अगदीच दमला तरच झोप घेतो, ती सुद्धा सदा सावध. कुत्राही कधी कंटाळलेला दिसत नाही.

मग त्याचा मेंदू ज्यास्त तल्लख की मांजराचा? बांधून ठेवा किंवा पिंजऱ्यांत कोंडा त्यांना. लगेच कळेल कोण लौकर बोअर होते ते. कुत्रा रडेल, ओरडेल, सोडा म्हणून विनंत्या करील, मांजर नाही तसे करणार.

माकडे बघा. वेळ असेल तर अगदी निरखून बघा. खाणे पिणे झाले आहे, सगळे सेफ आहे, तर माकड काय करते?

माकडचेष्टा.

त्यांत व्हरायटी किती असते ते एकदा बघाच. माकड बोअर झालेले सहसा दिसणार नाही. त्याचा मेंदू तल्लख असतो आणि त्याला खाणे मिळविण्यासाठी बरेच भटकावे लागते. त्याचा मेंदू त्याला खाण्याची व्हरायटी शोधायला बिझी राहतो, त्याला कंटाळा येऊच देत नाही.

आणि माणूस?

जरा तोच तोच पणा आला जीवनांत की लगेच बोअर होतो, कंटाळतो. झोपणार किती? खाणे पिणे तर व्यवस्थित सेट केलेले असते, मग तिथेही फारसे काही करायचे नाही. मग एवढ्या मोठ्या प्रगत तल्लख मेंदूला काम काय?

a

जेवढा तुमचा मेंदू तल्लख आणि हुशार, तेवढे तुम्ही लौकर बोअर होता. एखाद्या ग्रुपकडे बघा, सगळेजण एक काहीतरी करत असताना दुसरा अगदी कंटाळलेला दिसतो. तो इतर लोक काय करताहेत त्याच्या पलीकडे विचार करत असतो.

आलेला कंटाळा रिकामे मन तयार करतो. रिकामे मन सैतानाचे घर असते असे म्हणतात.

मग नाही नाही ते उद्योग सुचायला लागतात. कलाकृती, चौकसपणा, भटकंती, मनोरंजन, नवनिर्माण करायची कल्पना सुचते.

रिकामा बसलेला माणूस तसा सापडणे जरा कठीणच. दुसरे काही नसले तर भांडणे उकरून काढतो, ती करायला शस्त्रे शोधतो, अस्त्रे शोधतो. मेंदू बिझी होतो मग. "रिकामा न्हावी, भिंतीला तुंबड्या लावी" सारख्या म्हणी होतात. मग सुतार बोअर झाला तर? गवंडी बोअर झाला तर? युद्धे लढणारा सैनिक बोअर झाला तर? राजाच बोअर झाला तर?

चौकसपणा ही कंटाळ्यांतून बाहेर आलेली गोष्ट आहे. करायला काही नाही तर बाहेरचे जग बघत बसले की नवीन काहीतरी दिसून येते. आकाशांत फिरणारे ते गोल असेच का फिरतात? झाडांना फुले फळे अमुक वेळाच का येतात? समुद्राच्या पलीकडे काय आहे? इतर प्राणी जगतात कसे? पृथ्वीवर एवढे जीव कुठून आले?

काही गोष्टी चमकदार छान कश्या असतात? सूर्य चंद्र त्याच ठिकाणी कसे दिसत नाहीत?

शोध सुरू होतो. आणि मग एक प्रश्नाचे उत्तर शोधतांना दुसरे दहा प्रश्न बाहेर येतात, मेंदू बिझी होतो, कंटाळा जातो, माणूस आनंदी होतो. किंवा नको ते मिळाल्याने दुःखी होतो आणि मग त्यावर उपाय शोधण्यांत गढून जातो, प्रश्नांत गुंतून जातो. पण या प्रकाराने प्रगती होते. साधने होतात, जीवन अजून सुसह्य होते, मेंदूवरचे लोड अजून कमी होते. कंटाळा अजून वाढतो.

कंटाळा येणे हा एक मोठ्ठा ड्रायव्हर आहे माणसाच्या मनाचा. कंटाळलेले मन टाईमपास करण्यासाठी काहीतरी शोधत रहाते. एकदा मनाने असा विचार करायला सुरुवात केली तर काहीही मर्यादा रहात नाही.

मग कल्पनाशक्ती नावाचा एक नवा खेळ सुरू होतो. साधे हे पृथ्वीवरचे जीवन जगताना त्यापलीकडे काहीतरी आहे का याचा शोध सुरू होतो. कल्पनाशक्तीला एक मेंदू सोडला तर दुसरे काहीही लागत नाही. चर्मचक्षुला न दिसणाऱ्या गोष्टी मनचक्षुला दिसतात.

शास्त्रे अशीच डेव्हलप झाली. कला अश्याच विकसत गेल्या. अध्म्यात्म असेच अस्तित्वांत आले.

a

स्वर्ग नरक, पाप पुण्य, देव धर्म, न दिसणारे देवदूत, भुते खेते आणि अजून काय काय चित्रविचित्र कल्पना बाहेर यायला लागल्या. जीवनाच्या तोचतोच पणाला कंटाळून लोक हिमालयात निघून गेले, तपे, व्रतवैकल्ये केली, प्रतिसृष्टी निर्माण केल्या.

माणसाच्या इतका मोठा मेंदू देवाने इतर काही प्राण्यांना दिला आहे. ते प्राणी माणसांच्या सारखेच विचार करतात असा कयास बांधला गेला आहे. मग ते प्राणी कंटाळा आल्यावर काय करत असतील? त्यांना देवाने दिलेले शरीर त्यांना भौतिक सुधारणा करू देत नाही. पण मन ही एक वेगळीच चीज आहे. मनाला शरीराचे बंधन नाही.

धर्म, म्हणजे कसे रहायचे, ते सगळे प्राणी जाणतात. पण आपल्या शरीराबाहेरचा विचार ते करतात का? माणूस इतर प्राण्यांचा अभ्यास करतो. मग ते बोअर झाले तर काय करतात, कंटाळलेला प्राणी काय करतो असा रिसर्च मात्र फारसा पहाण्यांत आलेला नाही.

डॉल्फिन, हत्ती, देवमासे, वानरे, मार्जारकूळ कंटाळले तर काय करते ते अजून समजले नाही. नाही म्हणायला माकडे आणि वानरे अगदी बोअर झाली तर त्यांच्या पिंजऱ्याच्या गजांवर डोकी आपटून घेतात आणि जखमा करून घेतात. म्हणजे कंटाळा विध्वंसक गोष्टी अगदी सहज करतो.

a

हत्ती, वाघ बोअर झाले तर आकाशाकडे बघून हे काय आहे असा विचार करत असतील का? माणसाने ते केले. म्हणून त्याने पृथ्वीपासून बाहेर जायचा विचार केला आहे. तरीही तो आहे त्याला कंटाळतोच.

शंभर चॅनेल असलेले टीव्ही, हाताशी दहा बारा मोटारी, कपडालत्ता भरपूर, पैशाचा काहीही प्रॉब्लेम नाही, म्हणजे जगायला काहीही कष्ट पडत नाहीत अशी व्यक्ती बोअर झाली तर काय करते? एक तर सगळे टाकून देऊन नव्याने ॲक्टिव्ह जीवन शोधायला लागते, किंवा कला, भटकंती, संशोधन असली कामे शोधते.

रिकामे मन जेवढे नवीन काहीतरी शोधते आणि निर्माण करायला सबळ होते तेवढे जीवनाच्या संघर्षांत गुंतलेले मन नाही करू शकत.

तुमच्या आजूबाजूला बघा. कोणीतरी दिसेल असा की जो आरामांत मोकळा बसलेला आहे, सगळीकडे त्याचे लक्ष आहे पण तो काहीही करत नाही असे दुसऱ्या दगदग करत असलेल्या लोकांना वाटते आहे. उलट कंटाळलेला, जांभया देत बसलेला आहे असे वाटेल. आणि आता काहीतरी क्लिष्ट प्रॉब्लेम येऊ द्या. सगळेजण तो सोडवायच्या मागे लागले आहेत, धावपळ करताहेत आणि त्याचे उत्तर मात्र हा आपला मोकळा बसलेला माणूस बरोबर शोधतो. कसे काय?

त्याचे मन तेवढेच सक्षम आहे पण तो ते रिकामे ठेवतो कारण त्याच्या सगळ्या गोष्टी त्याने अगदी सहज पटकन करून टाकल्या आहेत त्याने. त्याचे मन रिकामटेकडे

झालेले आहे. पण त्यामुळे तो वेगळा विचार करू शकतो. कंटाळलेपणाचा हा फायदा आहे.

कंटाळला आहात का आता हे पुराण ऐकून? छान, अभिनंदन! म्हणजे तुम्ही खूप क्रियाशील आहात, तुमच्या कडे खूपशी कल्पनाशक्ती स्पेअर आहे आणि त्यामुळे नवीन काहीतरी करायची तुमची निवड लगेच करायला पाहिजे. प्रॉब्लेम सॉलव्हिंग मध्ये तुमचा नंबर खूप वरचा असणार आहे.

कंटाळण्याला कंटाळायचे नाही. तो एक मोठा गुण आहे आणि मोठा ड्रायव्हरही आहे.

तिरकी चाल

बुद्धिबळाच्या खेळाकडे बघा एकदा.

प्रत्येक मोहरा आपापले वैशिष्ट्य राखून असतो. प्रत्येकाची पॉवर वेगवेगळी असते. प्रत्येकाचे चालचलन हालचालीची तऱ्हा वेगवेगळी. आणि त्याचा स्वभाव वेगळा.

प्यादे म्हणजे एक साधा सैनिक किंवा शिपाई. फक्त एक कदम चालायची परवानगी ती सुद्धा अगदी सुरुवातीला दोन आणि नंतर एकच घर आणि फक्त पुढच्या बाजूला. पण समोरच्या तिरक्या घरांत येऊ दे कोणीतरी. उगारलीच तलवार. मग तो कोणीही असेना, राजा, वजीर, कोणीही. तेंव्हा मात्र या गरीब सैनिकाला अफाट शक्ती येते. एरवी दुसरे कोणीतरी समोरच्या घरांत आले तर अडली प्रगती याची. आणि हां, जर एक एक कदम करत शेवटच्या घरांत पोचले प्यादे तर एकदम वजिराची पॉवर मिळते त्याला.

हत्ती अगदी सरळ. फक्त आडवे आणि उभे सरळ रेषेत जाऊ शकणार. पण ते कितीही घरे. राजाशी घरबदल एकदाच करायची संधी त्याला. ते सुद्धा भारतीय पद्धतीत नाही, फक्त पाश्चिमात्य पद्धतीत.

a

उंटाचे वेगळेच. फक्त तिरक्या रेषेंत पण कितीही घरे जाईल. शेजारून प्यादेसुद्धा आडवे किंवा उभे चालले असेल तर विरोध करायची ताकद नाही.

घोडा मात्र विशेष. एक दोन अडीच करतांना दोन आडवी आणि एक तिरके किंवा दोन उभी आणि एक तिरके किंवा दोन तिरके आणि एक उभे किंवा आडवे असल्या उड्या मारायची शक्ती. आणि ते सुद्धा कोणाच्याही डोक्यावरूनही. त्यामुळे घोडा बराच अडचणीचा होऊ शकतो. मागे पुढे आडवे तिडवे कसेही जाऊन शत्रूच्या गोटाचा भेद करायचा हे त्याचे काम.

वजीर सरळ, तिरका कितीही घरे जाईल पण घोडयासारख्या वाकड्या तिकड्या उड्या नाही मारू शकत. तरीही सर्वांत पॉवरफुल मोहरा. घालवला तर डाव संपण्याची शक्यता.

राजेसाहेब तर शेवटी राजेच. पण राजशाहीमुळे फक्त एकच घर पण आजूबाजूला असे जातील. पण राजा हे राज्याचे प्रतीक, अभिमान आणि श्रेष्ठतेचा सिम्बॉल. राजाला न काढण्यासारखा शह लागला की खेळ संपला.

तरीही बघा. साधे प्यादे दुसऱ्या प्याद्याची साथ मिळेल तर कोणालाही रोखू शकते.

बुद्धिबळ सगळेच खेळतात. बाहुबळापेक्षा बुद्धिबळ श्रेष्ठ.

मग जगांत हेच तर चालते की. माणसाच्या स्वभावाप्रमाणे सरळ, तिरके, वाकडे तिकडे किंवा एक कदमी चालणारे लोक दिसतात. युद्ध असो की शांती, अश्या चाली सगळीकडे दिसतात.

माणसाचा स्वभाव कसा आहे ते चालीवरून समजावे. कोणी उंटा सारखी तिरकीच चाल खेळतात आणि कोणी हत्तीसारखे सरळ जातात. वजिरासारखी पॉवर सगळ्यांच्या कडे नसते की राजाची शान सगळ्यांना जमत नाही. पण एक प्यादे बनून वेळी प्रसंगी सगळ्यांवर मात करायची शक्ती अगदी दुबळ्यातल्या दुबळ्या माणसांत ही येते कधीतरी.

युद्ध सामरीक असो की आर्थिक की मानसिक की सामाजिक, ज्याची त्याची चाल त्याला बरोबर उपयोगी पडते.

सरळ चालीचा माणूस तिरकी चाल अंगीकारत नाही बहुधा. घोड्यासारखे उड्या मारून दुसऱ्यांना हैराण करणे सगळ्यांना जमत नाही. सगळे राजे होऊ शकत नाहीत. वजीर कितीही शक्तिवान झाला तरी राजासारखा प्रतीकात्मक होऊ शकत नाही.

चार राजे अगदी एकत्र आले आहेत असे कधीच दिसत नाही.

a

अगदी जागतिक युद्ध, कोणत्याही विषयांत, झाले तरी सगळ्या लोकांची गरज पडते. राजे आपसांत कितीही भांडू म्हणतील तरी इतरांच्या मदतीशिवाय जिंकू शकत नाहीत.

बुद्धिबळातून खूप शिकण्यासारखे आहे. व्यूहरचना कशी करायची, समोरच्याचे दोष आणि वीक पॉइंट कसे शोधायचे आणि त्याच्यावर मात करण्यासाठी कसे वापरायचे हे बुद्धिबळातून शिकावे. प्लॅनिंग म्हणजे काय, दहा चाली पुढचा विचार कसा करायचा याचे शिक्षण इथे मिळते.

माणूस काही खूप फास्ट विचार करणारा प्राणी नाही. म्हणून मग तो फास्ट चालणारा कॉम्प्युटर शोधतो. नियम सगळे कॉम्प्युटर व्यवस्थित पाळतो. दहाच काय पण शेकडो चाली काय असतील त्याचा विचार, प्लॅन करू शकतो. पण कॉम्प्युटरला विवेकबुद्धी कुठे असते? तो जे करायचे ते करील पण समोरच्याने विचित्र चाल केली तर गोंधळून जाईल. आणि जे शिकविले तेवढेच करील.

कॉम्प्युटर भले चाली खेळून खेळून, त्यांचे परिणाम बघून एखाद्यावेळी फार प्रगत झाला असे वाटेल आणि तो माणसाच्या पेक्षा हुशार झाला असे वाटेल. पण असे कसे होणार?

शेवटी खरे ते खरे आणि आर्टिफिशियल ते आर्टिफिशियलच.

a

युद्धे लढतांना बाहुबळ पाहिजे हे मान्य पण बुद्धिबळाखेरीज बाहुबळ शून्य आहे. मागची दहा बारा युद्धे आठवा. शेवटी सरळ, तिरक्या, उड्या मारून सतावणाऱ्या चालीच मात करून गेलेल्या आहेत. राजांना घेरून इतर मोहऱ्यांनी त्यांच्यावर मात केली आहे.

माणसांचे स्वभाव बुद्धिबळातील मोहऱ्यांइतके सहा प्रकारचेच असतात का की त्यातही मिश्रण होऊन कोणी वजीर आणि घोडा एकाच वेळी होऊ शकतो का? वजीर राजाला डोईजड होऊ शकतो का?

काहीही म्हणा. माणसे अशी मिश्रण असलेली आहेत म्हणूनच जग चालते आहे. नाहीतर एका स्वभावाच्या, एककल्ली माणसांनी जग कसे दिसले असते.

आपल्या या पृथ्वीच्या गोल बुद्धिबळ पटावर लोकांच्या लाखो चाली. मग हे जग असे कॉम्प्लेक्स न होईल तर काय होईल?

पश्चातबुद्धी

"अरेरे मी केले ते असे केले असते तर बरे झाले असते", असे वाक्य प्रत्येक माणूस जन्मांत कधीतरी बोललाच असेल.

मग ते परीक्षेचा अभ्यास करून पेपर टाकून आल्यावर असेल, की ब्रिजचा डाव थोडक्यांत हुकून चांगलेच डाऊन झाल्यावर असेल किंवा लग्न करायच्या वेळी चांगल्या मुली हातातून सुटून गेल्यावर किंवा सोडून दिल्यावर असेल किंवा करियर मध्ये नाही ते धाडस करून चांगला हबका बसल्यावर असेल.

माणूस विचार करतो ते काही आपल्याला हानी किंवा दुःख मिळो या विचाराने थोडाच करतो. त्याला जेंव्हा जसे बरोबर वाटलेले असेल तसे करून टाकतो.

वांधा असा आहे की गोष्ट होऊन गेल्यावरही तिचा विचार करत बसतो. माणूस हा एक विचारवंत प्राणी आहे. काहीतरी उद्देश असल्याखेरीज कशाला विचार करील? पण अतिविचार केल्याने गोंधळून जाणे स्वाभाविक आहे आणि त्यानं वेळही जातो किंवा वेळही निघून जाते.

आपली शक्ती, आपला वीकनेस, आपले धोके आणि आपल्या संधी यांचे संपूर्ण विश्लेषण करणे दिल्या वेळी आणि दिलेल्या वेळांत करणे सगळ्यांना कसे जमणार?

इथे माणसाचा स्वभाव परिणाम करतो. SWOT अनालिसीस करताना निरनिराळे पैलू, त्यांचे परिणाम, त्यांना लागणार वेळ आणि धरसोड न करणे अगदी आवश्यक असणारच. त्यामुळे काही लोक जे झाले त्याचा विचार करत बसत नाहीत. ते पुढे निघून जातात. त्यांना "काश मैंने ये किया होता तो क्या होता" ही भावनाच त्रास देत नाहीत. आनंदी आणि समाधानी होतात ते लोक.

कुंपणावर बसून विचार करत राहणे रिझल्ट कसा दाखवणार? त्याला काहीतरी निर्णय घेतलाच पाहिजे. निर्णय शक्ती सगळ्याच्यांत असते. फक्त काही जण पटकन निर्णय घेतात आणि काही जण निर्णय घेत नाहीत, लांबणीवर टाकतात.

किंवा तुम्ही करा आम्ही आहोतच मागेमागे असे का करावे? नेहमी दुसरा कोणीतरी काहीतरी करील मग आपण टाळ्या वाजवू किंवा टीका करू असे कशाला?

पुन्हा आणि पुन्हा एकदा, धोके काय आणि त्यांचा फायदा कसा करून घ्यायचा याच निर्णय लगेच घेता आला नाही तर मग वेळ निघून जाते, मग काहीही उरत नाही हातात.

मग ही पश्चातबुद्धी टोचणी लावत बसते. आणि मग वेळ निघून गेल्यावर कुणालातरी गेल्या जीवनाच्या गेलेल्या संधी आठवून रडत बसणेच उरते हातात.

पश्चातबुद्धी आणि पश्चात्ताप या दोन अगदी वेगळ्या गोष्टी आहेत.

पश्चात्तापात एक गुन्हा केल्याची भावना आहे पण पश्चातबुद्धी तशी निर्धोक असू शकते. एकदा होऊन गेलेली गोष्ट तशीच पुन्हा होण्याची शक्यता कमीच असते.

पण आपल्या कृतीमुळे कोणाला तरी शारीरिक, मानसिक किंवा आर्थिक हानी होऊन गेल्यावर किंवा त्याचा जीवच गेला तर वाटणारे दुःख किंवा गुन्ह्याची भावना माणसांत कधी इतकी तीव्र होते की तो आत्महत्या करण्यापर्यंत जाऊन पोचतो. कैदेत पडलेल्या गुन्हेगाराच्या अवस्था अश्या झाल्या आहेत. पश्चाताप माणसाला जाळून टाकू शकतो.

पश्चातबुद्धी कधी नव्या संधी घेऊन येऊ शकते. "ठीक आहे, तेंव्हा नाही केले किंवा नाही जमले, मग आता करू की", असे विचार नवीन काहीतरी करायला उद्युक्त करतात.

केलेल्या चुका सुधारायची संधी पुन्हा मिळेल. मग तिचा आतातरी फायदा करून घेऊ आणि गेल्या चुकांवर काहीतरी पांघरून घालू. ठीक आहे, तेंव्हा मित्रांशी वेळ घालवला नाही, मुलांशी वेळ घालवला नाही, बायकोकडे नीट विचारपूस नाही करता आली, मग आता करूया की. जुने मित्र आहेत अजून, मुले मोठी झाली तरी

नातवंडे आहेत, तीही मोठी झाली असतील तर पणतवंडे आहेत किंवा येतील. बायको अजूनही आहे सहजीवन जगायला. आणि जरा नजर वर केली तर नवे मित्र सहज मिळतात.

अजून काही आपले जीवन संपलेले नाही. कधी कॉल येणार आहे याची काहीही कल्पना नाही, शरीर चालते बोलते आहे, मग एवढे निराश व्हायचे कारण काय. उगाच हे करायचे राहिले ते करायचे राहिले म्हणून रडत बसून का रहायचे?

त्यापेक्षा चला आता स्वतः नवीन सुरुवात करू या ना.

दुसऱ्यांची पश्चातबुद्धी वापरून त्यावर पुस्तके लिहून त्याचा मिलियन प्रती विकून स्वतः लाखो रुपये कमावणाऱ्या लोकांना टाळ्या वाजवून आणि त्यांचे कौतुक करून आपण काहीही नवे करावे या पासून दूर रहाण्यांत मतलब काय?

आपले आयुष्य किती शिल्लक राहिले आहे ते कुणाला माहीत आहे? अगदी डॉक्टरांनी सांगितले की काही दिवस, काही महिने काही वर्षे राहिले आहे असे लोक सुद्धा त्यांना खोटे ठरवून गेले आहेत.

मग असे नंतर काहीतरी निराश विचार करण्यापेक्षा आज उगवला आहे त्याचा काहीतरी चांगला उपयोग करून घेऊ असे म्हणणे आणि तसे करणे ज्यास्त सोपे नाही का?

कुठलीही गोष्ट करायला कधीच उशीर झालेला असत नाही हे मागच्या लोकांचे म्हणणे मान्य करूया आणि पुढे जात राहू या.

आणि अगदी पश्चातबुद्धी एवढी टोचणी लावतच असेल तर जे करायचे ते आजच आणि आत्ता सुरू करू या. काहीतरी विचार करून काहीतरी कार्य सुरू करू या. ते बरोबर केले की चुकीचे ते ज्यांनी सुरूच केले नाही अश्या लोकांवर सोडून देऊ.

जे होईल ते होईल.

"जो होगा देखा जाये गा !"

कोणती भाषा?

मी एका वाण्याच्या दुकानात गेलो होतो, त्याला विचारले "जाड पोहे आहेत का, पातळ पोहे अजिबात नकोत" त्याने मराठीतून सांगितले की जे पाहिजे ते मिळेल. तो कच्छी होता, त्याची मातृभाषा कच्छी म्हणजे गुजराती सुद्धा नव्हती. पण तो माझ्याशी मराठीत बोलत होता.

माझी सौ. आणि मुलगा युरोपच्या ट्रीपला गेले होते. लंडन मध्ये हॉटेल मध्ये राहिले होते. तिथली इंग्लिश बाई, जी बस मधून सामान सुद्धा उतरवत होती ती त्यांना म्हणाली, " आपका सामान देख लिजिये| कल सुबहको सात बजे तैयार रहिये|". तिथला दरवान "यहांसे आईये|" असे म्हणून लिफ्ट कडे घेऊन गेला.

चेन्नई मध्ये पान सुपारीच्या टपरीवर मसाला पान मागितले. तो म्हणाला "waat is dyat?". मग हिंदीतून सांगितले तरी तो काही समजत नव्हता. मग त्याच्या "मेनू कार्डा" वरून पण कोणते पाहिजे ते सांगितले. तेंव्हा "yaas yaas" म्हणून त्याने ते बनवून दिले. तो यूपी भय्या होता, चेन्नई मध्ये जन्म झालेला आणि तिथेच लहानाचा मोठा झालेला. त्याला फक्त तामिळ समजत होते. आपली मातृभाषा हिंदी त्याच्या डोक्यावरून जात होती.

तर मग कोणती भाषा वापरावी? आता भाषेचा अभिमान सगळ्यांना असतो पण धंदा म्हटले की सर्व गुंडाळून ठेवतात. आम्ही मराठी किती कणखर बाण्याचे!

आम्ही दुसऱ्या प्रदेशांत गेलो तर आम्हाला भाषेची अडचण येते. आम्ही जिकडे तिकडे आमचे इंग्लिश वाजवतो मग ते कितीही मोडके तोडके चुकीचे का असेना.

गोरा साहेब भारत सोडून गेला. तो जगज्जेता होता. त्याची भाषा सगळे जग वापरत होते. त्यांच्या देशांत भारतीय माणूस गेला, अगदी टूर करायला तरी तो हिंदीतून बोलायचा प्रयत्न करतो. आज तरी.

माझा एक साथीदार टीसीई मध्ये होता, अजूनही चांगला मित्र आहे. घरी सगळे पंजाबी हिंदी मिश्र भाषा बोलतात. पण तो अस्खलित मराठी बोलतो. टीसीई मध्येच आमची लायब्ररीयन तामिळ ब्राह्मण होती. मराठी माणसाला लाजवील अशी शुद्ध मराठी बोलायची. बारीक सारीक तपशीला सकट.

तिला आणि माझ्या त्या मित्राला कधी वाटले नाही की आपण काही विशेष करतो आहोत म्हणून. आमच्याकडून त्यांनी कधीही अपेक्षा केली नाही त्यांच्या भाषेत बोलायची.

पण आम्ही बघा. जरा काही ठासून सांगायचे झाले की आम्ही इंग्लिशचा आधार घेणार. एवढेच नाही तर आमचे ग्रामीण भागातून आलेले इंजिनियर मित्र "माझी मिसेस", "माझा ब्रदर", "माझी स्कूल", "माझी कार" असे शब्द वापरतात. त्यांना सांगावे लागले की एवढे इंग्लिश तोडू नका, आम्हीही मराठीच आहोत, सरळ मराठीतून बोला, असे म्हणून.

त्यांना वाटत होते की इंग्लिश मधून आपण जास्त चांगले सांगत असू म्हणून.

आपली भाषा वापरायला अशी शरम का वाटावी. ठीक आहे, आम्ही कॉलेज शिक्षण घेऊन चांगले उच्च विद्याविभूषित झालो आहोत. पण इतरही तसेच असतात. ते कोठूनही आलेले असले तरी आमची भाषा शिकायचा प्रयत्न करतात आणि आम्ही त्यांच्याशी इंग्लिश मधून आणि ते आमच्याशी मराठीतून बोलतात.

साहेब गेला पण त्याने दिलेली ही देणगी आम्ही काही विसरत नाही. समजा आपण अगदी आफ्रिकेत गेलो, आणि आपल्याला त्यांची भाषा अजिबात येत नाही तर काय करू? इंग्लिश, फ्रेंच, डच त्यांनाही परक्याच. मग आपली मायबोली वापरून बघायला काय हरकत आहे. कदाचित त्यांना येत ही असेल.

अमेरिकेत राहणारा मित्र इथे आला होता. तो मराठी मधून बोलतो आहे आणि आम्ही त्याच्याशी इंग्लिश मधून. त्याला मराठी जवळची वाटते आहे, तिथे फारसे बोलता येत नाही म्हणून तो मराठी बोलतो आहे. आणि आम्ही मात्र मायबोली वापरत नाही.

मुले जोरकस पणे काही सांगायचे तर इंग्लिश मध्ये सांगतात.

मिल मध्ये "ट्रेनी इंजिनियर" होतो. सगळे कामगार मराठी होते. प्रत्येक गोष्टीला त्यांच्याकडे मराठी प्रतिशब्द होता. मला ते तेंव्हा माहीत झाले.

a

परकी भाषा येणे आणि वापरणे ही एक कला आहे, अभ्यास आहे, तो केला तर कौतुक केले पाहिजे. पण आपण आपल्याच लोकांशी इंग्लिश मधून बोलतो, मुलांशी इंग्लिश मधून आणि नातवांशी सुद्धा. ही गुलामगिरीची खूण नाहीतर काय आहे. मुलांना बाहेरच्या जगांत जायचे आहे म्हणून इंग्लिश मधून शिकवितो ते ठीक आहे. पण फक्त इंग्लिश का? फ्रेंच, जपानी, चिनी, स्पॅनिश या भाषा सुद्धा व्यापारात वापरतात. मग आपण मुलांना नातवांना चिनी भाषेच्या, जपानी भाषेच्या, फ्रेंच भाषेच्या क्लास मध्ये का घालत नाही.

भाषेवर प्रभुत्व असावे, ते योग्य आहे, पण योग्य जागी योग्य भाषा वापरली पाहिजे.

आमचे वर्गमित्र सांगायचे, बाकी काही नाही तरी कमीतकमी दुसऱ्या भाषेतल्या शिव्या तरी समजल्या पाहिजेत. आणि समजा आपली "सपनोंकी रानी" जर मराठी नसेल तर तिला आपली आणि आपल्याला तिची भावना तरी समजून घेता आली पाहिजे. प्रेमाला भाषा नसते म्हणतात. पण "साईन लँग्वेज" असतेच. कधीतरी सगळ्या जगाची भाषा हीच "साईन लँग्वेज" होईल.

भाषेचा उपयोग संवादासाठी. संवाद मनोमिलन किंवा मानसिक युद्ध करण्यासाठी. संवाद तर पाहिजेच.

a

मुंबईला वरळीला अंध मूक बधिर शाळा आहे. तिथे मुलांना दिसत नाही, किंवा ऐकू येत नाही, किंवा बोलता येत नाही. पण तिथली मुले शाळेंत तेवढीच दंगा मस्ती करतात. त्यांना भाषेची अडचण येत नाही. मूक आणि बधिर मुलांना "साईन लँग्वेज" शिकवतात. तो मुले आपसात इतकी संवाद करत असतात त्या "साईन लँग्वेज" मध्येच त्यांच्या शिक्षकांना त्यांना दटावायला लागते.

कोणती भाषा हा काही प्रश्न नाही. पण आपली मातृभाषा सोडून दोन तीन तरी दुसऱ्या भाषा समजल्या पाहिजेत. लिपीची अडचण येते दक्षिण भारतात. आणि काही प्रमाणात बंगाल आणि पंजाब मध्ये. पण तेलगू, कन्नड भाषा ऐकून ऐकून समजतात. तामिळ आणि मल्याळी भाषा मात्र अगदी परदेशीच वाटतात.

तसे असून बाहेर देशी गेलेले लोक बघा. तामिळ आणि मल्याळीच जास्त दिसतील. हिंदी, पंजाबी त्या खालोखाल. मग आमचे मर्द मराठे. बाकीचे जातात तिकडची भाषा शिकतात, कमीत कमी दैनिक जीवन जगण्या इतकी तरी. मराठी माणूस क्वचित दुसरी भाषा शिकतो. अर्थात याला अनेक अपवाद आहेत. पण साधारण स्थिती अशी आहे.

असे का झाले? मराठी माणसाचा मोडेन पण वाकणार नाही असा बाणा होता म्हणून का?

a

आता आमचा एक मित्र आजच म्हणाला, मराठी कीबोर्ड नीट चालत नाही म्हणून इंग्लिश मध्ये लिहितो. मराठी येते ना, इतरांना मराठी समजते ना, मग कीबोर्डची अडचण काय आहे? रोमन लिपी मधूनही कोणत्याही भाषेत लिहिता येतेच. लिपी आणि भाषा अगदी वेगळ्या गोष्टी आहेत

बंधुंनो, मनाची तयारी पाहिजे, बाकी सर्व ठीक होते, उपाय सापडतात.

आपले पंतप्रधान आताशी हिंदीतून परदेशी भाषण करतात. बाकीचे सर्व आपल्या राणीच्या इंग्लिशचाच अभिमान बाळगत होते.

रशियन, फ्रेंच, चिनी, जपानी नेते आपल्याच भाषेतून बोलतील. ज्याला गरज आहे त्याने भाषांतर करून घ्यावे. पण उद्या धंदा करायला चिनी जपानी फ्रेंच लोक आले तर नक्की आमच्या भाषांत व्यवहार शिकतील आणि करतील.

आमच्या पार्लमेंटची भाषा कोणती? इंग्लिश. कोर्ट कचेऱ्या कोणत्या भाषेत काम करतात? इंग्लिश मध्ये. बहुतेक खाजगी कंपन्या कोणत्या भाषेत व्यवहार करतात? इंग्लिश मध्ये. भले आम्हाला इंग्लिश मोडकी तोडकी येत असेल, पण आम्ही इंग्लिश मध्येच बोलणार.

भारत मोठा देश आहे. तेवीस चोवीस मुख्य भाषा आहेत, असंख्य बोलीभाषा आहेत. मग आम्ही कोणती भाषा स्वीकारावी? दक्षिण वाले म्हणतात आम्ही हिंदी नाही स्वीकारत. उत्तर वाले म्हणतात आम्हाला इंग्लिश नको. मग आता भारतीय

नावाची भाषा निर्माण केली पाहिजे, जिच्यांत सर्व भाषेतले शब्द योग्य अर्थाने असतील. एक समान भाषा.

अशी भाषा निर्माण व्हायला हजार वर्षे तरी लागतील आपल्या भारतात. तोपर्यंत मात्र आमची राणीची इंग्लिशच चालणार का? की काहीतरी वेगळे करता येईल?

आणि ती भारतीय भाषा निर्माण होईपर्यंत काय करायचे?

मी बढाया मारत नाही. मला मराठी, हिंदी, इंग्लिश मधून चांगले लिहिता वाचता येते. गुजराती मधून लिहिता वाचता येते आणि मोडके तोडके बोलता येते. माझ्यासारखे अजून खूप जण आपल्या ग्रुप मध्ये असणार आहेत. त्यांचे विचार समजले तर चांगले होईल.

तो फिर कहिये कौन सी भाषा का प्रयोग करें?

મને ત્રણ ભાષા આવડતા છે. અને હું એમાંથી ગાળ સમઝી શકું છું. તો કહો, કોની ભાષામાં ગાળ આપું?

Think and tell what you feel.

एक छोटी तीर्थयात्रा

पुण्याच्या जवळ पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणे आहेत आणि ती रस्त्याने एकमेकांना जोडलेली आहेत.

पुण्याहून पानशेतला जाणार रस्ता नदीच्या दुसऱ्या बाजूने पुण्याकडे येतो. रिंग रोड सारखा. वरसगाव धरणाकडून तो रस्ता टेमघर धरणाकडे आणि खडकवासला धरणाकडे जातो. त्या रस्त्यावर उंच डोंगरावर नीलकंठेश्वराचे पुरातन देऊळ आहे.

ते एका वेगळ्या डोंगरावर आहे आणि तिथे वरसगाव आणि खडकवासला धरण ओलांडून एन डी ए च्या बाजूने जाता येते. गेल्यावर्षी वरसगावच्या बाजूने गेलो होतो यावेळी एन डी ए च्या बाजूने जावे असे ठरले.

तिथे जायचे म्हणजे गाडी अर्धाअधिक चढ जाते पण नंतर एका खडबडीत उभ्या वाटेने पायीच जावे लागते.

मागच्यावेळी गाडी थोडी वर जाऊ शकली होती पण उशीर झाल्याने आणि रस्ता नक्की माहीत नसल्याने प्रयत्न सोडून द्यायला लागला होता. पण जिथे गाडी पोचली तिथून एक उभी चढण दिसली होती. पण तिच्या पायापर्यंत रस्ता पोचलेला दिसत नव्हता.

a

या वेळी ऐनवेळी ठरवल्या मुळे निघायलाच एक वाजला होता. आज मागच्या सारखे ढगाळ वातावरण नव्हते. त्यामुळे कडक उन्हांत आपण वर कसे चढणार हा प्रश्न होताच.

पण जाऊ या तरी असे म्हणून त्या एनडीए वरून जाणाऱ्या रस्त्याने निघालो. जेवण म्हणजे आज वनभोजन करावे असा बेत होता. तो मात्र यशस्वी झाला.

वनभोजन झाल्यावर पुढे निघालो.

a

नीळकंठेश्वराच्या देवळाच्या पायथ्याशी एक रस्ता वर डोंगरावर जातो. तो चांगला उभा आहे आणि मध्ये मध्ये खडबडीत आहे. पण तो आता एका पार्किंग लॉट पर्यंत जातो. तिथे गाडी उभी करता येते.

तिथे एक छोटे एका स्वामींच्या प्रतिमेचे मंदिर आहे. तिथे एक छोटे आवार आहे.



पुरातन वृक्षही किती देखणा असतो!

वर जायची उभा खडबडीत रस्ता तिथून सुरू होतो. थोड्या पायऱ्या आहेत मग खडबडीत रस्ता. चढ चांगलाच आहे. पार्किंग लॉट पासून देऊळ साधारण एक हजार फूट उंच असेल.

शंकराची देवळे अशीच कठीण जागी असतात. भक्ताची परीक्षा घेऊनच शंकर दर्शन देतो. त्या परीक्षेशिवाय फळ मिळत नाही. जो भक्त या परीक्षेत पास होतो त्याला दर्शन मिळतेच. आणि हे देऊळ प्राचीन असूनही अतिशय मनोहारी आहे असे माहीत झाले आहे.

खालीच पार्किंग लॉट मध्ये चौकशी करून झाली होती की आम्हाला वर जायला जमेल की नाही म्हणून. पार्किंग वाला म्हणाला की थांबत थांबत जा, जमेल. पण आम्ही म्हटले होईल तेवढे चढत जाऊ. थांबत थांबत जाऊ. फक्त नाही ते डेअरिंग नाही करायचे. वयाचा आणि शक्तीचा मान ठेवलाच पाहिजे. हो की नाही?

चढायला तर सुरुवात केली. पण छातीचा भाता आणि तो छातीतला पंप फार लौकर काही चढू देईना. आमच्या सारखे इतर तरुण लोक ही चढत होते. थोड्या फरकाने त्याची ही अशीच अवस्था होत होती.

पुढे पाहिले तर न संपणारा चढ दिसत होता. ऊन डोक्यावर हे म्हणून तळपत होते.

वरून येणाऱ्या लोकांना सारखे विचारत होतो अजून चढ किती आहे म्हणून. पण नुसते विचारून रस्ता कसा संपणार?

वरून येणारे लोक सांगत होते की चढ आहे आणि बराच आहे. ते तर दिसतच होते.

मलातरी सारखे थांबायला लागत होते दम खायला.

तसे आम्ही अर्धाअधिक चढ चढून गेलो, पण शेवटी आमच्या छातीतला पंप आणि भाता काय म्हणतो आहे याकडे लक्ष द्यावेच लागले.

तशी बरीच मंडळी वरून खाली आणि खालून वर जात होती. हे नीळकंठेश्वराचे देऊळ आणि परिसर फारच चांगला आहे असे वरून येणारे म्हणत होते.

अजून थोडे वर जा मग रस्ता लेव्हल आहे आणि नंतर एकच चढण आहे देवळापर्यंत असेही सांगत होते. पण देऊळ पाच वाजता बंद होते असे ही सांगत होते. आता वाजले होते सव्वाचार. पाऊण तासात वर पर्यंत पोचणे मलातरी कठीण वाटत होते.

पण शेवटी आमचे वय, आमचा दम आणि एकंदरीत दिसलेली परिस्थिती बघता आता बास असेच म्हणावे लागले.

बाकी अर्धा रस्ता चढून गेल्यावर सीन फारच छान दिसत होता. सिंहगड वेगळ्या अँगल ने दिसतो. खाली मुठेचे पाणी आणि अजून मागे असलेला खडकवासला धरणाचा पाणीसाठा दिसतो. सगळीकडे डोंगर. आज थोडे शुष्क होते खरे पण पावसाळ्यांत ग्रेट दिसत असेल दृश्य.

मग नीळकंठेश्वराला तिथूनच नमस्कार केला. शौर्यापेक्षा शहाणपण चांगले असा विचार करून आणि पुन्हा नक्की येणार असे मनांत धरून उतरायला सुरुवात केली.

a

वर चढताना दम आणि छातीचा पंप यांनी अडवणूक केली होती. खाली उतरताना घसरणारे दगड, खडबडीतपणा आणि तोल सांभाळत, आणि दगडांवर पाय ठेवत ठेवत उतरायची प्रॅक्टिस आठवत यायचे होते.

हां, पावसाळ्यांत काय होत असेल ते वेगळे. निसरडा चिखल, दगड आणि उभा उतार. कल्पना करून बघा.

पण रस्ता करताहेत म्हणजे कधीतरी पूर्ण होईलच. चढ तर काय कुठे जाणार नाही पण रस्ता तरी खडबडीत नसेल.

a

खाली एक पाटी आहे. ट्रॅक्टर ट्रॉली ने पाच लोकांना एक हजार रुपयांत नेऊन आणू म्हणून.

वर जाताना दमल्यावर दगडावर बसून विश्रांती घेताना वरून एका ट्रॉलीला जुंपलेला एक बुलडोझर वरून खाली आला. ही जोडी इथे कशी चालते हेच आश्चर्य आहे. ती ट्रॉली म्हणजे रस्त्यावर नुसती बागडत होती. कोणी बसले त्या ट्रॉलीत तर आखडलेली हाडे नक्की सुट्टी करून मिळतील.

आणि त्या उभ्या चढावर चढताना आणि नंतर उभ्या उतारावरून खाली येताना कसा येत होता ते बघून हबकायलाच होत होते. त्या ड्रायव्हरचा जर कंट्रोल सुटला तर काय होईल याची कल्पना सुद्धा भीषण आहे.

अगदी कळसाला नमस्कार करून आले तरी ती तीर्थ यात्राच समजतात की नाही? मग आम्ही तर दोन वेळा करून पाहिली. दोन्ही वेळेला नीळकंठेश्वराला लांबूनच नमस्कार. कळस जरी दिसला नाही तरी त्या डोंगराचे शिखर तरी दिसले ना.

पण नीळकंठेश्वराला नक्कीच भक्तांची करुणा येत असेल आणि कधीतरी गाड्या सरळ वर पर्यंत पोचतील. आज त्याने आम्हाला भेटायला नाकारले तरी आम्ही पुन्हा प्रयत्न करू.

त्यावेळी मात्र नीळकंठेश्वर नक्की प्रसन्न होऊन आपले दर्शन देईल.

एप्रिल फूल

एप्रिल फूल करायची पद्धत कधी सुरू झाली?

कोणीतरी यावर रिसर्च केला असेल.

हिवाळा संपताना आणि वसंत ऋतू सुरू होताना आखडलेले हात पाय फ्री करत नाचायची पद्धत सुरू झाली असेल. मग मुक्त नाचणाऱ्याला एप्रिल फूल म्हणत असतील. किंवा हिवाळ्यात घरात बंद राहून डोके शिणले असेल. मग ते पुन्हा ताजेतवाने करण्यासाठी काहीतरी विचित्र घडवून एकमेकांना कोपरखळ्या मारण्यासाठी ही एप्रिल फूलची पद्धत सुरू झाली असेल.

साधे साधे जोक मारून आणि गोष्टी सांगून एप्रिल फूल करणे वेगळे. काही लोकांनी तर हा उद्योग बराच मोठा आणि खर्चिक केला आहे.

शाळेत एक गोष्ट होती आम्हाला. एक हॉस्टेल होते तिथे अशी किशोर वयाची मुले शिकायला राहिली होती.

एक साधाभोळा वाटणारा मुलगा होता. त्याची इतर हूड मुले नेहमी चेष्टा करत असत. काही चेष्टा तर horseplay श्रेणीत बसतील अश्या असायच्या. त्याचे कपडे भिजवून ठेवायचे, त्याच्या जेवणात खूप मीठ टाकायचे, त्याच्या पिंगट बुटांना काळे

पॉलिश चोपडायचे, त्याच्या पेनांत शाई ओतून देऊन पाणी भरायचे, त्याच्या साबणाच्या जागी खाजकुयली सारखे ठेवायचे अश्या.

तो त्रासून तर जायचाच पण फारशी रिएक्शन नाही दाखवायचा. मग ही हूड मुले अजून चेकाळायची. खूप दिवस सहन केले त्याने.

मग उन्हाळ्याचे दिवस आले. मुले काही उनाड होती त्यांनी जंगलात ट्रीपला जायचा प्लॅन केला. यालाही बळाने घेऊन गेले. जंगलात फिरत होते सगळे.

अचानक हा आपला सज्जन मुलगा अचानक ओरडला आणि खाली पडला. जमिनीवर पडून गडाबडा लोळायला लागला. मुले त्याच्याभोवती गोळा झाली. झाले काय याला? कुणी पाणी पाजले, कुणी त्याला उठून बसवले. ओरडता ओरडता हा म्हणाला, मला साप चावला, आता मी मरणार.

मुले घाबरली, आता काय करायचे, हे चांगलेच शेकणार आपल्यावर. मग त्याला उचलून खांद्यावर घेऊन खडकाळ, काटेरी वाटेने गावाकडे घेऊन चालले. अडखळत चालत नेत असताना त्यांचे हात पायही शेकून निघाले. जवळच्या गावातून एक खाटले मिळवले आणि त्यावर याला निजवला. तो ओरडत होता आणि हात पाय झाडत होता. मध्येच ओरडत नेणाऱ्याच्या डोक्यावर मानेवर लाथा घालत होता. मुले आता सहन करत होती.

a

कसेतरी त्याला खाटेवर घालून गावातल्या दवाखान्यात आणले. डॉक्टर नव्हता ड्युटीवर. त्याला शोधून बाबापुता करून आणला एकदाचा. आणि म्हटले की बाबा रे वाचव याला, नाहीतर आम्ही मेलो.

डॉक्टर आपल्या सज्जन मुलाला तपासतोय पण काही झालेले दिसत नाही. एक काटा किंवा दगड टोचल्याचीही काही खूण नाही. डॉक्टर त्या हूड मुलांना विचारतोय की काय झाले नीट सांगा. त्यांनाही काहीच सांगता येत नाही.

काहीवेळ गेल्यानंतर आपला सज्जन मुलगा खाटेवरून उठला आणि खो खो हसायला लागला. काही बोलेना, फक्त हसत सुटला.

डॉक्टर आणि मुले त्याच्याकडे बघताहेत. हा म्हणाला, "आज किती तारीख आहे?" सगळे जण भानावर आले. "अरेच्चा, आज एक एप्रिल की! याने एप्रिल फूल केले सर्वांना."

डॉक्टरल मात्र अजिबात मजा वाटली नाही. त्याचा दिवस वाया गेला होता आणि उलट विनाकारण टेन्शन घ्यायला लागले होते. त्याने सगळ्या कंपूला लागलेच फैलावर घेतले. मग आपल्या सज्जन मुलाने त्याची क्षमा मागितली आणि सगळे कारण सांगितले.

ती हूड मुले खजील झाली.

"हा शेराला सव्वाशेर मिळाला की. एप्रिल फूल चा धडा सगळ्या हॉस्टेल शिकवला याने."

हे तर एप्रिल फूल करणे कोणालाही इजा न करणारे होते. पण काहीवेळा मोठ्या मोठ्या लोकांनी एप्रिल फूल चे प्रयोग करून बघितले आहेत. अगदी घाबरवून सोडण्यासरखे.

एका सी ई ओ ने सकाळी सकाळी एक ईमेल पाठवला आल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांना. "आर्थिक परिस्थिती दारुण झाल्यामुळे एक एप्रिल पासून, नवीन आर्थिक वर्षा पासून कंपनी बंद करण्यात येत आहे. सगळ्यांना त्याचा मार्चचा पगार ऑगस्ट मध्ये मिळेल आणि सगळ्यांचे फुल आणि फायनल कंपनीची विल्हेवाट लावल्यानंतर पैसे मिळाल्यावर होईल."

लोकांचे धाबे दणाणले. पहिला भर ओसरल्यावर सी ई ओ समोर निदर्शने करूया म्हणून प्लॅन केला. सी ई ओ तर कंपनीच्या ऑफिसमध्ये आलेच नव्हते. मग त्यांच्या घरी जाऊन निदर्शने करूया असे ठरले. गेले सगळेजण त्याच्या घरी तीस मैलांवर. सी ई ओ घरीसुद्धा नव्हते. मग आता काय करायचे? इथ पर्यंत संध्याकाळचे सहा वाजले होते.

a

पुन्हा ऑफिस मध्ये आले आणि आपापल्या जागेवर जाऊन ठिय्या आंदोलन करायचे असे ठरवून बसले. रात्रीचे साडेअकरा वाजले पण काही सुचेना किंवा करायचे काय ते कळेना.

रात्रीचे बारा वाजले, आणि कुणीतरी आपला ईमेल उघडला. "एप्रिल फूल झालेल्यांचे स्वागत असो." असा मेसेज वाचला त्याने. मग खाडकन सगळे भानावर आले.

ज्या सी ई ओला आपण संप करून आणि स्लो डाऊन करून छळत होतो त्याने चांगला धडा शिकवला, असे बघून मग सगळे दमलेल्या शरीराने आणि दमलेल्या मनाने आपापल्या घरी गेले. मनस्ताप तर झालाच मग सबक पण शिकले.

तर बंधूंनो आज एप्रिल फूल डे आहे.

आज कशावरही विश्वास टाकायचा नाही. अगदी त्यांच्या प्रमोशन, इंक्रिमेंटची बातमी मुले घेऊन आली तरीही.

काय, कळले का?

हिंसा आणि अहिंसा

एक सुविचार वाचला, "अहिंसा ही अनैसर्गिक गोष्ट आहे". म्हणजे हिंसा नैसर्गिक गोष्ट असणार. हे सरळ सरळ मान्य केले पाहिजे.

अहिंसा कशाला म्हणावे? या पृथ्वीच्या पाठीवर एक जीव दाखवा की जो अहिंसक आहे. हिंसा फक्त मांसाहारी प्राणीच करतो का? जरा वरवर नजर टाका. जीव: जीवस्य जीवनम ही उक्ती अगदी प्राचीन आहे.

सगळे जीव हिंसा करतात आणि त्यांना त्याबद्दल काहीही खंत, खेद वाटत नाही. मांसाहारी प्राणी तर हिंसा केल्याखेरीज जगूच शकणार नाहीत. तृणभक्षी जीव हिंसा करतातच. ती सुद्धा निषेध तक्रार करू न शकणाऱ्या वनस्पतींची. वनस्पतींना जीव नसतो का? त्या जन्मतात, मोठ्या होतात, आपले जीवन जगतात आणि मरून जातात. त्या ही जिवंत आहेत, त्यांचीही हिंसा होते.

मग माणूस अहिंसेचा एवढा बडेजाव का करतो? अहिंसा म्हणजे काय? या जगांत एक देश किंवा प्रांत आहे का की शुद्ध अहिंसक आहे? युद्धे असताना आणि युद्धे नसतांना हिंसा होते आणि त्यांचे जस्टीफिकेशन दिले जाते. पूर्वी होऊन गेलेले राजे, सम्राट, सुलतान आणि आक्रमक हिंसक नव्हते का? अहिंसक राजा होता का कुणी आणि अहिंसक प्रजा होती का कधी?

a

अगदी पुराण काळापासून पाहिले तरी हिंसा आणि अहिंसा यातला फरक स्पष्ट होत नाही. आपल्या या देशांत विविध विचारसरणी आली, रुळली आणि नष्ट झाली. क्रूर आक्रमकांनी इथल्या लोकांवर अत्याचार केले, विध्वंस केला आणि जीव घेतले. सुलतानांचे "कत्ले आम" काय होते? फ्रेंच राज्यक्रांती होताना काय झाले. गिलोटिन कशाचे द्योतक आहे?

इथे राज्यकर्त्यांनी आणि रयतेने तेवढीच हिंसा केली. राजांनी आपली सत्ता टिकवण्यासाठी आणि रयतेने राजसत्ता उलथून टाकण्यासाठी. जगातला एक धर्म दाखवा की ज्यांच्या अनुयायांनी हिंसा, विध्वंस केले नाहीत असे.

पुराण काळापासून आजपर्यंत हिंसा आणि विध्वंस आपल्या लोकांनी पाहिला आहे. मग हे अहिंसेचे तत्व कोठून आले? अहिंसेने जय मिळतो हे कोठून समजले? अहिंसेने मनाची शांती लाभली अशी किती उदाहरणे दिसली? अहिंसक क्रांती असा शब्दप्रयोग कसा आला.

राज्यकर्त्यांना विरोध म्हणून दंगली, जाळपोळ, विध्वंस करणे एका काळांत देशप्रेमाचे उदाहरण म्हणून गणले गेले, अगदी सगळ्या देशांत, आणि त्याच देशांत त्याच लोकांनी इतर दुसऱ्या वेळी तेच केले तर देशद्रोह म्हणून त्यांना शिक्षा झाल्या.

एखाद्या जीवाला पटकन मरण येईल असे वागले किंवा तशी ऍक्शन घेतली तर "ह्युमेन" मरण दिले असे म्हटले जाते. बोकडांना, मेंढ्यांना, कोबड्यांना असे मरण

a
देणे यासाठी मुद्दाम प्रयत्न केले जातात. याहून विरोधाभास काय असू शकेल? हिंसा तर करायची आणि मग ती किती सौम्यपणे केली ते सांगायचे.

बुद्धिवादी लेखक आणि क्रांतीकारक लेखणी चालवतात. लेखणी म्हणाजे त्यांची तलवार. ते दुसऱ्या लोकांना पेटवतात. त्यांच्या करवी उन्माद, विध्वंस आणि हिंसा करवतात आणि समाज त्यांना जहाल मतवादी म्हणतो. त्यांना देशप्रेमी म्हणतो. त्यांचा उदोउदो होतो. ते समाजनेते होतात.

ते गेलेल्या लोकांवर टीका करतात, ज्यांना आता डिफेन्स करायची संधी नाही असेच लोक निवडतात. स्वतःला ज्वलंत लेखक म्हणवून घेतात. राज्यकर्त्यांच्या बगलेतला काटा बनतात. जर इतके ते प्रभावी होते तर त्यांचे त्यावेळच्या त्यांच्या अनुयायांनी का नाही ऐकले? जर अहिंसेला एवढा विरोध होता आणि जनमत तापवायचे होते तर स्वतः हाती लेखणीच्या जागी तलवार किंवा मशाल का नाही घेतली?

नुसते जे करतात त्यांना विरोध करायचा पण स्वतः काही स्पष्ट मार्ग न दाखवता लोकांना पेटवायचे ही बेजबाबदार हिंसा नव्हे का?

हिंसा नैसर्गिक आहे, वरचा तो सुविचार वाचला की समजते.

a

अहिंसा अनैसर्गिक आहे तर तिचा पाठपुरावा का करावा. अहिंसेच्या मागे का जावे? ज्यावेळी देशप्रेमाची लाट पूर्ण भरात होती आणि स्वातंत्र्ययुद्ध सुरू होते तेंव्हा झालेल्या दंगली, विध्वंस आणि जीवहानी कुणाच्या अकाउंटला टाकायची? ती हिंसा नव्हे का? अहिंसक पुढाऱ्यांनी घडवून आणली नाही का? आणि ती झाल्यावर स्वतःच उपोषण करून पुन्हा लोकांना धारेवर धरले नाही का? एक गोंधळून गेलेली सिस्टीम होती का ती?

एकदा अहिंसाव्रत घेतले तर हिंसेला संपूर्ण विरोध करावा की नाही? आणि अश्या अहिंसक नेत्यांची टवाळी टिंगल करणाऱ्या लेखणीबहाद्दर लोकांचे काय करायचे? ज्याअर्थी ते अहिंसावादी नेत्यांच्या विरुद्ध बोलत लिहीत आहेत त्याअर्थी ते हिंसावादी म्हणायचे नाहीत का?

अहिंसावाद हा फक्त एक बुरखा असू शकतो. अहिंसापालन करून या पृथ्वीवरचा कोणताही जीव जगू शकणार नाही. अगदी तो तोंडावर मास्क घालून दुसऱ्याचा जीव जाऊ नये म्हणून असे करतो असे म्हणत असला तरी.

अहिंसक क्रांती या जगाने पाहिली नाही कधी आणि पाहील असेही वाटत नाही.

a

खरे अहिंसक म्हणजे दगडधोंडे. ते स्वतः काही हिंसा करत नाहीत. नद्या समुद्र सुद्धा अहिंसक मानता येणार नाहीत. तिथे जीव जातात. वनस्पती अहिंसक म्हणता येणार नाहीत.

माणूस ही अशी एक गोंधळलेली जमात आहे की जिला खरे खोटे, सत्य असत्य, धर्म अधर्म, चांगले वाईट यातला फरक स्पष्ट कळत नाही किंवा कळून काहीही पाळत नाही.

उगीच दुसऱ्या प्राण्याचा जीव घ्यायचा हे वाईटच. पण कोणाच्या दृष्टीने? जर हिंसा वाईट तर जगातले सर्व प्राणी अंतिमतः नरकात जाणार यात नाही संशय नाही आणि तिथे जाऊन हिंसेचाच अनुभव घेणार यातही शंका नाही.

हिंसा काय किंवा अहिंसा काय, एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कितीही वेळा नाणे उडवले तरी स्पष्ट उत्तर मिळणार नाही.

फक्त विचारवंत माणूस वादविवाद घालत बसेल आणि पूर्ण गोंधळून जाईल.

नेट वरचे प्रवचन

आजकाल बघा, व्हॉट्सॲप उघडले की काहीतरी फॉरवर्ड असतोच. त्यातही म्हाताऱ्यांनी आणि एकलकोंड्या लोकांनी काय काय करावे आणि काय काय करू नये याची बरीच उहापोह केलेली दिसते.

आता असे बघा, म्हातारे लोक आपल्या आवडीने तर म्हातारे नसतात झालेले. आणि एकलकोंडा स्वभाव एकदम निर्माण होत नाही. दोन्ही नैसर्गिक गोष्टी आहेत.

पण आता म्हाताऱ्या लोकांना मित्र जमवा, गप्पागाष्टी करा, संपर्क वाढवा, कोडी सोडवा वगैरे सल्ले खूपच दिले जाताहेत. जसे काही हे म्हातारे आज पर्यंत मित्रबित्र नसलेले होते की काय असे धरून चालून.

आणि काय म्हणे, दुसऱ्यांची उणीदुणी काढू नका. उगाच इतरांच्या चुका दाखवून देऊ नका. त्याने तुमची तीन बोटे स्वतःकडे असलेली दिसतात वगैरे.

एक गोष्ट आहे. युरोप अमेरिका पहिल्यापासून स्वतंत्र राहणाऱ्या लोकांच्या मनोवृत्तीचे मूळ होते जेंव्हा जवान होते तेंव्हा मस्त आयुष्य उपभोगून घेतले. आता "संध्याछाया भिवविती हृदया" व्हायला लागल्यावर हे मित्रप्रेम आणि असे सोशल

रहावेसे वाटणे सुरू झाले तिथे. आम्ही पन्नास वर्षे मागे त्यांच्या. मग आमच्याकडे आता ही सल्ल्यांची लाट आली आहे.

आता म्हणे मित्रांचे ग्रुप करा, बागा, हॉटेले इथे भेटी घडवा, आपल्या वयाच्या लोकांबरोबर हसा खेळा. उगाच वाकडे तोंड करून जगाकडे बघत बसू नका. उगाच नव्या पिढीवर टीका करत राहू नका.

मग हे सांगायला व्हॉट्सॲप ग्रुप कशाला पाहिजेत? आपले आपल्याला समजत नाही का?

आजकाल फॉरवर्ड फार झाले आहेत. कोणीतरी कोण तरी असला की काहीतरी लिहितो. लिहिणारा एक, वाचणारे हजार. मग ते लिहिणे कोणा न कोणाला तरी आवडणारच. मग पाठविले पुढे. सगळेच सगळ्यांना असे फॉरवर्ड पुढे पाठवले तर रिपीट किती होतात हे कोण बघतो?

मानसशास्त्रज्ञ सांगतात की माणसाचा जो सोशल स्वभाव आहे तो जिवंत राहिला पाहिजे. एकलकोंडेपणा कोणालाच काही मदत करत नाही. पण एकलकोंडेपणा एकदम डेव्हलप होतो का?

a

मागचा सर्व जन्म इतरांपासून वेगळे दिसण्यासाठी एकलकोंडेपणा डेव्हलप केला. मुखवटे घातले चेहेऱ्यावर. अलूफ राहिलो. स्नॉबिश राहिलो. आणि आता हे सर्व मुद्दाम बसवलेले नाटक मोडून टाकायचे? आता हे कसे जमणार?

जमेल, जमेल, सगळे जमेल. काही स्टेप्स घ्याव्या लागतील त्यासाठी. पहिले म्हणजे आपण कोणीतरी मोठे होतो हे विसरायला लागेल. आपण कोणाचे साहेब नाही की बॉस नाही हे विसरायला लागेल. आता सगळे एकसारखे आहेत हे मान्य करायला लागेल.

ते लोक किती छान लिहितात! ते गाणीबिणी किती छान म्हणतात! आपल्याला कसे येणार ते? आणि आता आपण असले काही केले तर लोक हसणार नाहीत का आपल्याला?

अहो जरा डोळे उघडून बघा. हे सर्व करणारे आपल्यासारखेच लोक आहेत. कोणीतरी लिहिले म्हणून आपण फॉरवर्ड करू शकतो. त्यांचे विचार त्यांनी मांडले तसे आपण का नाही मांडू शकणार? आपण काही दगडधोंडे नाही आहोत. लिहिता येते आपल्यालाही. मग असा प्रयत्न तरी करून बघायला काय अडचण आहे?

लोक चुका दाखवतील, टीका करतील. करोत. त्याने आपलेच सुधारले जाईल, ते लोक नव्हे. आपणच प्रगती करू, ते नाही करणार. आपणही लोकांना असेच ऑन लाईन सल्ले देऊ. आपले सल्ले ते लोक फॉरवर्ड करतील.

करून तर बघूया पहिल्यांदा. तुम्हाला माहित नसेल की किती छान तुम्ही लिहिता ते. तुम्हाला नवीन आश्चर्याचा धक्का बसेल, की तुमचे कोणीतरी वाचले आहे आणि त्यावर काहीतरी रिऍक्शन दिली आहे त्यांनी म्हणून.

तुम्ही किती चांगले प्रवचन देऊ शकता ते कळेल तुम्हालाच. तुमचेही प्रवचन असेच व्हॉट्सॲप वर येईल. तुम्ही नक्की आनंदी, खूष व्हाल. एकदम खात्रीने.

एकदा करून तर बघा. केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे.

अरेच्चा, हे काय? मी ही लेक्चर द्यायला लागलो की काय? बघा असे होते. पण लोकां सांगे ब्रम्हज्ञान आपण कोरडे पाषाण असे आम्ही नक्कीच नाही.

सुधारित आवृत्ती

पूर्वीची आवृत्ती शिळी झाली असे समजावे. आजकाल आवृत्या पब्लिश करायच्या अगोदरच शिळ्या होतात हे समजून त्याप्रमाणे वागावे.

==========

आता ग्लोबल वॉर्मिंग सेट झालेले आहे.
त्यामुळे आपले महानगर ग्लोबल वॉर्मिंग रेडी असले पाहिजे.

म्हणून आपल्या नागरिकांनी नवे कायदे कसे असावेत याची चर्चा आणि त्यांचे चर्वण करून स्वतः ग्लोबल वॉर्मिंग रेडी असले पाहिजे.

ही चर्चा सुरू करण्यासाठी काही बीज रूपे येथे दिली आहेत. त्यावरून आपल्या सुविद्य नागरिकांना कुठे भर घालायची ते कळेलच.

वळवाचा आणि मान्सूनचा पाऊस पडून गेल्यावर जे पाणी आता साठते ते समुद्रात किंवा नदीत सोडून समुद्राला किंवा नदीला पूर आणू नये.

आता ते पाणी साठविण्यासाठी जागोजाग गल्लीतळी करण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

पाणी पंप करून किंवा कृत्रिम ओढे आणि नद्या करून आपल्या इमारतींच्या शेततळ्यांत वळवावे.

गारा जर पडणारच असतील तर त्या खाण्यास योग्य आहेत का ते महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाने जाहीर करावे.

नसल्यास त्या खाण्यास कश्या योग्य करता येतील त्याची प्रोसिजर प्रसिद्ध करून प्रत्येक नागरिक आणि टुरिस्ट यांना मिळेल याची व्यवस्था करावी.

गारांवर खाद्य पदार्थ म्हणून नवे टॅक्स लावू नयेत.

आणि हवामानात बदल होत असल्यामुळे कोणत्या ब्रँडची होडी घ्यावी ते सुचवावे.

स्कूटर सारखी सिंगल सीटर किंवा टू सीटर होडी असल्यास उत्तम.

किती पॉवरच्या वॉटर स्कूटर टॅक्स फ्री असतील ते प्रसिद्ध करावे, उगाच नंतर वाद नकोत.

वल्ह्याने चालणारी होडी असेल एका वल्ह्याने किती मायलेज देईल ते ही समजले पाहिजे.

स्कूटर किंवा बाईक वापरून होडी चालली तर उत्तम.

प्रत्येक पेट्रोल पंपावर, रस्त्यावर, सोसायटीमध्ये होड्या लावण्यासाठी वेगळे बर्थ असले पाहिजेत.

ई-होडी असल्यास अजूनच चांगले.

ई-होड्या चार्ज करायची स्टेशन कुठे कुठे आहेत त्याचा नकाशा प्रसिद्ध करावा.

होड्यांना ट्रॅफिकचे नियम लागू करू नयेत.

त्यांना वन वे, चुकीचे पार्किंग, डबल पार्किंग, ट्रिबल सीट, सिग्नल तोडला, चुकीचा टर्न घेतला वगैरे फालतू कायदे दाखवून पावती फाडण्याची धमकी देऊ नये असे पाणी पोलिसांना (वॉटर पोलीस) अगोदरच सांगून ठेवावे.

त्यांना फोटो काढून अपलोड करून दंड बसेल असे काही करता येऊ नये अशी व्यवस्था करावी.

आणि होड्यांना पोल्युशन कंट्रोल सर्टिफिकेट (पी यू सी) आवश्यक करू नये.

पोलिसांची एक पाणी ब्रँच (वॉटर पोलीस) असली पाहिजे हे सांगायला नकोच.

a

त्यांना ड्रेस घालून पोहण्याचे प्रशिक्षण मिळालेले असलेच पाहिजे. शिवाय होड्या उलटल्यानंतर माणसांना आणि विशेषतः स्त्रियांना कसे वाचवायचे हे प्रशिक्षण नीट मिळालेले असलेच पाहिजे.

आता कधीही पाऊस पडत असल्यामुळे ते हायड्रोफोबिक कपडे कुठे मिळतील ते प्रसिद्ध करावे. मग छत्रीची गरज भासणार नाही. कपडे मात्र रंगीबेरंगी असावेत. बेरंगी असले तर अजून छान. मग वेगळी फॅशन करायला लागणार नाही.

नवीन टुरिस्टनी पुणे किंवा मुंबई महानगरात प्रवेश करताना काय काय बरोबर आणावे किंवा आणू नये याची लिस्ट प्रसिद्ध करावी.

एकंदरीत पुणे किंवा मुंबई महानगर पाऊस आणि पूर फ्रेंडली होईल असे बघावे.

बदलत्या हवामानाप्रमाणे आपले पुणे किंवा मुंबई महानगर बदलते असलेच पाहिजे.

सुविद्य आणि सुसंस्कृत पुणेकर आणि मुंबईकर नागरिकांनी आणि टुरिस्टलोकांनी या सूचनांत वेळोवेळी भर घालून हे पर्यावरण कायदे वापरायला मजबूत आणि कठीण करावेत असे आवाहन करु या आणि आपले पुणे किंवा मुंबई महानगर चांगले स्मार्ट महानगर होईल असे बघू या..

a

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

श्रीरंग कौलगी यांचं हे ई साहित्यवरील चवथं पुस्तक.

श्रीरंग कौलगी हे त्या काळातील इंजिनियर जेव्हा भारतात हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच इंजिनियरिंग कॉलेजेस होती. इंजिनियर हा त्या काळचा क्रीम. इंजिनियरिंग सोबतच त्यांचा इतर छंद जोपासण्याचा स्वभाव व वाचन आणि चिंतन यांमुळे आयुष्याकडे त्यांनी सजगपणे पाहिले. त्यांच्या लेखनातून त्यांचा मौलिक अनुभव आणि त्यांचे खुसखुशीत भाषेतील चिंतन अशी दुहेरी मेजवानी मिळते. त्यांच्या पुस्तकांची एक मालिकाच ई साहित्य प्रकाशित करत आहे.

श्रीरंग कौलगी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (५०), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३५), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि.

देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१४), श्याम कुलकर्णी(२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी(४), यशवंत कदम(७), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखा्नीस(२), मिलिंद कपाळे मुकुंद कर्णिक (३) श्रीराम काळे (२) शैलेश पुरोहित(४) बी बी देसाई(२), राजा कदम असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

।आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ‘इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी॥